७. डॉ. रामविनोद सिंह, नौवे दशक के हिंदी उपन्यास
८. समकालिन हिंदी उपन्यासों में आदिवासी विमर्श, डॉ. शिवाजी देवरे, डॉ. मधु खराटे,
९. जंगल जहाँ शुरू होता है, संजीव
१०. रेत, भगवानदास मोरवाल

सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास आणि डॉ. श्रीराम गुंदेकर

संशोधक मार्गदर्शक
डॉ. शेटोड साईनाथ नारायण
विभागप्रमुख, इतिहास विभाग
शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर
ता. अर्धापूर जि. नांदेड

संशोधक विद्यार्थी
पावडे केशव देविदासराव
मु.पुयणी ता. जि. नांदेड
संशोधन केंद्र (यशवंत महाविद्यालय, नांदेड

प्रस्तावना :-

"जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था नाकारणारे, स्त्रीस्यत्वाला विरोध करणारे, कर्मकांडाला विरोध करणारे, मानवी मूल्यांचा विवेकनिष्ठेंचा पुरस्कार करणारे साहित्य म्हणजे सत्यशोधकीय साहित्य होय." सत्यशोधकीय साहित्यामध्ये सत्यशोधकीय संवेदना, जाणिवा आणि मूल्ये यांचा विस्त्रृतपणे उल्लेख केलेला असतो. एखाद्या व्यक्तीकडे माणूस म्हणून पाहणे म्हणजेच भूकेलेल्याला अन्न, तहाणलेल्याला पाणी देणे व एका माणसाकडे माणूस म्हणून पाहणे एवढे मन संवेदनशील असणे हा सत्यशोधकीय साहित्याचा मुळ पाया आहे. संवेदना, जाणिवा आणि मूल्य या त्रिसुत्रानुसार सत्यशोधकीय साहित्यांने प्रस्थापित समाज व्यवस्थेतील मानवाने निर्माण केलेले कृत्रिम भेद, वर्ण, जाती, लिंग, व्यवसाय, पवित्र-अपवित्र या सर्वांना दुर करून मानवी मूल्यांवर आधारित नविन समाज रचना निर्माण करणारे साहित्य म्हणजे सत्यशोधकीय साहित्य होय.

24 सप्टेंबर 1873 रोजी महात्मा ज्योतीबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली व तत्कालिन समाजव्यवस्थेच्या विरोधात जावून एक नविन विचारप्रवाह सुरू झाला. त्या विचारप्रवाहाने संपूर्ण समाजव्यवस्थेला विकासाच्या मार्गावर नेऊन सोडले. तो विचारप्रवाह म्हणजेच सत्यशोधनाचा विचारप्रवाह होय. महात्मा ज्योतीबा फुले यांनी ज्या कालखंडात समाज सुधारणेचे कार्य सुरू केले तो कालखंड पारतंत्र्याचा होता. एकीकडे नावापुरते का होईना ब्रिटीशांचे समाजनतेचे, कायद्याचे राज्य् होते. तर दुसरीकडे समाजामध्ये जातीयता, अंधश्रध्दा, स्त्री-पुरूष असमानता, आर्थिक सामाजिक विषमता या अशा अनेक बाबी होत्या अशावेळी महात्मा ज्योतीबा फुले यांनी समाज सुधारणेचा मार्ग निवडला व त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून आपले कार्य सुरू केले. महात्मा ज्योतीबा फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' या दोन ग्रंथांच्या माध्यमातून आपली लेखनी सुरू केली आणि एक नविन सत्यशोधकीय प्रवाह सुरू केला. कोणत्याही साहित्य प्रवाहामध्ये सातत्य, साहित्य प्रवाहाचे वेगळेपण, स्त्री-पुरूषांचा सहभाग, ग्रामीण शहरी भागांचा समावेश, स्वत:च्या वेगळ्या प्रकाशन संस्था, स्वतंत्र वेगळे लिखान हे निकष येत असतात. सत्यशोधकीय साहित्य लेखनात हे सर्व निकष आलेले दिसून येतात. त्यामुळेच हा साहित्यप्रवाह स्वतंत्र साहित्यप्रवाह असल्याचे लक्षात येते. महात्मा ज्योतीबा फुल यांनी निर्माण केलेली सत्यशोधकीय साहित्य लेखनाची परंपरा आजतागायत सुरूच आहे. याच परंपरेतील एक भंक्कम अष्ठपूलै व्यक्तीमहत्व श्रृंखलेतील एक पाडाव म्हणजेच डॉ. श्रीराम गुंदेकर हे होत.

डॉ. श्रीराम गुंदेकर हे 20 व्या शतकातील सत्यशोधकीय साहित्यलेखनाला नेटाने पुढे नेणारे एक प्रभावशाली व्यक्तीमत्व् होते. त्यांचे लिखान हे मराठी मधून असले तरी त्यांच्या लिखानाला ऐतिहासिक आधारे असल्याचे लक्षात येते. त्यामुळेच तर संपूर्ण महाराष्ट्र भर त्यांच्या लिखानाचा प्रसार झाल्याचे

आपल्या लक्षात येते. डॉ. श्रीराम गुंदेकर हे आधुनिक भारतातील सत्यशोधक चळवळीतील विचारवंत असून सत्यशोधकीय लिखानाला प्रोत्साहन देणारे गाढे अभ्यासक होते. सत्यशोधकीय साहित्यलेखनाला सर्व स्त्रांमधून म्हणजेच सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक बाजुंनी भारतीय जनसामान्य माणसामध्ये रुजवण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केलेले आहे.

सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास :-

महाराष्ट्रातील 'सत्यशोधकीय चळवळ' ही या देशातील महत्त्वाची आशी चळवळ आहे. सामाजिक परिवर्तनाशी संबंधीत अशी चळवळ आहे. आज महाराष्ट्रात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सर्व जाती-जमातीतील मंडळी ज्या ताठ मानेने उभे आहेत त्यांच्या मुळात सत्यशोधकीय चळवळ आहे याचे भान अनेकांना नाही. सत्यशोधकीय चळवळीने जाती व वर्णाची एकाधिकारशाही मोडून काढली. काही अभ्यासकांच्या मते, 'दक्षिणेतील ब्राम्हणीय व्यवस्थेच्या विरोधातील आंदोलनाच्या मुळात सत्यशोधकीय चळवळ आहे.' या संत्यशोधकीय चळवळीचा इतिहास किमान 150 वर्षाचा आहे. या 150 वर्षाच्या दरम्यान साहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारातून भरपूर लेखन करण्यात आले या लेखनाच्या मुळात 'सामाजिक परिवर्तन' हाच उद्देश होता.

डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकीय चळवळीचा इतिहास चार खंडामध्ये मांडला आहे. सत्यशोधक चळवळीचा 150 वर्षाचा साहित्य इतिहास आहे. सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाचे दोन प्रकार असतात. त्यामध्ये प्रामुख्याने मौखिक परंपरेचा अभ्यास किंवा एखाद्या समस्यांचा अभ्यास समाजातील विविध घटकामध्ये जावून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती गोळा करणे व त्याचे विश्लेषण करणे आणि त्याची इतिहासाशी सांगड घालणे हा एक प्रकार आहे तर दुसरा प्रकार विखुरलेल्या साहित्यचा शोध घेवून त्याचा तुलनात्मक व चिकित्सात्मक अभ्यास करून भूतकाळ आणि वर्तमानमाळातील साहित्याशी सांगड घालून त्यांचे विश्लेषण करणे होय. डॉ. श्रीराम गुंदेकर हे या साहित्याच्या दुसऱ्या प्रकारात मोडतात. डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधक साहित्याचा इतिहास 04 खंडामधून मांडला आहे. त्यातील दोन खंड प्रकाशित झालेले असून उर्वरित दोन खंड प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या सत्यशोधकीय साहित्याच्या इतिहासाचा आढावा पुढील काही ग्रंथामधून घेता येईल.

खंड पहिला :-

प्रस्तुत खंडात डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास मांडतांना पहिल्या प्रकरणात ते सत्यशोधकीय साहित्याची परंपरा मांडतात. या देशातील विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधामध्ये ज्या विचार परंपरने बंड केले. त्या विचार परंपरा डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी या पहिल्या प्रकरणामध्ये मांडल्या. त्यामध्ये प्राचिन सत्यशोधकीय परंपरा, जैन परंपरा, शाक्तपंत परंपरा, लोकायत परंपरा, बौध्द परंपरा, सुफीसंप्रदाय, नाथ संप्रदाय, मध्ययुगीन सत्यशोधकीय परंपरा आणि त्यांचे साहित्य, वारकरी संप्रदाय, लिंगायत संप्रदाय आणि महानुभव संप्रदाय यांचे सविस्तर विवेचन डॉ. श्रीराम गुंदेकर या खंडात करतात.

प्रस्तुत खंडाचे दुसरे प्रकरण यात आधुनिक सत्यशोधकीय पार्श्वभूमी ते मांडतात. प्रकरण तीन मध्ये आधुनिक सत्यशोधकीय साहित्याची पायाभरणी इ.स.1853 ते 1900 या कालखंडाची माहिती सदरील प्रकरणामध्ये आलेली आहे. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या सत्यशोधकीय विचारांचा आणि कार्याचा आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये घेतला गेला आहे. निर्मिकाचा शोध, मनुस्मृतीचा धिक्कार, छत्रपती शिवाजी राजे भोसले

यांचा पोवाडा, ब्राम्हणांचे कसब, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म इतपासून ते सत्यशोधक विवाहपध्दती, पूजापध्दती यांचा देखील विस्तृत आढावा या प्रकरणामध्ये घेतलेला आहे.

इ.स.1853 ते 1900 सत्यशोधकीय साहित्याचा अविष्कार या प्रकरणात सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे ते डॉ. यशवंतराव ज्योतीराव फुले आणि अर्जून केळुसकर या सारख्या सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या तत्कालिन सत्यशोधकांचा इतिहास प्रस्तुत खंडामध्ये मांडलेला आहे. 1901 ते 1920 हा सत्शोधकीय साहित्याचा बहारदार कालखंड म्हणून डॉ. श्रीराम गुंदेकर या काळाचे वर्णन करतात. एकंदरीत 1850 ते 1920 या 70 वर्षाचा कालखंडाचा एकंदरीत सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास नोंदविण्याचा यशस्वी प्रयत्न डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी या खंडामध्ये केलेला आहे.

खंड दुसरा :-

1920 ते 1947 पर्यंतच्या सत्यशोधकीय साहित्य लेखनाचा इतिहास दुसऱ्या खंडामध्ये मांडला आहे. डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी या खंडात एकूण 68 सत्यशोधकांचा इतिहास मांडलेला आहे. 1920 मध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे निधन झाले आणि सत्यशोधक चळवळीचे केंद्र कोल्हापूरकडून पुण्याकडे सरकले. याच काळात लोकमान्य टिळक यांचे निधन झाले. टिळकांच्या निधनानंतर उच्च वर्णीयांचे नेतृत्व केशव बळीराम हेडगेवार यांच्याकडे आले. हा एकंदरीत 1947 पर्यंतचा सत्यशोधकीय इतिहास डॉ. श्रीराम गुंदेकर या खंडामध्ये मांडतात. डॉ. श्रीराम गुंदेकर यांचा तिसरा खंड व चौथा खंड सध्यातरी प्रकाशित झालेला नाही. परंतु त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी यावर कार्य करत असून तिसरा आणि चौथा खंड लवकरच प्रकाशित होईल.

थोडक्यात डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी दुसऱ्या खंडात अनेक सत्यशोधकांचा इतिहास मांडतांना महात्मा ज्योतीबा फुले यांच्यापासून प्रेरणा घेवून अनेक सामाजिक कार्य केले. त्या सर्व कार्याचा उल्लेख या खंडामध्ये येतांना दिसून येतो.

सत्यशोधकीय साहित्य परंपरा आणि स्वरूप :-

प्रस्तुत ग्रंथामधून मराठीतील संशोधकीय साहित्याचा प्रभाव, महात्मा ज्योतीबा फुले यांचे स्त्रीमुक्ती संदर्भातील विचार, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, सार्वजनिक सत्यधर्म या संदर्भाने सत्यशोधकीय साहित्याचे लेखन आलेले आहे.

सत्यशोधकीय निबंध :-

सत्यशोधकीय निबंध या ग्रंथामध्ये डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी अनेक सत्यशोधकीय लेखकांचे लेख व निबंध संपादित केलेले आहेत. त्यात डॉ. भारत पाटणकर, डॉ. आनंद पाटील, डॉ. भगवान ठाकुर, डॉ. अशोक चोपडे या व अशा अनेक सत्यशोधकीय साहित्यकांचे त्यांनी लिहिलेल्या निबंधांचे संपादन प्रस्तुत ग्रंथात करण्यात आलेले आहे.

महात्मा ज्योतीराव फुले विचार आणि वाङमय :-

या ग्रंथामधूनही त्यांनी सत्यशोधकीय साहित्य लेखनावर प्रकाश टाकण्याचे मोलाचे कार्य केल्याचे दिसून येते. महत्मा ज्योतीबा फुले यांचे विचार आणि कार्य, महात्मा ज्योतीबा फुले पूर्वकाळ व समकाळ, आधुनिक शेतकरी, अर्थशास्त्रज्ञ, इहवादी विचार, महात्मा फुले वाङमय व प्रेरणा, ज्योतीबा फुले यांचे टिकाकार अशा विविध अंगांनी डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकीय साहित्य लेखनाचा व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या वाङमय ग्रंथांचा ऐतिहासिक दृष्टीकोणातून उहापोह केल्याचे दिसून येते.महात्मा ज्योतीबा फुले

यांच्या समग्र लेखनातून मानवी जीवनविषय सम्यकदृष्टीकोण स्पष्ट झाला आहे पण जातीव्यवस्थेचा अंत आणि स्त्रीदास्यत्वाला विरोध ही त्यांची वैचारिक भूमिका अखिल मानवतेला व्यपणारी त्यांच्या लेखनातून आजच्या सर्वच परिवर्तनवादी चळवळींना प्रेरणा मिळते अशा आशयाचे सुचक दिग्दर्शन महात्मा ज्योतीबा फुले यांच्या लेखनातून सत्यशोधकीय दृष्टीकोण जाणवतो याचा अभ्यास डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी केल्याचे लक्षात येते.

थोडक्यात डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे वाङमयीन लिखान हे देखील सत्यशोधकीय साहित्य परंपरेतून आल्याचे दिसून येते. सत्यशोधकीय साहित्य म्हणजे सर्व सामान्य माणसांचा हुकांर, व्यथा, वेदनेचा जिवंत अविष्कार, त्यांच्या हर्षखेदाचे, यशापयशाचे अक्षरसाहित्य म्हणजे सत्यशोधकीय साहित्य होय असे डॉ. श्रीराम गुंदेकर म्हणतात त्यांनी जे सर्व लिखान केलेले आहे, त्या सर्व लिखानामध्ये सत्यशोधकीय साहित्लेखनाचा इतिहास किंवा त्याची झालर या लेखनातून स्प्ष्ट्पणे दिसून येते असेच आपणांस म्हणता येईल.

निष्कर्ष :-

1. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या सत्यशोधकीय साहित्य लेखनातून वैचारिक अधिष्ठाण दिसून येते.
2. डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय साहित्य लेखन नव अभ्यासकांना प्रेरणा व नव दिशा देते.
3. डॉ. श्रीराम गुंदेकर हे मराठी विषयाचे अभ्यासक असले तरी त्यांच्या लेखानाला ऐतिहसिक दृष्टीकोण असल्याचे लक्षात येते.
4. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या लिखानातून सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास विस्तृतपणे आलेला आहे.
5. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या सत्यशोधकीय साहित्य लेखनाचा ऐतिहासिक आढावा. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या लिखाणातून आलेला आहे.
6. डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकीय विचारधारेच्या मुळाशी धरून लिखान केलेले आहे.
7. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या सत्यशोधकीय इतिहास लेखनातून जीवन विषयक सम्यकदृष्टीकोण व्यक्त होतांना दिूसन येतो.
8. डॉ. श्रीराम गुंदेकरांच्या सत्यशोधकीय साहित्य लेखनातून आजच्या सर्व परिवर्तनवादी चळवळींना प्रेरणा मिळते.

संदर्भग्रंथ :-

1. गुंदेकर डॉ. श्रीराम :- सत्यशोधकी साहित्याचा इतिहास, खंड पहिला, प्रथम आवृत्ती 01 मे, 2010 सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर
2. गुंदेकर डॉ. श्रीराम :- सत्यशोधकी साहित्याचा इतिहास, खंड दुसरा, प्रथम आवृत्ती
3. भोसले डॉ. हंसराज :- स्मृतीग्रंथ सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर
4. गुंदेकर डॉ. श्रीराम :- महात्मा ज्योतीबा फुले विचार आणि वाङमय, भाग -01, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 1992,
5. गुंदेकर डॉ. श्रीराम :- महात्मा ज्योतीबा फुले विचार आणि वाङमय, भाग -02, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 1992,
6. फडके. डॉ. भालचंद्र :-सत्यशोधक पत्रकार, प्रचार प्रकाशन कोल्हापूर
7. गुंदेकर डॉ. श्रीराम :-सत्यशोधकीय निबंधक
8. जी.ए. उगले :-सत्यशोधकांचे अंतरंग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

आदिवासी समाजाच्या समस्या व आव्हाने

डॉ. माधव माणिकराव मोरे

सहा. प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, नारायणराव वाघमारे महाविद्यालय आखाडा बाळापूर, जि. हिंगोली

भारतातील आदिवासी जनसमूहांना विविध नावाने ओळखले जाते. राज्यघटनेत त्यांचा उल्लेख अनुसूचित जमाती असा आहे. परंतु त्यामुळे आदिवासी जनसमुहाची सामाजिक ओळख स्पष्ट होत नाही. आता देशभराच्या आदिवासी जनतेत नवे आत्मभान आल्याने व स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाल्याने अनुसूचित जमाती ऐवजी आदिवासी या शब्दाचा वापर व्हावा व त्याला घटनात्मक संरक्षण देण्यात यावे असे आदिवासींना वाटू लागली आहे. आदिवासी समाज मूळ निवासी असतानाही काही संस्था संघटना राजकीय पक्ष जाणिकपूर्वक वनवासी हे शब्द पद्धतशीरपणे रूढ करू पाहत आहेत. त्यांच्या मते, "आदिवासी या शब्दाभोवती असे एक समजूतीचे वलय संबंधित झाले आहे की त्यामुळे आदिवासी हे आपल्यापेक्षा निराळे आपल्यापासून दूरचे वाटू लागले आहेत हा समज आणि ही भावना उत्पन्न करून ती दृडमूळ करण्याकरिता जाणून-बुजून वनवासी हा शब्द प्रचलित करण्याचा त्याचा प्रयत्न चालू आहे." थोडक्यात त्याचे स्पष्टीकरण असे करता येईल की, आदिवासी लोक नागरी वस्तीपासून अगदी दूर, डोंगरदऱ्यामध्ये जंगलामध्ये राहतात. त्यामुळे असा एक समज पसरविण्यात येतो की, सपाट दाट वस्तीच्या प्रदेशातील लोकांनी वनवासी लोकांशी लढाई करून, त्यांना पराभूत करून, तर या खोऱ्यात दूर हाकलून दिले. दुसरा अर्थ असा होतो की, शिकार करणारे वनात राहणारी असा आहे. आदिवासी बद्दल सर्वसाधारण लोकांची कल्पना म्हणजे जंगल दऱ्याखोऱ्यात राहणारे, रानटी जंगली, लोक खरं पाहता आदिवासी हेच या देशाचे मूळ रहिवासी बाहेरून येणाऱ्या सगळ्यांनी त्यांचे सकल प्रदेश व्यापले आणि त्यांना जंगलं दऱ्याखोऱ्याचा आश्रय घ्यावा लागला. ते कायमचे दूर झालेत इतरांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे शेकडो वर्षे ते अज्ञानी आणि अशिक्षित राहिले. त्यांनी त्यांच्या मूळ संस्कृतीची मूल्य मात्र जपली. काही मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ लोक आदिवासींना वनवासी म्हणतात. या भूमीचे ते मूळ निवासी आहेत. ही कल्पना त्यांना कदाचित रुचत नसावी पुरातन काळी संस्कृत साहित्यात आदिवासी जमातीचा उल्लेख आलेला आहे.

रामायण महाभारताच्या काळ साधारणतः चार-पाच हजार वर्षांपूर्वीचा असावा. आर्य भारतात आले त्यावेळी येथे प्रारंपासून वस्ती करून राहणाऱ्या राहणाऱ्या जमाती त्यांना प्रथम दिसल्या. सह्याद्री पर्वताच्या सानिध्यात देखील महादेव कोळी आणि कोकणात जमातीची स्वतंत्र राज्य होती अशी नोंद डॉ. गोविंद गारे यांनी "आदिवासी समस्या आणि बदल संदर्भ" या ग्रंथात केलेली आहे. आदिवासी आणि कुपोषण या प्रश्नाची गेल्या अनेक वर्ष वेगवेगळ्या स्तरावर चर्चा चालू आहे. शासनाने कुपोषणामुळे एकाही आदिवासीचा बळी होऊ दिला जाणार नाही होऊ नये यासाठी नव संजीवनी सारखी योजना पुढे आणलेली आहे. आदिवासी बालकांचे आजही कुपोषणाने मृत्यू होतात. आदिवासींचा केवळ आरोग्याचा प्रश्न सुटून चालायचे नाही तर त्यांचे आज अनेक प्रश्न आहेत. उदाहरणार्थ रोजगार, धरण व खाणी प्रकल्प, राखीव जंगल व त्यामुळे निर्माण झालेल्या विस्थापनाच्या, शिक्षणाच्या फॉरेस्ट जमिनीचा हस्तांतरित जमिनीचा अन्याय अत्याचारांचा दुर्दैवाने आदिवासी जमाती पूर्णपणे संघटित नाहीत. उलट धर्म, पक्ष, गट, संघटना, पंथ, जमाती यांनी त्यांना वाटून घेतली आहे. वेळप्रसंगी त्यांच्यात फूट पाडून आदिवासीलाच आदिवासी विरुद्ध उभे करायला मागेपुढे पाहिले

गेले नाही. औद्योगीकरणामुळे बेदखल झालेल्या आदिवासींना त्यांच्या सांस्कृतिक अस्मितेला जपत सुसंगत असे पुनर्वसन हे आरोग्यापेक्षाही महत्त्वाचे असे मूलभूत प्रश्न आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी त्यांची स्वतंत्र राजकीय संघटना निर्माण करण्याचा प्रयत्न करावा ही एक अतिशय महत्त्वपूर्ण घटना ठरू शकते. भारतीय राज्यघटनेनुसार भारताच्या लोकसभेत व घटक राज्याच्या विधानसभेमध्ये आदिवासीसाठी खास राखीव जागा निर्माण करण्यात आले आहेत. या जागावर निवडून जाणाऱ्या व्यक्तींनी आदिवासी समाजाच्या हितसंबंधाचे रक्षण करावे अशी घटनाकारांची अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात काय घडले निवडणुकीत भाग घेणाऱ्या निर्णया राजकीय पक्षांनी केवळ त्यांचे पक्ष हित नजरेसमोर ठेवूनच आदिवासींसाठी राखीव असलेल्या जागावर होयबा उमेदवार उभे केले. साहजिकच निवडून आल्यावर या उमेदवाराने केवळ आपापल्या पक्षाची हित पाहिले. पर्यायाने आदिवासींच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष केले. निवडून आलेली ही माणसे आदिवासींच्याच रक्त मासाची होती. पण एकतर अज्ञानामुळे त्यांना त्यांच्या समाजाचे समाजाच्या हितसंबंधाचे रक्षण करता आले नाही. ज्यांना त्यांच्या समाजाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याची जाण व समाज होती, ते पक्षीय राजकारणाच्या दडपणामुळे आता स्वतःच्या अंगभूत दुबळेपणामुळे समाजाचे सुरक्षा व प्रतिनिधित्व योग्य प्रकारे करू शकले नाहीत.

आदिवासींच्या समस्यांना वाचा फोडणारे कार्यकर्ते व पक्ष अनेक आहेत. परंतु 73 लाख आदिवासी मधून राज्यपातळी व सच्चे नेतृत्व करणारा एकही नेता आजपर्यंत निर्माण होऊ शकला नाही. आदिवासी जमातीतून अनेक आमदार पुढे आले पण समाजाला न्याय देणारा आवाज मात्र कोणताच पक्ष निर्माण करू शकलेला नाही. आजही त्या स्थितीत विशेष फरक झालेल्या नाही व तसा फरक होण्याची चिन्हे कुठेही दिसत नाही. आदिवासी मधील व या राजकीय दुबळेपणाचे एक प्रमुख कारण म्हणजे आदिवासींमध्ये राजकीय जागृती नसताना त्यांना राजकीय हक्क मिळाले. साहजिकच राजकीय जागृतीच्या अभावी मिळालेल्या राजकीय हक्काचा आदिवासी समाजाला उपभोग घेता आला नाही. आदिवासींना राजकीय हक्क मिळण्याबरोबरच त्यांच्यामध्ये राजकीय जागृती निर्माण व्हायला हवी होती. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 50 वर्षांनी प्रथमतः आदिवासी समाजात राजकीय राजकीय जागृती निर्माण करण्याची भाषा ऐकू येत आहे. पण खरी वेळ कधीच कळून गेलेली आहे घटनाकारांनी आदिवासी समाजाला प्रदान केलेल्या आर्थिक व राजकीय सवलती नजीकच्या काळात हळूहळू काढून घेतल्या जाणार आहेत.

भारतात 450 पेक्षा जास्त आदिवासी जमाती असून त्या परस्परांपासून वंशिक, भाषिक, आर्थिक व सामाजिक सांस्कृतिक दृष्ट्या भिन्न आहेत. त्यामुळे या जमातीचे प्रश्न सुद्धा विविध वैशिष्ट्यपूर्ण आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती प्रगत समाजापासून सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक संदर्भात पृथक जीवन घालवीत आहेत. आदिवासीवर औद्योगीकरण तसेच शहरीकरणाचे आघात होत आहेत. त्यांच्या जीवनात प्रशासकीय हस्तक्षेप वाढला. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसार केला आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव कृत्यास आला. आदिवासी जमात ही समस्याग्रस्त बनली आहे. अनुसूचित जमातीच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने शासनाने केंद्रीय व राज्य पातळीवर विविध प्रयत्न केले व होत आहेत. परंतु आदिवासी जमातीच्या प्रमुख समस्या आजत्यागत सुटलेल्या नसून काही समस्या पुढील प्रमाणे आहेत.

1. सामाजिक समस्या

आदिवासी जमातीत औद्योगीकरण व शहरीकरणामुळे युवाग्रहाचे विघटन झाले. आदिवासी संस्कृतीच्या संक्रमणाची कार्य करणारी ही संस्था नष्ट होऊ लागली. काही आदिवासी जमातीत लोकसंख्या वाढीचा प्रश्न निर्माण झाला. तर थोडा अंदमान गटातील ओघे जाखा याची लोकसंख्या घटू लागली. या जमाती नष्ट होतील की काय अशी भीती निर्माण झाली. या क्षेत्रात गरिबीचा आणि बेकारीचा प्रश्न प्राधान्याने दिसतो. यावरून वरीलप्रमाणे घटणारी लोकसंख्या बेकारी गरिबी ही सामाजिक समस्या निर्माण झाली.

2. आर्थिक समस्या

आदिवासी जमात डोंगरदऱ्यात वसलेली आहे. तेथील भूमी सुपीक व सपाट नाही. भरपूर पाणी उपलब्ध नसते. शेतीचे ज्ञान पारंपारिक आहे. फळे फुले गोळा करणे, शिकार करणे, पशुपक्षी पकडणे, पशुपालन करणे, अशा व्यवसायातून दैनंदिन गरजा जेमतेम भागविल्या जातात. अंगभर वस्त्र मिळत नाही. शेती हे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून केले जाते. पोटभर भोजन मिळत नाही. अपुरे वस्त्र वापरावे लागते. अत्यंत निम्न उत्पन्नामुळे त्यांचे जीवनमान निम्न प्रकारचे आढळते. यावरून अशा प्रकारे डोंगरदऱ्यात वस्तीस्थान पारंपरिक पद्धतीने शेती करणे सुपीक जमिनीचा अभाव शेती हे उदरनिर्वाहाचे साधन ह्या त्यांच्या आर्थिक समस्या आहेत.

3. राजकीय समस्या

आदिवासी समाजाचा सभ्य समाजाशी संपर्क आणि विशेषतः आदिवासी क्षेत्रात आधुनिक कायद्याचे राज्य प्रस्थापित झाल्यामुळे या जमातीतील पंचायतीचा प्रभाव कमी झाला आहे. आदिवासी राजे सरदार चे महत्व कमी झाले. परंतु त्याचवेळी ख्रिश्चन मिशनरायांनी फुटीरतावादी बीजे पेरली. काही आदिवासी स्वतंत्र सार्वभौम व राष्ट्राची मागणी करू लागली. या विद्रोही लोकांचा प्रश्न निर्माण झाला. सीमेलगत असणारा चीन बांगलादेश म्यामर सारखी राष्ट्रीय बंडखोरांना मदत करू लागली. आदिवासी क्षेत्रात अशांतता निर्माण झाली. या राजकीय समस्या सोडविण्यासाठी उत्तर पूर्व भागात लहान लहान राज्य तयार करण्यात आली. यावरून आदिवासी जमातीची स्वतंत्र राज्याची मागणी आदिवासी भागात अशांतता, पंचायतीचा कमी प्रभाव या आदिवासी समाजाच्या प्रमुख राजकीय समस्या असल्याचे दिसून येते.

4. आरोग्याची समस्या

आदिवासी लोकांच्या गरिबीमुळे अपुरे पोषण व कुपोषणाचे प्रश्न आढळतात. आदिवासी भागात शुद्ध पेजलाची समस्या जटील बनलेली आढळते. वैद्यकीय मदतीचा अभाव असून साथीच्या रोगांना आळा घालण्याचे विशेष प्रयत्न दिसत नाहीत. त्यामुळे या क्षेत्रात कॉलरा, मलेरिया, फायलेरिया, कुष्ठरोग, निमोनिया, टीबी, रातआधळेपणा हे रोग मोठ्या प्रमाणात दिसतात. बालमृत्यू आणि माता मृत्यूचे विशेष प्रमाण लक्षात येते. इतर लोकांच्या तुलनेत जमातीच्या लोकांच्या आरोग्याचा दर्जा निम्न प्रकारचा आहे. वैयक्तिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष असल्यामुळे सर्व रोगाचे प्रमाण चार्मरोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. लोक वैद्यकीय मदत घेण्याऐवजी जादूटोण्यावर विश्वास आजही ठेवतात. भक्ताने सांगितलेले उपाय करतात. यातून रोगाच्या निर्मूलना ऐवजी जटिलता वाढते. यावरून अपुरे पोषण, शुद्ध पेजलाचा अभाव, वैद्यकीय मदती ऐवजी जादूटोण्यावर विश्वास, बालमृत्यूचे व माता मृत्यूचे अधिक प्रमाण ह्या समस्या आदिवासी जमातीत आढळून येतात.

5. आदिवासी युवाग्रह आणि जीवन शिक्षण

आदिवासी युवाग्रहाच्या माध्यमातून जीवन शिक्षण देण्यात येत असे. हे शिक्षण अनौपचारिक रित्या देण्यात येई. परंतु या क्षेत्रातील औद्योगीकरण शहरीकरण आणि आधुनिक पाठशाळाच्या आरंभामुळे आदिवासी मुले युवाग्रह ऐवजी शाळेत जाऊ लागली. शिक्षणाचे माध्यम, विषय आणि पद्धतीत बदल झाला. मिशनऱ्याने इंग्रजी भाषा व रोमन लिपीचा स्वीकार केला. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर कोणती लिपी स्वीकारावी, शिक्षणाचे माध्यम कोणते असावे असे प्रश्न उद्भवले. आज आदिवासीच्या मौखिक साहित्याचा ऱ्हास होत आहे. लोकांमध्ये निरक्षरतेचा प्रश्न गंभीर आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांमध्ये गरजेचे प्रमाण अधिक आहे. शाळेला लागणारे साहित्य, इमारत तसेच शिक्षकांचा आवश्यक असणार सहभाग आढळत नाही. आदिवासी जमातीचा शैक्षणिक क्षेत्रात फारसा विकास झाला नाही. शिक्षण ही एक आदिवासीची समस्या बनली आहे. याचे कारण अतिदुर्ग भागात वास्तव्य, शिक्षणाचे माध्यम कोणते असावे, मौखिक साहित्याचा ऱ्हास, शाळेतील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण, सर्वाधिक दुर्गम भागात जाण्याबद्दल शिक्षकाची उदासीनता या आदिवासी जमातीच्या शैक्षणिक समस्या आहेत

6. धार्मिक समस्या

आदिवासी जमातीच्या देव देवता ह्या वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. आदिवासी लोकांचा या देवदेवतेवर विश्वास दिसून येतो. त्याचबरोबर ते नैसर्गिक घटकाची पूजा करतात. सूर्य, वारा, पाऊस, धान्य, नद्या यांना देव मानतात व नैसर्गिक घटकाची पूजा करतात. आधुनिक काळात आदिवासी क्षेत्रात ख्रिश्चन मिशनरांनी धर्मांतर केले. काही वनजातीवर हिंदू धर्माचा प्रभाव दिसतो. दक्षिण भारतात वन्यजाती सदस्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारलेला आढळतो. विशेष म्हणजे आदिवासी जमातीचे धर्मांतरण हे आर्थिक प्राप्तीचे अमिष दाखवून झाले आहे. या प्रक्रियेत परंपरागत विश्वास व विधी विधाने नष्ट होत आहेत. अंधविश्वासाचे प्राबल्य आहे. आदिवासी जमातीच्या धर्मांतराचा प्रश्न त्यातून उद्भवलेली परंपरागत धार्मिकता ही गंभीर समस्या बनली आहे.

7. सांस्कृतिक समस्या

आदिवासी जमातीचे सांस्कृतिक जीवन संपन्न आहे. कित्येक वर्षापासून त्यांनी आपल्या संस्कृतीचे जतन व संरक्षण केले आहे. आदिवासी जमातीमध्ये नृत्यगायन, वादन, चित्रकला, मृतिकला, धातूकाम, काष्टकला, बांबूपासून वस्तूची निर्मिती, रंगीबेरंगी वस्त्र प्रावरणाची निर्मिती, मातीची भांडी तयार करण्याची कसब इत्यादी घटकातून त्यांच्या सांस्कृतिक जीवन प्रथम दिसून येते. परंतु आधुनिक काळातील प्रगत समाजाचा संपर्क या समाजाशी आल्यामुळे आदिवासीच्या सांस्कृतिक कलाचा ऱ्हास झाला. आदिवासी समाजाचे सांस्कृतिक जीवन संपन्न होते. पण आधुनिक काळात या समाजाशी इतर समाजाचा संपर्क आला व त्याची सांस्कृतिक कला रास पाऊस चालली आणि ही एक समस्या बनली.

निष्कर्ष

1. आदिवासी समाजाची भाषा, समान धर्म, विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य असणारा, अक्षर ओळख नसलेला समाज म्हणजे आदिवासी समाज होय.
2. एकांतवात, बदलती शेती, कमालीची निरक्षरता, निकृष्टप्रतीचे राहणीमान, शेती हे एक उदरनिर्वाचे साधन, व्यापारीपिकाचा अभाव हे आर्थिक मागासलिपणाचे कारण आहे.

3. मद्यपानाला अवास्ते महत्व, विकासाविषयी उदासीनता, नवस यावर खर्च हे मागासलेपणाचे सामाजिक कारण आहे.
4. वाढती बेकारी व दारिद्र्य सुपीक जमिनीचा अभाव, अपुरे पोषण, शाळेतील विद्यार्थ्यांची गळती, धर्मांतरांचा प्रश्न, सांस्कृतिक ऱ्हास ही आदिवासी मागासलीपणाची कारणे आहेत.
5. आदिवासीच्या अर्थाजनाचे शेती, मजुरी, जंगल हे प्रमुख साधन आहे. अज्ञानापणामुळे होणारी पिळवणूक, कमालीची निरक्षरता, विकासाविषयी व शिक्षणाविषयी उदासीन दृष्टिकोन हे मागासलेपणाचे कारण असल्याचा निष्कर्ष निघतो.
6. आदिवासी जमातीची संख्या भारतात मोठी असून हा समाज मोठ्या प्रमाणात दारिद्र्यात जीवन जगत आहे सुधारणा होत आहेत पण सुधारणाचा वेग अतिशय मंद आहे

सारांश

बेकारी, गरिबी ही सामाजिक समस्या, डोंगरदयात वस्तीस्थान, पारंपारिक पद्धतीने शेती करणे, सुपीक जमिनीचा अभाव, शेतीही उदरनिर्वाहाचे साधन ह्या त्यांच्या आर्थिक समस्या, आदिवासी जमातीची स्वतंत्र राज्याची मागणी, आदिवासी भागात अशांतता, पंचायतीचा कमी प्रभाव या आदिवासी समाजाच्या राजकीय समस्या, अपुरे पोषण, शुद्ध पेजलाचा अभाव, वैद्यकीय मदती ऐवजी जादूटोण्यावर विश्वास, बालमृत्यूचे व माता मृत्यूचे अधीक प्रमाण या समस्या आदिवासी जमातीत आढळून येतात. आदिवासी जमातीचा शैक्षणिक क्षेत्रात फारसा विकास झाला नाही. शिक्षण ही एक आदिवासी समाजाची समस्या बनली आहे. याचे कारण अतिदुर्गम भागात वास्तव्य, शिक्षणाचे माध्यम कोणते असावे हा प्रश्न, मौखिक साहित्याचा ऱ्हास, शाळेतील विद्यार्थ्यांची गळतीचे प्रमाण सर्वाधिक, दुर्गम भागात जाण्याबद्दल शिक्षकांची उदासीनता या आदिवासी जमातीच्या शैक्षणिक समस्या आहेत. आदिवासी जमातीच्या धर्मांतरांचा प्रश्न, त्यातून उद्भवलेली फुटीर वृत्ती आणि परंपरागत धार्मिकता हे गंभीर प्रश्न बनले आहेत. आदिवासी समाज सांस्कृतिक जीवन संपन्न होता. पण आधुनिक काळात या समाजाशी इतर समाजाचा संपर्क आला व त्याची सांस्कृतिक कला ऱ्हास पावत चालली आहे. ही एक समस्या निर्माण झाली.

संदर्भ ग्रंथ

1. डॉ. प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
2.डॉ. दिलीप खैरनार, लोकसंख्या आणि समाज, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जून 2004
3.डॉ. गोविंद गारे, आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे, मार्च 2013
4.प्रा. डॉ. सुदर्शन देशमुख, आदिवासी समाजाचे दारिद्र्य, निर्मल प्रकाशन, नांदेड, मे 2007
5.डॉ. प्रदीप आगलावे, आदिवासीचे समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर

महिला : मानवी हक्क व अत्याचार

प्रा. डॉ. मीना भगवानराव बोर्डे

सहयोगी प्राध्यापक

जालना समाजकार्य महाविद्यालय. रामनगर, जालना.

प्रस्तावना:

महाराष्ट्र सारख्या पुरोगामी राज्यात सामाजिक व राजकीय सुधारणांची प्रदीर्घ परंपरा आहे. माँ जिजाऊ, शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर या महापुरुषांच्या विचारांचा वारसा महाराष्ट्र राज्याला लाभलेला आहे. आज ही महिलांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण झाले आहे का? आज महिला सक्षमीकरणासाठी सर्व स्तरातून प्रयत्न केले जात आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात योजना राबवून महिलांना सुविधा उपलब्ध करून दिला जात आहेत. परंतु आजही समाजकारणात व आर्थिक बाबतीत महिलांचा मागासलेपण दिसून येतो. महिला जोपर्यंत सबल होत नाही तोपर्यंत त्यांचे शोषण होत राहील.

जागतिक स्तरावरून संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९७५ वर्ष प्रथम आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले. भारत सरकारने महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठित केली. महाराष्ट्र शासनाने 1994 मध्ये सर्वप्रथम महिला धोरण मांडले. त्यानंतर दुसरे महिला धोरण 2001 मध्ये तयार करण्यात आले आणि 2013 मध्ये तिसरी महिला धोरण महाराष्ट्र शासन तयार केले.

उद्देश:

1. महिलांच्या सुधारासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्याचा अभ्यास करणे
2. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचा आढावा घेणे.

गृहीत कृत्य :

1. महिला सुधारणासाठी अनेक कायदे अस्तित्वात आले आहे.
2. महिलांवर होणाऱ्या अत्याचारात सातत्याने वाढ होत आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम सात साधनसामग्रीनुसार तत्य संकलित करण्यात आले आहे. त्यात संदर्भ ग्रंथ, मासिके, विविध अहवाल, इंटरनेट इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

महिला संबंधी मानवी हक्क कायदे :

भारतीय महिलांचा अधिकार कमी झाल्याने त्यांचा दर्जा घसरला होता. महिला व पुरुषात समानता आणण्यासाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत. मानवी हक्क म्हणजे काय हे जाणून घेणे आवश्यक आहे. व्यक्ती विकासात पोषक परिस्थिती म्हणजेच मानवी हक्क म्हणता येईल. मानवी हक्क विकासात पोषक परिस्थितीने निगडित आहे. हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी होय की ज्याशिवाय व्यक्तीला सामान्यत: सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही. असे मानवी हक्कांच्या संदर्भात प्रा. लास्की म्हणतात. आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या

जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होय, असे बोंझाके म्हणतात. पर्यायाने स्वतःच विकास मानवी हक्काद्वारे होण्यासाठी आवश्यक साधने म्हणजे हक्क होय.

मानवी हक्कांची संकल्पना व्यक्तीच्या स्वरक्षणातून उदयास आली. हक्क मानवाला त्याच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहे. त्याशिवाय व्यक्ती, समाज व राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही. सर्व मानवी हक्क व्यक्तीची प्रतिष्ठा आणि व्यक्ती जीवनाचे मूल्य यांच्या रक्षणासाठी निर्माण झालेले आहेत. मानवी हक्काची संकल्पना सामाजिक, धार्मिक, राजकीय न्यायावर आधारित आहे.

भारतीय संविधानात तिसऱ्या व चौथ्या अनुच्छेद मानव अधिकारांना संविधानिक स्थान प्राप्त झाले असले तरी मानवी हक्काचे पायमल्ली दिवसेंदिवस होत आहे. समाजात महिलांना दुय्यम दर्जा हा सतत दिला जातो. महिलांवर अत्याचाराची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. 2001 वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित केले. 8 मार्च हा दिवस सर्वत्र महिला दिन म्हणून साजरा केला जातो आहे. मात्र महिलांना होणारे अन्याय अत्याचार कमी होत नाही. आज महिलांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत आहे. भारतात दरवर्षी 50 लाख पेक्षा जास्त स्त्रीभ्रूणहत्या केल्या जातात असा अभ्यासपूर्ण सर्वेक्षण इंडियन मेडिकल असोसिएशन सादर केला. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात मुलींची संख्या कमी आहे.

आज महिलांचा विनयभंग, बलात्कार, वेश्याव्यवसायाची सक्ती, हुंडाबळी यासारखी गुन्हे घडतात. भारतात दर 20 मिनिटाला एका महिलेवर बलात्कार, दर 77 मिनिटाला हुंडाबळी यासारखे गुन्हे घडतात. 99 टक्के महिला पतीकडून शारिरिक छळ सहन करतात. यावरून देशातील चित्र भयान आहे असे दिसून येते.

भारतीय संविधान व मानवी हक्क:

26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आलेल्या भारतीय संविधानाने महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात समाधीच्या हक्क प्रदान केले. संविधानाच्या उद्देशपत्रिकेत सुद्धा स्त्री-पुरुषांना सारखेच मानले आहे. भारतीय संविधानात महिला संबंधित विशेष तरतुदी व कलमे करून महिलांना संरक्षण दिले आहे. कलम 14 नुसार स्त्री-पुरुषांना कायद्यापुढे समान लेखण्यात आले. कलम 15 नुसार स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव केला जाणार नाही. कलम 3 नुसार स्त्री व बालके यांच्यासाठी राज्याला विशेष कायदा करता येईल. कलम 16 नुसार सार्वजनिक सेवेमध्ये समान संधी, कलम 19 (1) नुसार भाषण स्वातंत्र्य, कलम 21 मध्ये जिवित्वाचा हक्क, कलम 23/24 मध्ये शोषणाविरुद्धचा हक्क, कलम 25 ते 28 मध्ये धार्मिक स्वातंत्र्यच हक्क, कलम 45 मध्ये शिक्षणासाठी नमूद करण्यात आला आहे. कलम 32 हे अत्यंत महत्त्वाचे आहे, 1993 साली भारतामध्ये उशिरा का होईना मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी 'मानवी हक्क संरक्षण कायदा' संसदेने पारित केला. या कायद्यानुसार राष्ट्रीय मानवी आयोग व राज्य मानवी आयोगाची स्थापना करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांना 50% आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. आहे. उदा. 1955 चा हिंदू विवाह कायदा, 1956 हिंदू वारसा कायदा, 1961 चा हुंडा प्रतिबंधक कायदा, 1976 चा समान वेतन कायदा, 2005 चा कौटुंबिक हिंसाचार कायदा, समान वेतन कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, घटस्फोट कायदा, मुलींचा अनैतिक निवारण कायदा, गर्भपात कायदा, 1971 महिलांचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा इत्यादी.

उपरोक्त वरील सर्व कायदे महिलांच्या सुरक्षिततेसाठी व संरक्षणासाठी महत्त्वाचे आहे असे असताना महिलांवरील दिवसेंदिवस अन्याय अत्याचार वाढत होत आहे हे खालील तक्त्यावरून दिसून येईल महाराष्ट्रातील महिलांवर वरील अत्याचाराचा आढावा

अ.क्र.	**महिलांवरील अत्याचार**	**सन 2012**	**सन 2013**	**सन 2014**
1	बलात्कार	1839	3063	3958
2	अपहरण आणि पळवून नेणे	1140	1874	1909
3	हुंडाबळी	329	320	248
4	पती आणि पतीच्या नातेवाईकाकडून झालेला अत्याचार	7415	8542	6983
5	अत्याचार	3935	8132	9102
6	विनयभंग	1294	2632	1494
7	लैंगिक अत्याचार	366	1277	10553
8	अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा /इतर	1882	1277	10553
	एकूण	**17800**	**26129**	**33415**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, महिलांवर झालेले अत्याचाराचे नोंदवलेले प्रमाण हे मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात महिलांवर 2012 मध्ये 17848 झालेली नोंद होती. 2014 मध्ये 33 हजार 415 पर्यंत वाढली म्हणजे या दोन वर्षात महिलांवर होणाऱ्या अत्याचारात दुपटीने वाढ झाली आहे. आज ही महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. महिला विषयी कायदे व पोलिस यंत्रणा यामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करणे आवश्यक आहे. महिलांवरील अत्याचार जोपर्यंत थांबत नाही तोपर्यंत महिला सुरक्षित आहे असे म्हणता येत नाही.

सारांश

महाराष्ट्रात महिलांवर दिवसेंदिवस त्यांच्या वाढत आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी संविधानात कायदे अंतर्भूत आहेत. परंतु पाहिजे त्या प्रमाणात त्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. महिला सुरक्षिततेसाठी व संरक्षणासाठी आहे परंतु महिलांवरील अन्याय अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.

निष्कर्ष

1. महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत.
2. महिलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत.
3. महिला कायद्याचा वापर समाजाच्या वतीने करत नाहीत.
4. संविधानात कायदे अंतर्भूत आहेत परंतु कायद्याची अंमलबजावणी कडक होणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ

1. डॉक्टर व्ही एम पेशवे माराव अधिकार अर्थ व व्याप्ती.
2. प्राध्यापक पाटील व्हीबी मानवी हक्क के सागर प्रकाशन पुणे आवृत्ती दुसरी 2010.
3. Maharashtra economics survey 2014-15.
4. महिला धोरण 2014 महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र शासन.
5. Indian economy survey 2014-15.

भारतातील डिजिटल ग्रंथालये: एक आढावा

माळोदे अमित विनोद

ग्रंथपाल,

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

जगभरातील ग्रंथालये परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात आहेत हे सर्वज्ञात आहे, विशेषतः माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे. पारंपारिक ग्रंथालये डिजिटल ग्रंथालयांमध्ये बदलत आहेत आणि नवीन ग्रंथालये स्थापन होत आहेत जी डिजिटल प्रकारची आहेत. परिणामी, या क्षेत्रात व्यापक रस आहे आणि परिणामी, जगभरात या क्षेत्रात बरेच संशोधन आणि विकास उपक्रम राबविले जात आहेत. भारतातही अनेक संस्था डिजिटल ग्रंथालये स्थापन करण्याच्या प्रक्रियेत आहेत आणि अनेक विद्वान आणि अभ्यासक डिजिटल ग्रंथालयांवर संशोधन करत आहेत. अलिकडच्या काळात, भारतात डिजिटल ग्रंथालये आणि त्यांच्या विविध पैलूंवर अनेक परिषदा आयोजित करण्यात आल्या आहेत. अनेक राष्ट्रीय परिषद व्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय परिषदा जसे की आशियाई डिजिटल ग्रंथालयांची आंतरराष्ट्रीय परिषद २००१, डिजिटल ग्रंथालयांवरील आंतरराष्ट्रीय परिषदा २००४ आणि २००६ यांनी भारतात डिजिटल ग्रंथालय जागरूकता आणि विकासाला आवश्यक ती गती दिली.

भारत ग्रंथालय आणि माहिती विज्ञान क्षेत्रात सुमारे २० विद्वत्तापूर्ण जर्नल्स प्रकाशित करते. भारतातील डिजिटल लायब्ररींवरील लेख भारतीय आणि परदेशी जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. भारतातील डिजिटल लायब्ररींवर प्रकाशित झालेल्या भारतीय आणि परदेशी नियतकालिकांच्या साहित्याचा आढावा भारतातील डिजिटल लायब्ररीच्या संशोधन आणि विकासाच्या स्थितीचे मूल्यांकन आणि समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल.

कार्यपद्धती

साहित्य पुनरावलोकन ग्रंथालय आणि माहिती विज्ञान ग्रंथालय, माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि एमराल्ड इनसाइट डेटाबेस द्वारे समाविष्ट असलेल्या प्रकाशित लेखा पुरते मर्यादित होते. जून २००७ पर्यंतच्या संपूर्ण कालावधीसाठी हे डेटाबेस शोधले गेले. 'डिजिटल लायब्ररी', 'डिजिटल लायब्ररी' आणि 'इंडिया' या कीवर्डवर अनेक शोध धोरणे वापरली गेली. संबंधित लेख ओळखण्यासाठी या शोधांच्या निकालांचे पुनरावलोकन केले गेले. संबंधित लेखांचे संदर्भ तसेच इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूरच्या इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय सेवांमध्ये व्हिडिओ लायब्ररी सेवा, डेटाबेस सेवा, एसडीआय सेवा, ऑनलाइन जर्नल एक्सेस सेवा आणि रेट्रोस्पेक्टिव्ह डेटाबेस शोध सेवा यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात डिजिटायझेशनच्या योजनांचा समावेश असलेल्या भविष्यातील कार्यक्रमांवर मोहपात्रा (२००७) यांनी चर्चा केली आहे.

डेब आणि कर (२००५) यांनी डिजिटल ग्रंथालयांच्या पूर्ववर्ती म्हणून इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाच्या उत्क्रांतीवादी स्थितीची पुष्टी करणारा एक लेख द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (TERI) येथे इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाच्या स्थापनेचे वर्णन करतो. 'तेरी इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय १९९९ मध्ये त्याच्या संशोधकांसाठी उघडण्यात आले आणि त्यात अनेक सेवांचा समावेश आहे. भौतिक इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय आणि आभासी

इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाच्या संकल्पनांवर चर्चा केली आहे ज्यामध्ये TERI इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे विविध संसाधने आणि फायदे समाविष्ट आहेत. पारंपारिक ग्रंथालय व्यवस्थेत लपलेली माहिती संप्रेषणासाठी अडथळा ठरते आणि या घटनेवर मात करण्यासाठी डिजिटायझेशनची क्षमता यावर गिरी (२००६) यांनी चर्चा केली आहे.

एक आढावा

अनेक अभ्यासांमध्ये हे सामान्यतः मान्य केले जाते की भारतात डिजिटल ग्रंथालय उपक्रम १९९० च्या दशकात सुरू झाले.आणि या पुनरावलोकनात असेही आढळून आले की डिजिटल ग्रंथालयांवरील बहुतेक भारतीय साहित्य १९९५ नंतरचे आहे. भारतातील डिजिटल ग्रंथालयांचा आढावा देणारे सर्वात जुने लेख राजशेखर (१९९७) यांचे आहेत; हा लेख डिजिटल ग्रंथालयांचे अनेक फायदे आणि त्यांच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या मुद्द्यांवर चर्चा करतो. श्रीवास्तव आणि सक्सेना (२००४) यांनी डिजिटल ग्रंथालयांचा आढावा देखील लिहिला आहे. शर्मा आणि अरोरा (२००५) यांनी डिजिटल ग्रंथालयांच्या गरजा, डिजिटलायझेशन प्रक्रिया आणि डिजिटल ग्रंथालयांच्या भविष्यासह डिजिटल ग्रंथालयांची गरज अधोरेखित केली. सदागोपन (२०००) यांनी चर्चा केलेल्या डिजिटल ग्रंथालयांच्या आव्हानांपैकी एक म्हणजे बोटांच्या टोकावर माहितीची उपलब्धता परंतु प्रश्न, ज्ञान कुठे आहे. भारतीय संदर्भात डिजिटल ग्रंथालयांची चर्चा केली आहे आणि लेखक भारतीय भाषांमध्ये सामग्री तयार करण्यासाठी आणि त्यात प्रवेश करण्यासाठी ग्रंथालय शास्त्रज्ञांना उपलब्ध असलेल्या संधींवर प्रकाश टाकतात.

डिजिटल ग्रंथालय सेवा

ग्रंथालये सेवा प्रदान करतात. लेथा (२००६) यांनी वेब-सक्षम माहिती सेवांसाठी एक साधन म्हणून ग्रंथालय पोर्टलवर चर्चा केली आहे. तांत्रिक माहिती संसाधन केंद्र (TIRC) च्या पोर्टलवर प्रकाश टाकत आहे.

वेगवेगळ्या सामग्री संघटना तंत्रांच्या वापरामुळे आणि वेगवेगळ्या प्रकारच्या डिजिटल सामग्रीमुळे ते एकमेकांपासून लक्षणीयरीत्या भिन्न असतात. रुमुगम, थंगराज आणि शांती (२००५) डेटा मायनिंगच्या संकल्पनेबद्दल आणि लायब्ररी डेटाबेसच्या वारंवार वापरकर्त्यांच्या प्रवेशाच्या नमुन्यांबद्दल काही अल्गोरिदमबद्दल चर्चा करतात. जरी लेखाच्या शीर्षकात असे म्हटले आहे की ते असोसिएशन मायनिंग वापरून डिजिटल लायब्ररीमध्ये वारंवार प्रवेश नमुने शोधण्याबद्दल आहे, परंतु अभ्यास स्वतः डिजिटल लायब्ररींवर नाही तर स्वयंचलित लायब्ररीच्या परिसंचरण किंवा व्यवहार डेटाबेस शी संबंधित आहे.

डिजिटल ग्रंथालयांचे व्यवस्थापन

एकदा डिजिटल ग्रंथालय तयार झाल्यानंतर, त्याचे व्यवस्थापन महत्वाचे आहे. डिजिटल ग्रंथालयांच्या व्यवस्थापनात समाविष्ट असलेल्या समस्या आणि धोरणांमध्ये हार्डवेअर व्यवस्थापन, सॉफ्टवेअर व्यवस्थापन, संग्रह व्यवस्थापन, संरक्षण/संग्रहण, वित्तीय व्यवस्थापन आणि प्रवेश प्रणाली यांचा समावेश आहे. गुप्ता आणि सिंग (२००६) यांनी यावर लक्ष केंद्रित केले आहे. डिजिटल ग्रंथालयांच्या विकासात भरीव नियोजन समाविष्ट आहे. डिजिटल ग्रंथालय विकास, विशेषतः आयटी पायाभूत सुविधा आणि आर्थिक नियोजनासाठी नियोजन यावर भर देतात.

निष्कर्ष

भारतात डिजिटल ग्रंथालय विकास विचलित झाला आहे. बहुतेक विकास विज्ञान आणि तंत्रज्ञान ग्रंथालयांमध्ये झाला आहे. या ग्रंथालयांमध्येही, लक्ष केंद्रित केले गेले आहे शिक्षण आणि प्रशिक्षण, कॉपीराइट, व्यवस्थापन आणि जाहिरात (मार्केटिंग) यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित न करता डिजिटल लायब्ररी विकसित करण्यावर. इलेक्ट्रॉनिक वातावरणाला अनुकूल असलेल्या कॉपीराइट कायद्यात सुधारणा करण्याची गरज आहे. डिजिटल लायब्ररी आणि डिजिटल तंत्रज्ञानावर कार्यशाळा आयोजित करण्यासाठी काही संस्थांनी पुढाकार घेतला आहे. भारतीय अभ्यास कमी किंवा पूर्णपणे गहाळ असलेल्या इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये डिजिटल हक्क व्यवस्थापन, डिजिटल लायब्ररी सुरक्षा, सामग्री व्यवस्थापन, व्यवसाय आणि किंमत मॉडेल आणि धोरण अभ्यास यांचा समावेश आहे. सध्या, भारतात किंमत मॉडेल अस्तित्वात नाही. अनेक डिजिटल लायब्ररी उपक्रमांची नोंद असल्याने, डिजिटल लायब्ररी उपक्रमांची सध्याची स्थिती समजून घेण्यासाठी भारतातील डिजिटल लायब्ररींचे सर्वेक्षण करणे उपयुक्त ठरेल. हे महत्त्वाचे गृहीत धरते कारण भारतीय डिजिटल लायब्ररी उपक्रमांवरील काही अभ्यास प्रामुख्याने वेबसाइटवर किंवा इतर प्रकाशित स्त्रोतांकडून उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित आहेत. सर्वेक्षण केवळ सध्याची परिस्थिती समजून घेण्यास मदत करेल असे नाही तर भारतातील केंद्रित डिजिटल लायब्ररी विकासासाठी कृती योजना तयार करण्यास मदत करेल. शिवाय, भारतात डिजिटल ग्रंथालयांचा वापर आणि वापरकर्ता अभ्यास अभावी आहेत. विद्यमान डिजिटल ग्रंथालयांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि भारतात अत्यंत वापरकर्ता-केंद्रित डिजिटल ग्रंथालये तयार करण्यासाठी हे क्षेत्र देखील अत्यंत महत्त्वाचे आहे.

संदर्भ

1. बाल कृष्णन, एन. 2005. युनिव्हर्सल डिजिटल लायब्ररी: फ्युचर रिसर्च डायरेक्शन्स. जर्नल ऑफ झेजियांग युनिव्हर्सिटी सायन्स 6A(11): 1204–1205.
2. बेअरमन, डी. २००७. डिजिटल लायब्ररी ज. माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वार्षिक आढावा ४१: २२३-२७२.
3. भट्टाचार्य, पी. २००४. डिजिटल लायब्ररी उपक्रमांमधील प्रगती: विकसनशील देशाचा दृष्टीकोन. आंतरराष्ट्रीय माहिती आणि लायब्ररी पुनरावलोकन ३६(३): १६५-१७५.
4. चंद्रकर, आर. २००४. भारतीय भाषांच्या संदर्भात बहुभाषिक मानक म्हणून युनिकोड. इलेक्ट्रॉनिक लायब्ररी २२(५): ४२२-४२४.
5. दास, ए.के. आणि बी. दत्ता. २००४. डिजिटल लायब्ररी सिस्टम्सच्या ऑडिट- इंस्ट्रक्शन आणि नियंत्रणाचा परिचय. ग्रंथालय आणि माहिती अभ्यासांचे ॲनाल्स ५१(३): ९९-१०३.
6. अनुराधा, के.टी. २००७. संस्थात्मक भांडारांची रचना आणि विकास: एक केस स्टडी. आंतरराष्ट्रीय माहिती आणि ग्रंथालय पुनरावलोकन ३७(३): १६९-१७८.
7. अरोरा, जे. २००१. भारतीय अभियांत्रिकी विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भारतीय राष्ट्रीय डिजिटल ग्रंथालय: इलेक्ट्रॉनिक संसाधनांमध्ये संघ-आधारित प्रवेशासाठी धोरणात्मक सहकार्याचा प्रस्ताव. आंतरराष्ट्रीय माहिती आणि ग्रंथालय पुनरावलोकन ३३(२-३): १४९-१६५.; अरोरा, जे. २००३. ३५(१): १-१७;. अरोरा, जे. २००४. 36(1): 1–11
8. अरोरा, जे. २००४. आयआयटी दिल्ली येथील केंद्रीय ग्रंथालयात नेटवर्क सक्षम डिजिटाइज्ड संग्रह. आंतरराष्ट्रीय माहिती आणि ग्रंथालय पुनरावलोकन 36(1): 1–11.
9. अरुमुगम, जी., एम. थंगराज आणि पी. शांती. 2005. असोसिएशन मायनिंग वापरून डिजिटल लायब्ररीमध्ये वारंवार प्रवेश नमुन्यांचा शोध घेणे. SRELS जर्नल ऑफ इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट 42(2): 131–138.

पारंपरिक आणि सकारात्मक मानसशास्त्र

प्रा. सुषमा सुरेश गांगुर्डे

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सातपूर, नाशिक ४२२००७

प्रस्तावना:

मानसशास्त्र हा मानवाच्या वर्तन, भावना, विचार आणि मानसिक प्रक्रिया यांचा अभ्यास करणारा शास्त्र आहे. या शास्त्राच्या दोन मुख्य शाखा आजकाल अधिक चर्चेत आहेत. सकारात्मक मानसशास्त्राचा विचार करण्याची गरज का भासली या प्रश्नाचे उत्तर आधी प्रचलित असणाऱ्या पारंपरिक मानसशास्त्राच्या कार्यप्रणालीवरून आपल्याला कळून येते. पारंपरिक मानसशास्त्र व्यक्तीच्या नकारात्मक ते च्या बाजूचा जास्त अभ्यास झालेला दिसून येत आहे. नाझी राजवटीत हिटलरच्या अधिकाराच्या वागण्याच्या मानसिकतेचा अभ्यास व स्टॅन्डले मिलग्रामचा सामान्य लोक निष्पाप लोकांना इलेक्ट्रिकच्या शॉक्स कसे देऊ शकतात यावरील प्रयोग आणि डॉ. झिम्बार्डो यांच्या स्टॅन्ड फोर्ड विद्यापीठातील तुरुंगाच्या प्रयोगातून मिळालेल्या 'लुसीपर प्रभाव' इत्यादीत मधून असं दिसतं की बहुतेक मानसशास्त्रज्ञांना मानवी वर्तनाची काळी बाजू जास्त आकर्षित करत होती. पारंपरिक मानसशास्त्राच्या या दृष्टिकोनाला छेद देऊन मानवी वर्तन नकारात्मकतेला विरोध न करता सकारात्मकतेचा सुद्धा बरोबरीने विचार करणारा प्रवृत्त करते.

पारंपरिक मानसशास्त्र आणि सकारात्मक मानसशास्त्र. पारंपरिक मानसशास्त्र हे मानवाच्या समस्यांवर, दुःखावर आणि त्याचे नकारात्मक वर्तन यावर लक्ष केंद्रीत करते, तर सकारात्मक मानसशास्त्र हे जीवनाच्या चांगल्या पैलूंवर, सकारात्मक भावना, शारीरिक व मानसिक आरोग्य आणि व्यक्तिमत्वाच्या विकासावर अधिक लक्ष केंद्रित करते.

पारंपरिक मानसशास्त्राने माणसाच्या मानसिक समस्या, विकार आणि नैराश्याच्या बाबतीत अनेक मोलाच्या गोष्टी सांगितल्या आहेत, ज्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. दुसरीकडे, सकारात्मक मानसशास्त्राने सकारात्मकता, आनंद, प्रेम, समृद्धता आणि यशाच्या दृष्टीने माणसाला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये ध्यान, आभार, आणि जीवनातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार यावर भर दिला जातो.

दोन्ही शाखांचे उद्दीष्ट आहे – माणसाचे जीवन अधिक समृद्ध आणि आनंदी बनवणे, पण त्या दोन दृष्टिकोनातून ते साध्य करण्याचे मार्ग वेगळे आहेत. पारंपरिक मानसशास्त्र मानसिक विकारांचा उपचार करण्यावर लक्ष केंद्रित करत असताना, सकारात्मक मानसशास्त्र जीवनातील आनंद आणि समृद्धीच्या दृष्टीने सकारात्मक मानसिकतेचा विकास करण्यावर जोर देते.

ही प्रस्तावना पारंपरिक आणि सकारात्मक मानसशास्त्र यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न करेल आणि दोन्ही शाखांचा मानव जीवनावर काय परिणाम होतो हे स्पष्ट करेल.

पारंपरिक मानसशास्त्र आणि सकारात्मक मानसशास्त्राची ओळख: _

पारंपरिक मानसशास्त्र ओळख:

पारंपरिक मानसशास्त्र हे मुख्यतः मानवाच्या मानसिक विकार, भावना, वर्तन आणि मानसिक अस्वास्थ्यावर लक्ष केंद्रित करते. यामध्ये मानसिक विकारांची कारणे, त्यांचा अभ्यास आणि त्या विकारांच्या

उपचार पद्धतींवर मुख्य भर दिला जातो. पारंपरिक मानसशास्त्र माणसाच्या नकारात्मक अनुभवांचा, भावनांच्या गोंधळाचा आणि मानसिक ताणतणावाचा विश्लेषण करत, त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करते. यामध्ये मुख्यतः फ्रायड, बॅक, जंग आणि वॉटसन यांसारख्या मानसशास्त्रज्ञांनी आपापली सिद्धांत मांडली आहेत.

दुसरा महायुद्धापर्यंत मानसशास्त्र एक शैक्षणिक आणि तत्त्वात ज्ञान विषयक विषय म्हणून मोठ्या प्रमाणात अभ्यासला जात होता. त्यानंतर दुसऱ्या वेळी सैनिकांची मानसिक तपासणी करणे वेळेस तेथील सकारात्मक मानसशास्त्र एक विज्ञान म्हणून वापरण्याची आवश्यकता असल्याने दिसून आले युद्धामुळे मानसिक आरोग्याचे परिणाम अनेक ठिकाणी दिसून आलेले दिसते. दैनंदिन समस्यांवर सैनिकांच्या नैदानिक उपचारांची आवश्यकता निर्माण झाली परिणाम स्वरूप मानसशास्त्राचे ध्येय बदलते दुसऱ्या युद्ध होईपर्यंत मानसशास्त्राची प्रमुख तीन ध्येय होती.

१) व्यक्तीचे जीवन अधिक सर्जनशील आणि परिपूर्ण बनविणे.

२) व्यक्तीमधील प्रतिभा ओळखणे आणि त्याचे संवर्धन करणे.

३) व्यक्तीच्या मानसिक आजारावर उपचार करणे.

या शाखेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे मानसिक विकारांच्या निदानासाठी वैज्ञानिक पद्धती वापरून उपचार करणे. पारंपरिक मानसशास्त्रातील चिकित्सकांचा दृष्टिकोन उपचार प्रक्रियेत प्रामुख्याने असतो, जिथे रुग्णाची मानसिक स्थिती आणि वर्तनावर सुधारणा करण्याचे प्रयत्न केले जातात. मानसिक विकारांचे कारण, त्याचे निदान आणि उपचार या प्रक्रियेवर या शाखेचा मुख्य जोर असतो.

सकारात्मक मानसशास्त्र ओळख:

सकारात्मक मानसशास्त्र हे मानसशास्त्राच्या एक नवीन शाखा आहे, ज्याची सुरुवात १९९० च्या दशकात 'मार्टिन सेलीगमन' यांच्या पुढाकारामुळे झाली. या शाखेचा मुख्य उद्दीष्ट आहे – व्यक्तिमत्वाचा सकारात्मक विकास, आनंद, समाधान, मानसिक आरोग्य आणि व्यक्तीचे सर्वोत्तम कार्यप्रदर्शन सुनिश्चित करणे. पारंपरिक मानसशास्त्राच्या नकारात्मक दृष्टिकोनापासून वेगळे, सकारात्मक मानसशास्त्र जीवनातील चांगल्या गोष्टींवर आणि सकारात्मक अनुभवांवर लक्ष केंद्रित करते.

सकारात्मक मानसशास्त्रामध्ये, व्यक्तीच्या जीवनातील सकारात्मक भावनांचा अभ्यास केला जातो, जसे की आनंद, प्रेम, आभार, आशा आणि आत्मविश्वास. यामध्ये आत्मसाक्षात्कार, समग्रता आणि व्यक्तिमत्वाच्या विकासाच्या कूटधर्मावरही विचार केला जातो. या शाखेने मानसिक आरोग्याची व्याख्या फक्त विकारांच्या अभावापुरती न करता, चांगल्या जीवनशैली आणि सकारात्मक मानसिकतेच्या दृष्टीने केली आहे.

तुलनात्मक विचार:

पारंपरिक मानसशास्त्र मुख्यतः नकारात्मक मानसिक अवस्थांवर आणि विकारांच्या उपचारावर लक्ष केंद्रित करत असताना, सकारात्मक मानसशास्त्र सकारात्मक विचार, भावना आणि व्यक्तिमत्वाच्या समृद्धीवर अधिक जोर देतो. दोन्ही शाखांचा उद्दीष्ट आहे माणसाच्या मानसिक आरोग्याचा विकास, परंतु त्यांचे दृष्टिकोन आणि पद्धती भिन्न आहेत.

सकारात्मक मानसशास्त्राची गृहितके:_

जेव्हा आपण पारंपारिक मानसशास्त्राच्या गृहीतकांची तुलना आपण सकारात्मक मानसशास्त्राच्या कृतिकांची करतो तेव्हा आपल्याला हे जाणवते की सकारात्मक मानसशास्त्र खरोखरच 'आनंदी' आणि 'अर्थपूर्ण जीवनाचे' शास्त्र आहे.

पारंपरिक मानसशास्त्राच्या गृहीतकांमध्ये काही महत्त्वाचे तत्त्वज्ञान व धारणांचा समावेश होतो. या गृहीतकांमधील काही प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:

1. **मानव व्यक्तिमत्त्वाची स्थिरता –** पारंपरिक मानसशास्त्र मानते की व्यक्तिमत्त्व स्थिर आहे आणि एका वयाच्या वर्तुळात व्यक्तिमत्त्वाचे प्राथमिक घटक निश्चित होतात. म्हणजेच, व्यक्तिमत्त्वातील वैशिष्ट्ये लहान वयात निश्चित होतात आणि मोठ्या होण्याच्या प्रक्रियेत फारसा बदल होत नाही.
2. आयुष्यातील नकारात्मकतेवर लक्ष देणे आणि त्यांचे विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे.
3. मूलतः रचनात्मकता – पारंपरिक मानसशास्त्र ही विचारधारा वागण्याच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करते. यात माणूस सामाजिक, मानसिक, वर्तनात्मक घटकांपासून प्रभावित होतो. या शास्त्रात मनोविश्लेषण, वर्तनशास्त्र आणि जनेटिक घटकांचाही विचार केला जातो.
4. आजारांची लक्षणे कमी करून आयुष्यातील दुःख कमी करणे.
5. प्रभावाचे महत्त्व – पारंपरिक मानसशास्त्राच्या दृष्टीकोनात माणसाचे वर्तन व विचार हा पर्यावरण किंवा समाजाच्या प्रभावामुळे बदलत असतो. अर्थात, व्यक्तिमत्त्वाच्या विकासात बाह्य घटकांचा मोठा परिणाम असतो.
6. लोक जैविक, सामाजिक किंवा मानसशास्त्रीय त्रास आणि ग्रस्त असतात, त्यामुळे त्यांच्या त्रास दूर करणे गरजेचे आहे.
7. मानवी मनाचे वैज्ञानिक विश्लेषण – पारंपरिक मानसशास्त्रात मानवी मनाला एक जटिल, परंतु विश्लेषणीय प्रणाली म्हणून पाहिले जाते. ते मानसिक प्रक्रियेच्या सुसंगततेवर विश्वास ठेवते, जिथे प्रत्येक मानसिक कार्याची कारणे आणि परिणाम स्पष्ट केले जाऊ शकतात.
8. आजारपण नाही म्हणजे खुशाली आहे.
9. आवश्यकतेनुसार वर्तन – पारंपरिक मानसशास्त्र मानते की प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनाची काही विशिष्ट कारणे असतात, जसे की मूलभूत मानसिक व शारीरिक आवश्यकतांची पूर्तता.

ही गृहीतके पारंपरिक मानसशास्त्राच्या अभ्यासाची पार्श्वभूमी तयार करतात, जिथे वर्तन, मानसिक स्थिती, आणि व्यक्तिमत्त्व यांचे समजून घेतले जाते. या गृहीतकांमधून स्पष्टपणे असे दिसते की पारंपरिक मानसशास्त्राचे संपूर्ण लक्ष आयुष्यातून त्रास व दुःख कमी करणे याकडेच होते. पण सकारात्मक मानसशास्त्रज्ञ साहजिकच आशावादी विचारसरणीचे असल्याने रोगमुक्त आयुष्यापेक्षा आनंदी व समाधानी आयुष्याला महत्त्व देत होते.

सकारात्मक मानसशास्त्राची गृहितके पुढील प्रमाणे_

सकारात्मक मानसशास्त्र (Positive Psychology) हे मानसशास्त्राचे एक क्षेत्र आहे ज्यामध्ये मनुष्यमध्ये सकारात्मक भावना, कौशल्ये आणि जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांवर लक्ष केंद्रित केले जाते. याचे उद्दिष्ट फक्त मानसिक विकारांवर उपचार करण्यापेक्षा, व्यक्तीच्या

जीवनात सकारात्मकतेची वाढ करणे आणि त्यांच्या सामर्थ्यांचा वापर करणे आहे. सकारात्मक मानसशास्त्राच्या गृहितकांमध्ये काही महत्वाचे सिद्धांत आहेत:

1. स्मरणशक्ती आणि दृषटिकोन: सकारात्मक मानसशास्त्रात असा गृहितक आहे की, व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य त्याच्या विचारांच्या आणि दृषटिकोनाच्या गुणवत्तेवर आधारित असते. जीवनाच्या प्रत्येक अनुभवाकडे सकारात्मक दृषटिकोनातून पाहणे मनुष्याला अधिक समाधान, आनंद आणि उद्दिष्ट मिळविण्यात मदत करते.
2. व्यक्ती स्वयंप्रेरणेने भारित असता आणि त्यांना उत्कर्ष करावयाचा असतो.
3. सामर्थ्य आणि सकारात्मक गुण: व्यक्तीमध्ये असलेल्या सकारात्मक गुणांचे (जसे की शांती, धैर्य, प्रेम, कृतज्ञता, क्षमा) मूल्यांकन केले जाते. यावर विश्वास आहे की, ही गुणे व्यक्तीला उच्च मानसिक आणि भावनिक स्थितीत ठेवतात.
4. त्रासाची लक्षणे कमी करणे ,खुशाल असलेल्या स्थितीला चालना देणे.
5. स्व-स्वीकृती (Self-acceptance): सकारात्मक मानसशास्त्र व्यक्तीला त्याच्या स्वत:च्या अडचणी आणि दोष स्वीकारून त्याचा विकास साधण्यास प्रोत्साहित करते. याचा अर्थ असा की, स्वत:वर प्रेम करणे आणि आपले गुण आणि कमी स्वीकारणे हे मानसिक स्वास्थ्याचे मूलतत्त्व आहे.
6. व्यक्तीची बलस्थाने शोधणे आणि सकारात्मक भावना निर्माण करणे.
7. समाजाशी जोडलेले संबंध: सकारात्मक मानसशास्त्रात असा विचार आहे की, समाजाशी आणि इतरांसोबत चांगले संबंध ठेवणे हे जीवनातील आनंद आणि समाधान मिळवण्यास महत्त्वाचे आहे. सामाजिक समर्थन आणि इतरांबरोबर असलेले नाते हे मानसिक तणाव कमी करण्यास मदत करतात.
8. सकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करून त्या वाढविण्याचा प्रयत्न करणे.
9. आधारभूत सुख आणि समृद्धि: हे गृहितक सांगते की, एक व्यक्ति त्याच्या जीवनामध्ये मानसिक आणि शारीरिक सुख मिळवण्यास सक्षम असावा, तसेच त्याचे जीवन मूल्ये आणि उद्दिष्टे यावर आधारित असावे.
10. अर्थपूर्ण जीवन (Meaningful Life): सकारात्मक मानसशास्त्र विश्वास ठेवते की, व्यक्तीला जीवनात उद्दिष्ट आणि अर्थ शोधावा लागतो. हे त्याला स्व-प्रेरणा आणि आनंद देणारे आहे.
11. कृतज्ञता आणि आनंद: व्यक्तीला जीवनात असलेल्या छोट्या मोठ्या गोष्टींसाठी कृतज्ञता व्यक्त करणे, आणि आनंद शोधणे हे सकारात्मक मानसिकतेला प्रोत्साहन देतात.

या गृहितकांच्या आधारे सकारात्मक मानसशास्त्र व्यक्तींना त्यांच्या जीवनात संतुलन, सकारात्मक दृषटिकोन, आणि मानसिक समाधान शोधण्याची प्रेरणा देते. मानसशास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नाने पारंपरिक मानसशास्त्रातील नकारात्मक पैलूंवर भर देण्याच्या दृष्टिकोनाला विरोध करून व्यक्ती आणि त्याच्या सकारात्मक पैलूंवर भर दिल्याने खरा आनंद आणि समाधान मिळतो हे गृहतक सत्यात उतरताना आपल्याला सर्वांना दिसत आहे.

पारंपरिक मानसशास्त्रापेक्षा सकारात्मक मानसशास्त्र का गरजेचे आहे

पारंपारिक मानसशास्त्र आणि सकारात्मक मानसशास्त्र यामध्ये काही महत्त्वाचे फरक आहेत, आणि सकारात्मक मानसशास्त्र त्याच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे महत्त्वपूर्ण आहे. पारंपारिक मानसशास्त्र मुख्यत: मानसिक विकार, तणाव, नैराश्य, आणि शारीरिक किंवा मानसिक त्रास यावर लक्ष केंद्रित करते, तर सकारात्मक मानसशास्त्र व्यक्तीच्या मानसिक आरोग्याच्या सकारात्मक पैलूंवर, त्यांच्या सामर्थ्यांवर, आणि जीवनाच्या गुणवत्तेवर भर देतो.

सकारात्मक मानसशास्त्राचे महत्त्व पुढील कारणांमुळे अधिक आहे:

1. पारंपारिक मानसशास्त्र फक्त आपल्या विकृतीच्या लक्षणांवर किंवा आजारावर लक्ष केंद्रित करते परंतु सकारात्मक मानसशास्त्र मध्ये व्यक्तीच्या मानसिक, शारीरिक, आर्थिक अशा अनेक बाजूंचा विचार केला जातो.
2. फक्त रोगावर नाही, तर जीवनाच्या सकारात्मक पैलूंवर लक्ष केंद्रित करणे: पारंपारिक मानसशास्त्र मुख्यतः मानसिक विकार, तणाव, आणि समस्यांवर केंद्रित होते, म्हणजेच हे नेहमी नकारात्मक किंवा अपयशावर आधारित असते. सकारात्मक मानसशास्त्र व्यक्तीच्या शक्ती, कौशल्ये, गुण, आणि त्याच्या जीवनाचा आनंद शोधण्यावर जोर देतो.
3. व्यक्तिगत वृद्धी आणि विकास: पारंपारिक मानसशास्त्राने थोड्या काळासाठी व्यक्तींच्या समस्यांवर उपचार केले असले तरी, सकारात्मक मानसशास्त्राने व्यक्तीच्या पूर्ण क्षमता आणि सामर्थ्याचा उपयोग करून त्याच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याचे लक्ष घेतले आहे. यामुळे, व्यक्तीची स्व-साक्षात्कार, आत्मविश्वास आणि व्यक्तिगत उद्दीष्टे साधण्यास मदत होते.
4. सकारात्मक दृषटिकोन: सकारात्मक मानसशास्त्र "सकारात्मकता"वर आधारित असताना, पारंपारिक मानसशास्त्र "नकारात्मकता" (जसे मानसिक विकार, तणाव, असंतोष) यावर लक्ष केंद्रित करते. सकारात्मक मानसशास्त्र हे व्यक्तींना त्यांच्या जीवनातील आनंद आणि समाधान मिळविण्यासाठी सकारात्मक दृषटिकोन घेण्यास प्रोत्साहित करते.
5. मानसिक स्वास्थ्याचे समग्र दृषटिकोन: पारंपारिक मानसशास्त्र मानसिक आरोग्य आणि विकारांवर उपचार करण्यावर लक्ष केंद्रित करत असले तरी, सकारात्मक मानसशास्त्र मानसिक आणि भावनिक आरोग्याच्या सकारात्मक पैलूंवर, जसे की कृतज्ञता, प्रेम, आत्म-स्वीकृती, आणि आशा यावर भर देतो.
6. आत्मसाक्षात्कार आणि उद्दीष्ट: पारंपारिक मानसशास्त्र कधीकधी फक्त समस्यांवर किंवा विकारांवर आधारित असते, तर सकारात्मक मानसशास्त्र व्यक्तींना त्यांच्या जीवनात एक मोठा उद्दीष्ट गाठण्याची प्रेरणा देते. हे आत्मसाक्षात्कार आणि जीवनातील उच्च उद्दिष्टांचा शोध घेण्यास मदत करते.
7. सामाजिक आणि नातेसंबंधांची महत्त्वपूर्ण भूमिका: सकारात्मक मानसशास्त्र समाजाशी आणि इतरांशी असलेल्या नातेसंबंधांचा महत्त्व अधिक विचार करते. चांगले आणि मजबूत सामाजिक संबंध मानसिक स्वास्थ्याचे एक महत्त्वपूर्ण घटक असतात, आणि हे पारंपारिक मानसशास्त्राच्या तुलनेत अधिक महत्त्वाचे मानले जाते.

संपूर्णतः सकारात्मक मानसशास्त्र व्यक्तीच्या मानसिक आरोग्याला समग्र आणि सकारात्मक दृषटिकोनातून पाहते, जे त्याच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास आणि त्याला अधिक आनंदी आणि समाधानी होण्यास मदत करते. पारंपारिक मानसशास्त्राच्या तुलनेत, सकारात्मक मानसशास्त्र अधिक गतीशील, प्रेरणादायी आणि जीवनाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे.

पारंपरिक आणि सकारात्मक मानसशास्त्र:

जीवनाच्या समृद्धतेसाठी दोन दृष्टिकोन हे एक महत्त्वपूर्ण आणि रोचक विषय आहे. यामध्ये दोन प्रमुख मानसिकता आणि जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांचा अभ्यास केला जातो: पारंपरिक मानसशास्त्र आणि सकारात्मक मानसशास्त्र.

१. पारंपरिक मानसशास्त्र:

पारंपरिक मानसशास्त्राचा मुख्य दृष्टिकोन मानसिक आजार, व्यक्तिमत्वाच्या विकृती आणि समस्यांच्या निदानावर आधारित आहे. यामध्ये समस्या आणि विकार ओळखून त्यांचा उपचार करण्याचा प्रयत्न केला जातो. पारंपरिक मानसशास्त्राच्या दृष्टीने, जीवनाच्या समृद्धतेची परिभाषा ही एकदम ठराविक, निश्चित आणि आयुष्यातील मानसिक स्वास्थ्याच्या इशाऱ्यांवर आधारित असते.

पारंपरिक मानसशास्त्राची काही वैशिष्ट्ये:

१) व्यक्तिमत्व आणि मानसिक विकारांच्या विश्लेषणावर जोर.

२) उपचाराच्या पद्धतींत मानसिक विकारांच्या निराकरणावर लक्ष केंद्रित करणे.

३) 'नकारात्मक' अनुभवांचा अभ्यास आणि त्यावर उपाय शोधणे.

२. सकारात्मक मानसशास्त्र:

सकारात्मक मानसशास्त्र म्हणजे मानवाच्या उन्नतीला, मानसिक स्वास्थ्य आणि जीवनाच्या समृद्धतेला महत्त्व देणारे एक दृष्टिकोन आहे. यामध्ये मानसिक विकारांपेक्षा अधिक सकारात्मक गुण, आनंद, तृप्ती आणि जीवनाचा अर्थ यांवर लक्ष केंद्रित केले जाते. डॉक्टर मार्टिन सिगलमॅन यांनी या संकल्पनेला व्यापकपणे प्रसिद्ध केले.

सकारात्मक मानसशास्त्राची काही वैशिष्ट्ये:

१) जीवनाच्या चांगल्या अनुभवांची ओळख आणि त्यांचा प्रसार.

२) व्यक्तिमत्वाच्या सकारात्मक गुणांची वृद्धी.

३) आनंद, आशावाद, आणि मानसिक तणाव कमी करण्याच्या उपायांचा अभ्यास.

४) 'प्रभावी जीवन' आणि 'समृद्ध जीवन' या कल्पनांना आकार देणे.

पारंपरिक आणि सकारात्मक मानसशास्त्र दोन वेगळ्या पण परस्पर पूरक दृष्टिकोनांची मांडणी करतात. पारंपरिक मानसशास्त्र व्यक्तीच्या मानसिक आजारांचा निवारण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असले तरी, सकारात्मक मानसशास्त्र व्यक्तीला जीवनाचा आनंद आणि उन्नती मिळवण्यासाठी मानसिकतेचा सकारात्मक दृषटिकोन विकसित करण्याचा मार्ग दाखवते.

पारंपरिक मानसशास्त्र आणि सकारात्मक मानसशास्त्र हे दोन्ही मानसशास्त्राच्या भिन्न दृष्टिकोनांवर आधारित आहेत. पारंपरिक मानसशास्त्र मानसिक विकार आणि नकारात्मक अनुभवांच्या निदानावर लक्ष केंद्रित करते, तर सकारात्मक मानसशास्त्र जीवनाच्या समृद्धतेला, मानसिक स्वास्थ्य आणि आनंदाला महत्त्व देते. दोन्ही दृष्टिकोन एकत्रितपणे व्यक्तीला शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने समृद्ध जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करतात.

संदर्भ :-

1. Badgujar, Chudaman and Warkhede, Prabhakar (2016) Sakaratmak Manasashatra, Prashant Publications, Jalgaon.
2. Emmons R. A. (1986). Personal strivings: An approach to personality and subjective well-being. Journal of Personality and Social Psychology, 51(5), 1058-1068.
3. Positive psychology doctor Anuradha Prashant harkare 2021.

वंचितांचे इतिहास लेखन व आव्हाने

प्रा. विजय कारभारी चव्हाण

कला ,वाणिज्य आणि विज्ञान, महाविध्यालय सातपूर, नाशिक ४२२००७

प्रस्तावना:

वंचितांचा अभ्यास हा एक महत्त्वपूर्ण सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विषय आहे. समाजातील वंचित घटक म्हणजे त्या लोकसमूहाला जो विविध कारणांमुळे आर्थिक, शैक्षणिक, आणि सामाजिक दृष्टीने मुख्य प्रवाहापासून वेगळे राहतात. वंचित घटकांमध्ये आदिवासी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुस्लिम समाज, महिला, अपंग व्यक्ती आणि इतर काही सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेले लोक समाविष्ट होतात.

वंचितांचा अभ्यास केल्याने समाजातील विविध असमानतांचा, वंचनेसंबंधीच्या कारणांचा आणि त्यावर होणाऱ्या प्रभावांचा अधिक सखोल अभ्यास करता येतो. या अभ्यासातून समजायला मदत होते की, समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि इतर मूलभूत सुविधा पोहोचवण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

वंचित घटकांच्या जीवनशैली, त्यांच्या समस्यांवर सखोल विचार करणे, तसेच त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी कशी धोरणे लागू करता येतील यावर प्रकाश टाकणे हे या अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ट असते. यामुळे सरकार, समाजसेवी संस्था आणि अन्य संबंधित घटकांना वंचितांचा सशक्तीकरण करण्यासाठी योग्य पावले उचलता येतील.

वंचितांचा अभ्यास प्रवाह :

अलीकडच्या काळात इतिहास विषय एक नवीन दृष्टिकोन उदयास येऊ लागला आहे .इतिहास एक सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता मिळाली आणि केवळ घटनांचा कालानुक्रमांनी करण्याचा विचार मांगे पडताना दिसत आहे .म्हणजेच घटनाही इतिहासाचा एक कच्चामाल आहे असं म्हटलेले वावगे ठरणार नाही .अर्थात इतिहास लेखन विविध स्तरावर झाले असले तरी राष्ट्रवादी विचार प्रवाहने झालेल्या इतिहास लेखनात भारताचे अंतरंग त्यात दिसत नाही. भारतीय समाजात विविध जाती, वर्ग, जातीविरोध आंदोलन असेल ,सामाजिक धार्मिक चळवळी, याकडे इतिहासकारांनी विशेष लक्ष दिलेले दिसत नाही. बहुतेक लेखन पुरुषप्रधानतेतुनच झालेले दिसत आहे. इतिहास लेखनात महात्मा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे विचार पुढे आलेच नाही.

समाजाने ज्यांना सर्व अधिकारांपासून वंचित ठेवले, उपेक्षित ठेवले; अशा समुहांच्या इतिहासाला "वंचितांचा इतिहास" असे म्हणतात. मार्क्सवादी इतिहासलेखनाच्या परंपरेतून वंचितांचा इतिहास लिहिण्याची परंपरा सुरू झाली. इटालियन तत्त्वज्ञ अँटोनिओ ग्रामची याने इतिहासलेखनाची सुरुवात समाजाच्या तळाशी असलेल्या सर्वसामान्य लोकांपासून करण्याची कल्पना मांडली.

वंचितांचा अभ्यास प्रवाह हा शिक्षणाच्या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा आहे, विशेषतः समाजातील आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिकदृष्ट्या वंचित गटांमध्ये. यामध्ये विविध अडचणी, संधी, आणि त्यावर

उपाय यांचा विचार केला जातो. वंचित गटांमध्ये शिक्षणाच्या क्षेत्रात समानता आणि न्यायाची प्राप्ती सुनिश्चित करणे गरजेचे आहे.

वंचिताचा अर्थ :

वंचित' म्हणजे ज्या व्यक्तीला किंवा समूहाला समाजातील इतर लोकांपेक्षा कमी संधी, सुविधा किंवा अधिकार मिळतात, अशा स्थितीत असणाऱ्या लोकांना वंचित असे म्हणतात. म्हणजेच कनिष्ठ दर्जाचे कमी दर्जाच्या दुय्यम (वंचित)घटक अशा त्यांचा अर्थ असतो. थोडक्यात आपल्या नैसर्गिक अधिकारांपासून त्या व्यक्तींना वंचित ठेवणं याचा समावेश होतो.

'वंचित' या शब्दाचा अर्थ आहे की ज्या लोकांना काहीतरी हवे असते ते मिळत नाही किंवा काहीतरी मिळायला हवे होते ते मिळत नाही त्यांना वंचित असं म्हटलं जातं.

आजवर झालेल्या इतका इतिहासकारांनी लिहिलेल्या इतिहास बघता तो इतिहास एकांगी स्वरूपाचा असून त्यांनी निम्मा शहरातील जनसमुहांना त्यांच्या स्थानापासून या इतिहासाने वंचित ठेवलेले आपल्याला दिसून येते. ही उणीव भरून काढणे सबाल्टर्न इतिहास प्रवाहाचे उद्दिष्ट आहे.

वंचितांच्या इतिहास लेखनाचे स्वरूप:

वंचितांचा इतिहास लेखनाचे स्वरूप हे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्टिकोनातून महत्वपूर्ण आहे. वंचित वर्ग, ज्यात अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, आदिवासी आणि महिलांचा समावेश होतो, त्यांचा इतिहास लेखन हा पारंपरिक इतिहास लेखनाच्या चौकटीतून बाहेर पडून, त्यांचे अनुभव, संघर्ष आणि योगदान उजागर करण्याचा प्रयत्न करतो. अभिजन वर्गाच्या पुढाकाराने राजकीय विरोध व चळवळी घडत नाहीत असे वंचितवादी गटाच्या लोकांचे मत आहे . म्हणून वंचित वर्ग इतिहासाचा प्रमुख घटक बनला पाहिजे कारण त्यांनी वाढत्या शोषणविरुद्ध आवाज उठवला आहे. त्यांचा हा विरोध अधिसत्तेची केंद्रे व प्रतिके याविरुद्ध होता समुदाय सत्ता पद्धतीचा वापर वंचितांनी केला आहे.

वंचितांचे वैश्विक सैध्दांतिकरण :-

इटालियन कम्युनिष्ट विचारवंत अंतोनिओ ग्रामची याने subaltern ही संज्ञा पुढे आणली. Subaltern म्हणजे of inferior rank म्हणजे समाजातिल असे समुह की जे वंचित शोषित किंवा दुय्यम समुह मानले जातात. इटालियन सैन्यामध्ये वापरात असणारी ही संज्ञा वंचित समुह व त्यांच्या जाणीवा यासाठी वापरली जाते.

ग्रामसी याने Notes on Italian history (१९३४) यामध्ये केलेल्या लिरवानाप्रमाणे. वंचित समुहांच्या इतिहासाचा अभ्यास सहा प्रकारे केला जातो.

1. त्यांच्या उदिष्टांची बांधणी, आर्थिक उत्पादन प्रकियेत वंचित सामाजिक गटांची होणारी निर्मीती, बिकास आणि संक्रमण
2. वर्चस्वशिल गटाचा किंवा नवीन पक्षांचा जन्म (बंचितांचा नियंत्रित करण्यासाठी)
3. वर्चस्वशिल राजकीय प्रक्रियेशी त्यांचा सकिय किंवा निपक्रीय संबंध त्यांचा स्वताःचा त्या कार्यक्रमाशी असणारा संबंध. त्यावर त्यांनी टाकलेला प्रभाप व स्वतःचा ताबा सागण्याचा प्रयत्न
4. जुन्या चौकटीत वंचित समुहांना स्वायतता मिळवण्यासाठी केलेले नवे अविष्कार
5. स्वतःचे अस्तित्व किंवा ताबा सांगण्यासाठी वंचित गटांनी केली निर्माती.

6. वंचित समुहांचा संघ संघटना किंवा राजकीय पक्ष

भारत ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया येथे विखुरलेले भारतीय आणि प्रिटीश इतिहासकारबाट स्टोनमध्ये अग्रेसर होतबंधित समूहांची अभ्यास सामाजिक, आर्थिक राजकीय ऐतिहासिक पत्मक धारिक अंगाने केला होता. यामुळे आशिया खंडातील अभ्यासकांमध्ये वंचितांच्या अभ्यास आकर्षण निर्माणले अभिजन इतिहास लेखनाला विरोध करुन सबाल्टर्न जाणीवस्थानी नासलेखन काणे हे समालभर्न स्टडीजचे उद्दीष्ट आहे सबाल्टर्न चळवळीचा उदय पाया शोषणाचा प्रतिकार करण्यासाठी गौतम भा यांनी फोर रिबेल्लस ऑफ १८५७ गाणे हमालच्या नेतृत्वाखाली याच्या स्वरुपाचे वर्णन केले. पार्थ चटणी यांनी सोमती सत्ता पद्धती याचे विवेचन करुन समुदाय सत्ता पद्धतीचा वापर वंचितांच्या प्रतिकारासाठी केला गेला .डेव्हीड अर्नाल्ड यांनी प्लेग काळातील बैद्यकीय तपासनीच्या येत्रो कसा संघर्ष सुरु झाला हे दाखवून दिले आहे.

वंचितांचे भारतीय संदर्भ :

प्रस्थापित अभिजन वर्ग आहे तो एका बाजुला व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असतो तर दुसऱ्या बाजुला सत्ता संबंधाच्य उत्तरंडीमध्ये सर्वोच्च स्थानी असतो. डॉ. राममनोहर लोहिया यांनी उच्च जाती, उच्च वर्ग आणि अंग्रजो शिक्षीत वर्ग चांना सत्तताधरी संबोधले. फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेऊन कनिष्ठ व बहुजन जातीचे सरे आपल्या मानवी हक्कासाठी उभे राहू लागले. १९८० नंतर मंडल आयोगामुळे ओ.बी.सी. जातीचे संघटन आणि राजकीयकरण झाले जातीतील पूर्वी होऊ गेलेले महापुरष, जातीचे प्रतिके आणि जातीचे नाव यांचा वापर करून नात संघटनांचा उद्याय होऊ लागला. या जात संघटना जात सदस्यांचे आर्थिक हितसंबंध, जात अस्मिता (ओळख) आरक्षण व मागण्या राज्यसंस्थेकडे हट्टाने पुढे रेटु लागल्या. राजकीय उमेदवारी समारंभ यातुन सामाजिक राजकीय प्रबोधने होऊ लागली.

भटक्या विमुक्त समाजातील वेगवेगळ्या जमातीचे अधिवेशन भरु लागले उदा. कैकाडी, वडार, पारधी, वैदू. १९८५ साली शंकरराव खरातांच्या अध्यक्षतेखाली झलेलया अधिवेशनात भटक्या विमुक्तांच मागण्यांचा जाहीरनामा तयार करण्यात आला. वंचित समुहांचे लढे अधिक तिव्र झाले. दलित पँथर, नक्षलवादी चळवळ, युवक क्रांती दल, समता आंदोलन या संघटनांनी जहाल राजकारणाचा आग्रह धरला. नक्षलवाद्यांनी तर हिंसक कोतोला पर्याय नाही असा निर्वाळा दिला. पक्षिय आणि संसदिय राजकार हे शेवट प्रस्थापीत व्यवस्थेतच सामावले शाते म्हणून आपण बिगर संसदिय राजकारण केले पाहीजे असा या समुहाचा निर्धार होता. बाथा आढावांनी अंगमेहनती असंघटित कष्टकरी वर्गाचे धरण ग्रस्तांचे व जाती निर्मूलनाचे लढे उभे केले. महात्मा फुलेंनी स्त्रियांना क्षुद्रतीक्षुद्र असे संबोधुन वर्गाचा अंतर्भाव वंचित घटकांमध्ये केला.

१९९० नंतर भारताने जागतीकीरण, खाजगीकीकरण आणि उदारीकरण स्विकारले. नव भांडवलशाहीचे हे पर्व सुरु होताच पारंपारिक भारतीय उद्योग बंद पडण्याची प्रक्रिया सुरु झाली. यातुन बेरोजगरांचा एक मोठा वर्ग वंचत समुह म्हणून तयार झाला. विस्थापन, विपन्नता, स्थलांतर, उध्वस्तीकरण आणि असुरक्षीतता या रुपात वंचिताता आली. वंचित कामगारांमध्ये दुर्लक्षीत राहिलेला असंघटीत कामगारांची बंचति चळवळ होय. हॉटेल कामगार, वॉचमन, निरोपे, फोन बुथधारक, काचपत्रा गोळा करणारे, अंगमेहनतीचे कामगार, घरगुती कामगार, मोलकरणी, फेरीवाले विक्रेते, सफाई कामगार, शेतमजूर, बांधकाम मुजरे, विडी कामगार, वीटभट्टी, काचकाम, धातुकाम, उसतोड कामगार, इत्यादी यांचे संघटन होउन हितसंबंधाच्या बाबतीत जागृत व सक्क्रीय झाले.

वंचित समूहा पुढील आव्हाने :

भारतामध्ये वंचित समूह जागृत आणि कृतिशील होत असले तरी पुढील अडथळे दुर्लक्षित करता येणार नाहीत.

1. स्थानिक, राष्ट्रस्तरीय क्षेत्रीय आणि वैश्विक अशा चार स्तरांवर वंचित समूहाच्या राजकारणाने आपली उपस्थिती लावणे आवश्यक आहे.
2. वंचितांच्या चळवळीची व संघर्षाची संख्या वाढत आहे पण त्याच्या अविष्कार बऱ्याचदा फुटकळ स्वरूपात होताना दिसतो. त्याचे कालानुरूप संस्थीभवन होण्याची गरज आहे.
3. कम्युनिटी पातळीवर राजकारण उभी करणारी मंडळी अस्मितेच्या राजकारण नाचे बळी ठरते आहे कारण अनेक वंचित बहुजन जातीचे राजकारण यांचे उदाहरण आहेत.
4. वंचित लढे आज जन आंदोलनाच्या रूपात काही वेळेस नवसमाजिक चळवळी, राज्यपुरस्कृत चळवळी, बिगर शासकीय संघटना क्रांतिकारी राजकारणाच्या वाहक या स्वरूपात व्यक्त होतात. परंतु सामाजिक प्रगल्भता वैचारिक परिपक्वता आणि क्रियाशील बंधुता ही त्रिसूत्री अमलात आणणे आवश्यक आहे.
5. वंचित समूहाच्या चळवळीचे स्थानिकीकरण, एकत्रीकरण व अलगीकरण होत आहे ते थांबले पाहिजे.

थोडक्यात सबाल्टर्न स्टडीज ही पाश्चात्त्य संकल्पना २० शतकाच्या पूर्वार्धामध्ये झाली असली तरी भारतामध्ये फुले, शाहू ,आंबेडकर ,पेरियार इत्यादी समाजसुधारकांच्या माध्यमातून १९ व्या शतकात मध्येच भारतात सुरू झाली होती. त्यामुळे भारतातील वंचितांच्या चळवळीला व्यापक संदर्भ आहे.

संदर्भ :-

१) पळशीकर सुहास ,२००८, वंचितांचे चळवळी ते जाणकारांच्या एन .जी .ओ .CAS , पुणे.

२) डॉक्टर शांता कोठेकर _ इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान.

३) डॉक्टर प्रभाकर देव_ इतिहास एक शास्त्र .

४) सुमंत यशवंत २००५, वंचित समूह सद्यस्थिती आणि भवितव्य ,आंबेडकर अकादमी सातारा.

५) प्रा.डॉ.जालिंदर भोसले _इतिहासाची ओळख

ब्रिटिशांचे भारतात प्रान्तीय व केंद्रीय प्रशासन धोरण

डॉ. पी. बी. सिरसट

नवगण कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,परळी वै.जि.बीड ४३१५१५

प्रास्तविक :

ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारने भारतातील अनेक राज्यांना आपल्या राजकीय वर्चस्वाखाली आणल्या नंतर आपली मनमानी करण्यास सुरुवात केली. ईस्ट इंडिया कंपनी ही खाजगी संयुक्त भांडवलदारी संस्था होती. या वरुन या कंपनी मुळ काय होते हे लक्षात येते. एकादा भूप्रदेश काबीज करुन आपली प्रशासकीय दडपशाही करण्यास सुरुवात होत असे. प्रशासन करीत असताना खबरदारी घेण्यात येत असे. ती म्हणजे जनतेचा रोष येता कामा नेय व राजकीय अंसतोषाला तोंड द्यावे लागेल याची पूर्ण काळजी घेण्यात येत असे. भूप्रदेशातील शेवटी सामान्य जनतेच्या गरजा पूर्ण करण्यात ईस्ट इंडिया कंपनी अपयशी झाली. त्याचा परिणाम १८५७ चे बंड झाले. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला कंपनी ही सार्वभौम राज्यकर्ती बनली. व राज्यकर्त्यांची प्रशासकीय यंत्रणा लोकांच्या अंगवळणी पडण्यास सुरुवात झाली. या यंत्रणेचा वापर करुन कंपनीने स्वत:ची केंद्रीय आणि प्रंणतिय प्रशासन यंत्रणा हळूहळू उदयाला आली. १८३३ ला भारताचे केंद्रीकरण झाले. सगळा भारत देश एक संघ आशा शासकीय कायद्याच्या अमलाखाली पूर्ण भारत आणला गेला.

नवी राजवट ''ब्रिटिश राज'' म्हणूनच ओळखली जाऊ लागली. नवी राजवट दोन पातळीवर आधारलेली होती. १) वरची पातळी ही प्रमुख्याने इंग्लंड मधील भारत देशचे प्रशासन निट चालले का नाही हे पाहणारी होती. तीला ''होम गव्हर्नमेंट'' असे म्हणत असे. त्याखालच्या स्तरावर प्रत्यक्ष भारतामध्ये प्रशासन करणारी पातळी होती. त्याला भारताचे केंद्रीय सरकार म्हणत असत. केंद्रीय प्रशासनामध्ये मध्यवर्ती कार्यालय सार्वजनिक वाहतूक आणि सार्वजनिक कामे दळणवळण,न्यायालये,सर्वेक्षण, अर्थ, ग्रह, प्रशासन अनेक विभागाचा समावेश करण्यात आलेला होता.

प्रान्तीय प्रशासना बाबत जॉन स्ट्रॅची यांनी आपली भूमिका मांडताना असे म्हटले आहे की, ''उत्तम प्रशासनाचा प्रथम आवश्यक भग म्हणजे प्रशासन भक्कम व मजबुत असणे. त्याची भारता सारख्या देशांत तर याची फार गरज आहे. प्रशासना भक्कम असण्यासाठी प्रथम सर्व अधिकारांचे केंद्रीकरण झाले पाहिजे. दैनंदिन कारभाराच्या जिल्हा पातळीवरील घटकामध्ये जिल्हाधिकारी महत्वाचा घटक असतो. प्रत्येक जिल्हाचे अनेक प्रशसकीय उपविभाग करण्यात आले. अशा उपविभागाला तालुका अथवा तहसील म्हणत. त्याचा प्रमुख हा तहशील किंवा मामलेदार या नांवाने ओळखा जात असे. यांच्या अखत्यारीत अनेक ग्रामीण भागाचा समावेश केलेला होता.

उद्दिष्टें :

१. ब्रिटिशांच्या प्रांतिक प्रशासपध्दतीचे स्वरुप लक्षात येईल.
२. ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रांतिक प्रशासनाचे स्वरुप लक्षात येईल.
३. १८५८ मधील सत्तांतरानंतर प्रातिक प्रशासनात करण्यात आलेल्या बंदलांची कल्पना येईल.?
४. ब्रिटिश शासनाच्या प्रमुख ध्येयधोरणांचा परिचय होईल.
५. केंद्रीय शासनातील विविध घटक व त्यांचे कार्य स्पष्ट करुन सांगता येईल.
६. केंद्रीय मध्यवर्ती प्रशासन कोणत्या स्वरुपाचे होते. याची कल्पना येईल.
७. प्रशासकीय यंत्रणेतील नोकरशाहीची भरती कशी होत असे. हे सांगता येईल.

भारतातील प्राचीन तसेच मध्ययुगीन प्रशासन व्यवस्थेत ब्रिटिश काळात फार मोठया प्रमाणात बदल झाला ब्रिटिश भारतात आल्यावर ब्रिटिश सरकारने केलेले वेगवेगळे कायदे आणि महत्वाचे नियम हे कारणीभूत आहेत. इंग्रजांनी इंग्लड मधील जी शासन व्यवस्था होती ती भारतात लागू केली. या पध्दतीचा भारतातील ग्रामीण आणि शहरी भागावर परिणाम झाला. शहरी स्थानिक संस्थाची शासन निमिर्ती केली. इंग्रजानी खेडयाऐवजी जिल्हा हा स्थानिक प्रशासनाचा घटक बनवण्यात आला. ग्रामीण भागातील स्थानिक कार्यचित जबाबदारी जिल्हयाच्या समितीवर

टाकण्यात आली. आणि या समित्यांनी कर व उपकर गोळा करण्यास सुरुवात केली. या समितीचा अध्यक्ष जिल्हाधिकारी असे. ब्रिटिश सरकारने स्थानिक लोकांकडून पैसा गोळा करण्याकरीता आर्थिक विकेंदीकरणाच्या तत्वाचा स्विकार करण्यात आला. पुढे रॉयल विकेंद्रीकरण आयोगाच्या शिफारशी नुसार 'खेडे' या स्थानिक शासनाच्या आधारभूत घटका प्रमाणे प्रत्येक खेडयासाठी ग्रमपंचायत निर्माण झाली.

स्थनिक स्वराज्य संस्थेच्या प्रयोगाने प्रशासन लोकांभिमुख करण्याच्या ब्रिटिश शासनाच्या धोरणला तळापर्यंत नेऊन पोहोचवण्याचे काम केले. स्थानिक स्वराज्य संस्था स्वतंत्र्य व स्वायत बनवून त्यांना पूर्ण पणे भारतीय स्वरुप देण्यात आले. भारतीयांना आशा स्वरुपाच्या संस्थामधून कार्य करण्याची मोठी संधी मिळाली. प्रस्ताव मांडणे , त्याच्या बाजूने जनमत तयार करणे जनतेचे हित पाहणे. कार्यक्षेत्र निश्चित करणे. लोकशाही संस्थेमधून एकत्रित काम करणे या कामकाम पध्दतीचे अशा संस्था मधून भारतीयांना प्रशिक्षण मिळाले.

प्रान्तीय शासनाच्या मध्यवर्ती प्रशासनामध्ये या प्रमाणे धोरणत्मक निर्णय घेण्याचे काम काज चालत असे तेथे कार्यकारी परिषदेच्या बैठकांमधून धोरणत्मक निर्णय घेण्यात येत असत. प्रशासना मध्ये वेगवेगळया खात्याचा समावेश होता. त्यामध्ये उद्योग, व्यवसाय, अर्थ, शेती, महसूल, सर्वजनिक बांधकाम, अंतर्गत वाहतुक, ग्रह, वनखाते, न्यायव्यवस्था या खात्याचा समावेश करण्यात येत असे.

प्रान्तीय सनदी सेवाचा यात अंतरभाव केला जात असे. भारतीय सनदी सेवे मध्ये नेमणुका करताना स्पर्धा परिक्षांचा वापर करण्यात येत असे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रशासकीय कामे वाढली. नवीन राजवटीने विविध प्रकारची फेररचना करुन नवे नवे प्रान्त निर्माण करण्यात आले. प्रान्तांची संख्या वाढवण्यात आली. प्रान्तीय प्रशासनाचा कार्यभार पाहण्यासाठी वेगवेगळया पदाची निर्मिती करण्यात आला. त्यातूनच प्रांतिक सनदी सेवा श्रेणीचा मोठया प्रमाणात उदय झाला. व या पदावर भारतीय लोकांना वाव देण्यात आला. प्रांतिक सनदी सेवा श्रेणीच्या उदयाने ''सनदी सेवा'' व करारबध्द सेवा हा वाद कमी करण्यात आला. या सेवेमुळे विविध जाती धर्म, वंश यातील विविध युवकांना आपली कार्यक्षमता, बुध्दीमत्ता दाखवण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रशासनातील विशिष्ट जाती जमातीची मक्तेदारी रोखण्यात महत्वाची मदत झाली. भारत सरकार म्हणजेच भारताचे मध्यवर्ती असे केंद्रीय प्रशासन होय ब्रिटिशांनी आपल्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये अंतर्गत नियंत्रण देखरेख व समतोल निर्माण करण्याची व्यवस्था होती.

१७७३ च्या नियामक कायद्याद्वारे केंद्रीय कार्यकारी परिषद स्थापन करण्यात आला. या कायद्यानुसार बंगालचा गव्हर्नरला कंपनीच्या भारतीय प्रदेशाचे गव्हर्नर जनरल बनवण्यात आले. आणि त्याला मदत करण्यासाठी ४ सदस्याची परिषद स्थापन करण्यात आली. गव्हर्नर जरनलच्या कॉन्सिलचे सर्व निर्णय बहुमताने घेतले जातील. हा ठराव परित करण्यात आला.

कौन्सिलचे सदस्य आपआपल्या अखत्यारीतील केंद्रीय प्रशासनाच्या विभागांचे प्रमूख होते. त्यांची सामान्य कर्तव्ये सल्लागारापेक्षा प्रशासकासारखी होती. प्रत्येक सदस्य मंत्र्याप्रमाणे त्याच्या विभागाचा राजकीय प्रमुख होता. आणि त्याच्या विभागात कायमस्वरुपी कर्मचारी मोठया संख्येने होते. ज्यांचे सर्वाच्च अधिकारी स्थायी सचिव होते. खूप वरिष्ठ आणि अनुभवी युरोपीयन अधिकारी होते. या प्रमाणे केंद्रीय प्रशासन व्यवस्था होती.

भारत सरकार म्हणजेच भारताचे मध्यवर्ती असे केंद्रीय प्रशसन होय इंग्लडमधील उमराव, जमीनदार अशा उच्च लोकांच्या मधूनच व्हॉयसरॉयची निवड करण्यात येत असे. पारंपारिक प्रथे प्रमाणे केंद्रीय सरकारचे सर्व निर्णय कार्यकारी परिषदे मध्ये विचारविनीमय व चर्चा करुन होती जात असे. या बैठकिच्या माध्यमातून प्रशासकीय धोरणे आखली जात असे. त्यावर सखोल विचारविनिमय होत असे. पंरतू नव्या राजवटीमध्ये ही प्रक्रिया इतिहासजमा झाली.

भारत सरकारचे प्रशासन चालवण्यासाठी लागणारा सर्वच स्तरावरील नोकरवर्ग ब्रिटिश जनतेमधून निवडण्यात येत असे. हे सनदी, मुलकी नोकरशाहीचे ब्रिटीशीकरण म्हणजे लॉर्ड कार्नवालिस यांच्या कारकिदीपासून अमलात आलेले धोरण होते. १८५७ च्या प्रतिक्रियेमध्ये या धोरण विरुध्दी ही प्रक्रिया ही होती. भारतीयांच्या या भावनेवर फुंकर घालण्याच्या हेतून असेल या किंवा एक व्यावहारिक तडतोड म्हणून असेल. पण भारतीयांना नोकरशाही मध्ये

मर्यादित प्रमाणावर प्रवेश मिळू लागला होता नोकरशाहीचे विशेषत वरच्या चौकटीतील नोकरशाहीचे स्वरुप हे बऱ्याच अंशी ''युरोपीय'' राहिले ते जानीवपूर्वक राखले गेले. या धोरणावर वंशश्रेष्ठत्वाच्या कल्पनेचाही प्रभाव होता. ज्या भारतीयांची उच्चपंदासाठी निवड होत असे. त्यांच्यातसुध्दा उच्च जातींच्या उमेदवारांचे प्रमाण मोठे आढळते म्हणजे या पातळीवरील उच्चनीयतवाचा मुध्दा उपस्थित होऊ शकतो.

कायदेमंडळासारखे लोकप्रिय माध्यम भारतीयांना आपल्या आशा आकाक्षांचे केंद्रस्थान बनवण्यात मदत झाली. राष्ट्रीय चळवळीला आपल्या मागण्याप्रमाणे कायदेमंडळाच्या 'भारतीय करणावर' भर देता आला. या विषयाचे ठराव प्रत्येक अधिवेशनाच्या प्रसंगी या ठरावाच्या प्रति सर्व शासन प्रमुख्याना देण्यात येत असत. ब्रिटिश नोकरशाहीची ''पोलादी चौकट'' १९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये ब्रिटिश राजवटीत शासकीय कामाचा व जबाबदारीचा बोजा मोठया प्रमाणावर वाढला. त्यांला तोंड देण्यासाठी शासनाने विविध खाती व विभाग तयार केले. प्रशासनाचे केंद्रीय, प्रतिक व दुय्यम असे स्तर निर्माण केले. त्यामुळे शोकरशाहीची एक भक्कम व शिस्तबध्द अशी रचनात्मक चौकर निर्माण झाली. नियमावर बोट ठेवून अंत्यत काटेकोरपणे वागणारी ही नोकरशाही जनकल्याण व जनतेच्या सोयी सुविधांची कायदे करण्याचे टाळत असत या बंदिस्तपणामुळे ब्रिटिश नौकरशाही ''पोलादी चौकट'' म्हणून ओळखली जाऊ लागली.

सारांशः

१. १८५७ च्या प्रक्रियेमधून योग्य बोध घेऊन ब्रिटिशंनी भारतीय वसाहतीचे प्रशासन आपल्या हातात घेतले.
२. नेकरशाहीचा परसारा उभारुण शिस्तबध्द, काटेकोर व नियमाप्रमाणे काम करणारी ही नोकरशाही म्हणजे ''पोलादी चौकट'' ठरली.
३. कायदेमठळसदृश संस्थेचा भारतामध्ये विकास झाला भारतीयांना राष्ट्रीय चळवळीसाठी सनदशीर मार्गाने चळवळ उभी करण्याचे नवे क्षितीज त्याद्वारे निर्माण झाले.
४. प्रांतिय कायदेमंडळीची निर्मिती करण्यात आली. त्यामधून शासन लोकाभिमूख व लोकप्रिय करण्याचा प्रयोग करण्यात आला.
५. प्रांतिक प्रशासनाचा खरा महत्वाचा घटक व आत्मा म्हणजे जिल्हाधिकारी होय. कायदा सुव्यवस्था, महसुलाची चोख व्यवस्था, कायद्याची न्याय जिवाडा पध्दती अवलंबून होती.
६. प्रांतीय प्रशासनामध्ये वाढझाल्यावर त्यामध्ये विविध खाती विभाग सुरु करण्यात आले. त्यामुळे सनदी सेवा श्रेणीचा उदय झाला.

संदर्भ :

१. भारतीय स्वातंत्र्य संग्राम – अ.रा.कुलकर्णी
२. कथा स्वातंत्र्याची – केतकर कुमार
३. माझी कायदे मंडळातील कामगिरी – न.वि.गाडगील
४. आधुनिक भारत – जावडेकर शं.द.आचार्य
५. दि कोर्स ऑफ लाईफ– डॉ.चितामणराव
६. प्रांतिक कायदेमंडळाचे कामकाज– के.टी.गिरमे
७. भारतीय राज्यघटनेचा इतिहास– स.मा.गर्गे

महिला साक्षमिकरण व सरकारच्या महिला योजना

प्रा. डॉ. उन्मेश अजाबराव घुगे
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशीम

प्रस्तावना -

महाराष्ट्रातील महिलांसाठी निघालेल्या विविध योजना आहेत त्या सर्व योजनांची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांसाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनाबाबतची माहिती. राज्य किंवा केंद्र सरकारकडून महिलांसाठी विविध योजना राबविण्याचा मुख्य हेतू म्हणजे तो असा की महिलांना त्यांना त्यांच्या पायावर उभे राहता याव जेणे करून त्यांना त्यांच्या कुटुंबाची व इतर मुलभूत गरजा त्यांना स्वतः भागवता येतील. या विविध बाबींचा विचार करून महिलांच्या कामाशी निगडित असणारे काम जसे शिवणकाम, विन काम, अशा अनेक योजनाचा समावेश महिलांसाठी शासनाकडून करण्यात आलेला आहे. अजून महिलांना व्यवसायासाठी प्रवृत्त करुन त्यांना स्वावलंबी बनवणे, त्यांच्या समक्षिकरणाला चालना देणे हा शासनाचा महिलांसाठी विविध योजना राबविण्याचा उद्देश आहे. तसा विचार केला तर मुलिंना समाजामध्ये कमी मान दिला जातो. लहानपणापासून त्यांच्यावर दबाव टाकला जातो, घराबाहेर जाऊ देत नाहीत यामुळे त्यांना सुद्धा पुरुषाप्रमाणे सन्मान मिळावा यासाठीच महाराष्ट्रातील शासनाकडून महिलांसाठी १२ योजना राबवल्या जात आहेत. तर या ज्या काही गोष्टी आहेत त्या सर्व गोष्टींचा विचार करूनच महाराष्ट्र सरकारने या १२ योजनांचा विचार केला आहे.

महिलांसाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना कोणकोणत्या आहेत. यामध्ये बघा सर्वात आधी महिलांसाठी कोणत्या योजना राबविल्या जातात. मोठ्या प्रमाणावर महिलांसाठी योजना राबविल्या जात आहेत आणि ते राज्य व केंद्र सरकारकडून राबविल्या जातात. त्यामध्ये व्यवसायासाठी महिलांना कर्ज देणार्या योजना आहेत, महिलांना व्यवसायासाठी उपकरण किंवा वस्तू देणार्या योजना आहेत, महिलांना प्रवासात सूट देणार्या योजना आहेत, महिलांना प्रसुतीपश्चात लाभ देणार्या योजना, मुलींना लाभ देणार्या योजना, गर्भवती महिलांसाठी योजना अशा विविध योजनेचा समावेश महिलांसाठी या योजनेमध्ये केला आहे. आता आपण या लेखाच्या माध्यमातून महिलांसाठीच्या ज्या १२ विवीध योजना आहेत त्या योजनेची माहिती खालीलप्रमाणे-

1. लेक लाडकी योजना
2. महिला उद्योगिनी योजना
3. स्वर्णिमा योजना
4. उद्योजक धोरण योजना
5. महिला सन्मान योजना
6. महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना
7. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना 2.0
8. माझी कन्या भाग्यश्री योजना
9. सुकन्या समृद्धी योजना
10. जननी सुरक्षा योजना

11. महिला समृद्धी कर्ज योजना
12. लाडकी बहीण योजना

○ **महाराष्ट्र राज्यातील महिलांसाठी योजना पुढील प्रमाणे आहेत**.

1] लेक लाडकी योजना :

ही योजना आपल्या सर्वांना माहीतच आहे. तर बघा महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच मुलांचा मृत्यूदर कमी करण्यासाठी व मुलिंना सशक्त व प्रबळ व आत्मनिर्भर बनविण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प 2023 सादर करताना लेक लाडकी योजना ही सुरू करण्यात आली.या योजनेच्या माध्यमातून गरिब कुटुंबातील म्हणजेच ***पिवळ्या व केशरी राशन*** असलेल्या कुटुंबातील मुलिंना जन्मापासून ते वयाच्या 18 वर्षापर्यंत 1 लाख 1 हजार रुपये देण्यात येणार आहेत. ही महत्वपूर्ण माहिती महाराष्ट्रातील जे लहान मुली आहेत त्यांच्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. त्याचप्रकारे राज्यातील मुलिंचा जो मृत्यूदर , मुलींना शिक्षणासाठी चालना देण्यासाठी ही महत्वपूर्ण योजना सुरू केली आहे. तसेच या योजनेअंतर्गत 1 लाख 1 हजार रुपये प्रत्येक लेकीला,मुलीला दाणेदार म्हणून दिला जात आहे. ही योजना फक्त मुलींसाठी काढण्यात आली आहे. यानंतर दुसरी योजना म्हणजे ती आहे महिला उद्योगिनी योजना आहे.

२] महिला उद्योगिनी योजना :

तर या योजनेच काम काय आहे बघुया. प्रत्येक महिलांना समाजात मानाच स्थान मिळाव, तसेच विविध व्यवसायामध्ये सुध्दा महिला या सक्षम व्हाव्यात यासाठी शासनाकडून फक्त महिलांसाठी या योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यापैकी एक योजना म्हणजे ती ही महिला उद्योगिनी योजना आहे. ही महाराष्ट्रातील एक महिला कर्ज योजना असुन ती सदर योजनेच्या माध्यमातून योजनेच्या माध्यमातून लघुव्यवसायीक क्षेत्रातील व्यावसायिक, किरकोळ विक्रेते,उत्पादक किंवा स्वयंरोजगार करू ईच्छिणार्या महिलांना व्यवसाय करण्यासाठी जास्तीत जास्त 3 लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देणे. महिलांना त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी, उद्योगिनी वाढवण्यासाठी ही योजना महाराष्ट्र सरकारने सुरू केलीली आहे तर येथे तुमचा व्यवसाय सुरू करण्यासाठी सरकारकडून आर्थिक मदत केली जाते. नंतरची योजना आहे.

3] स्वर्णिमा योजना :

तर स्वर्णिमा योजना म्हणजे काय बघा. स्वर्णिमा योजना ही महिला स्वयंरोजगार योजना अंतर्गत येणारी महत्वपूर्ण योजना आहे तसेच सदरची योजना न्याय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाकडुन मागासवर्गीय उद्योजक महिलांसाठी ते राबविण्यात येते तसेच या योजनेच्या माध्यमातून महिलांना उद्योगासाठी 2 लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येतो. महिलांना व्यवसायासाठी नॅशनल बॅकवर्ड क्लासेस फायनान्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NBCFDC) यांच्याद्वारे कमी व्याजदारावर कर्ज उपलब्ध करून दिला जातो.

यामध्ये महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी, रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी येथे NBCFDC ही जी कार्पोरेशन फायनान्स कंपनी आहे या कंपनीकडून त्यांना कर्ज उपलब्ध करून दिला जातो आणि खूप कमी व्याजदारावर येथे त्यांना कर्ज उपलब्ध करून दिला जातो. 2 लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येतो.

जेणेकरून त्यांना स्वतः चा व्यवसाय सोप्या पद्धतीने सुरू करता येईल. नंतरची योजना आहे उद्योजक धोरण योजना.

४] उद्योजक धोरण योजना :

पुरुषांप्रमाणेच महिलांना सुद्धा प्रत्येक क्षेत्रामध्ये समान स्थान मिळावे यासाठी शासनाकडून महिलांसाठी ही कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमधून सूद्धा महिलांना त्यांच्या स्वतःच स्थान मिळाव यासाठी शासनाकडून ही कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. तर या योजनेमधून सूद्धा महिती या योजनेमधून सूद्धा महिलांना त्यांच स्वतः च व्यवसाय सुरू करण्यासाठी 20 लाखापासुन ते 1 कोटी रुपयापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिला जातो ही मोठ्या धोरणावर सुरू करण्यात आलेली महाराष्ट्र शासनाची महत्वपुर्ण योजना असणार आहे. या नंतरची योजना आहे महिला सन्मान योजना.

५] महिला सन्मान योजना :

या योजनेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये जाहीर करण्यात आलेल्या लेक लाडकी योजनेसह महिलांसाठी विविध योजनांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामधील एक योजना म्हणजे महिला सन्मान योजना ही आहे. ST प्रवासामध्ये विषेश महिलांसाठी 50% सुट देण्याची महिला सन्मान योजना सुरू करण्यात आली.

६] महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना :

या योजनेमध्ये जर एखाद्या महिलेच्या पतीचा अकस्मात किंवा इतर कारणांमुळे मृत्यू झाला असेल, अशा महिलांना समाजात वावरताना अनेक अडचणींना समोर जावे लागत आहे ही गोष्ट लक्षात घेऊन विधवा महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी व स्वतःच्या बळावर आपल आयुष्य जगण्यासाठी राज्यशासनाच्या महिला कल्याण विभागाकडून विशेष विधवा महिलांसाठी ही विधवा पेन्शन योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेतुन विधवा महिलांना दर महिन्याला 1,000 रुपये पेन्शन राज्य शासनाकडून देण्यात येतो. या पुढची योजना आहे प्रधानमंत्री मातृ वंदना योजना 2.0.

७] प्रधानमंत्री मातृ वंदना योजना 2.0 :

सदर या योजनेत शासनाकडून प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेअंतर्गत ज्या गरोदर महिला आहेत आणि ज्या स्तनदा माता आहेत त्यांना 5,000 रुपयांची आर्थिक मदत या योजनेद्वारे केली जाते. प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना ही केंद्रशासनाची योजना असुन ही योजना महिला आणि बालविकास मंत्रालयामार्फत चालविण्यात येते.तसेच गरोदर महिलांना या योजनेची रक्कम तिन टप्प्यामध्ये देण्यात येते. यापुढील योजना आहे माझी कन्या भाग्यश्री योजना.

८] माझी कन्या भाग्यश्री योजना :

1 मे २०१७ पासून महाराष्ट्र शासनाकडून मुलींचा जन्मदर प्रमाण सुधारण्यासाठी , स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी माझी कन्या भाग्यश्री योजना ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजने केली जाते.च्या माध्यमातून मुलीच्या जन्मानंतर 1वर्षाच्या मध्ये पालकांनी जर दुसरी मुलगी जन्मल्यापासून 6 महिन्याच्या मध्ये नसबंदी केल्यास त्यांना 50,000 हजार रुपयांची रक्कम शासनाकडून मुलांच्या नावावर बॅक खात्यात जमा केली जाते. ही योजना महाराष्ट्र सरकारने 2017 पासून सुरू केली आहे.

९] सुकन्या समृद्धी योजना :

22 जानेवारी 2015 पासून पालकांना आपल्या मुलांसाठी असलेली चिंता दूर करण्यासाठी शासनाकडून ही सुकन्या समृद्धी योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. ही योजना केंद्र सरकारची आहे आणि या योजनेअंतर्गत मुलीच्या पालकांना 250 रुपयांपासून 1.5 लाखापर्यंत गुंतवणूक करता येते. यामध्ये मुलीच्या भविष्यासाठी फायदा व्हावा म्हणून 7.6% व्याजदार दिला जातो. या पुढे आहे जननी सुरक्षा योजना.

१०] जननी सुरक्षा योजना :

जननी सुरक्षा योजना देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी याच्याकडून गरिब कुटुंबातील गरोदर महिलांना आर्थिक मदत करण्यासाठी ही सुरक्षा जननी योजना सुरू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून दारिद्रय रेषेखालील गर्भवती महिलांना शासनाकडून 1400 रुपये आर्थिक मदत करण्यात येते. याशिवाय गर्भवती महिलांना मदत करणार्या अशा संयोगिता प्रसुती प्रोत्साहनासाठी 300 रुपये आणि प्रसुतीनंतर सेवा प्रदान करण्यासाठी 300 रुपये इतकी रक्कम देण्यात येते.

११] महिला समृद्धी कर्ज योजना :

महिला समृद्धी कर्ज योजना ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व सहाय्य विभागाकडून विशेषतः महिलांसाठी राबविण्यात येणारी व्यावसायिक कर्ज योजना आहे. महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी व त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी ही महिला समृद्धी कर्ज योजना काढण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वतः चा उद्योग , व्यवसाय सुरू करण्यासाठी 5 लाख ते 20 लाख रुपयापर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. येथे 4% व्याजदरावर कर्ज उपलब्ध करून दिला जातो आणि परतफेडीचा कालावधी 3 वर्षाचा असते. तर अशा प्रकारे महिलांसाठी निघालेल्या या काही योजना आहेत.

१२] लाडकी बहीण योजना :

महाराष्ट्र शासनामार्फत राबवली जाणारी योजना लाडकी बहीण योजना आहे २०२४ च्या अंतरिम अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या योजनेची घोषणा केली आहे महाविकास अघाडी सरकार च्या काळात ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील महिलांना प्रति महिना १५०० रुपये मिळणार आहेत. ही योजना महिलांन सशक्त व एक आर्थिक मदत मिळावी म्हणून ही योजना शासनामार्फत सुरु करण्यात आली आहे.या योजनेची सुरवात १ जुलै पासुन झाली आहे. या योजने अंतर्गत महिलांन या योजनेचा लाभ मिळण्यास सुरवात झाली आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यातील महिला व मुलींना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी तसेच महिला आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी राज्य सरकारची महत्वपूर्ण अशी हि योजना आहे.

निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून महाराष्ट्र राज्य सरकारने अर्थसंकल्पात अनेक योजनांची घोषणा केली आहे, त्यापैकीच एक म्हणजे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही एक आहे.मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना महिलांना आर्थिक सहयोग मिळावा म्हनुण महाराष्ट्र सरकारने आर्थिक स्वरूपात महिलांना सशक्त आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी एक विशेष योजना सुरू करते. या योजनेच्या अंतर्गत हर साल 46,000 कोटी रुपये खर्च केले जातात, एकत्र राज्याची 21 ते 65 वर्षांची महिलांना प्रत्येक महिने आर्थिक मदत प्रदान केली जाते.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना महाराष्ट्र सरकारच्या वतीने लागू करण्यात आली आहे. यामुळे

राज्यातील आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना दरमहा १५०० रुपये त्यांच्या बँकेत जमा होणार आहेत. एक आर्थिक मदत म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरु करण्यात आली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०२४ च्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. यायोजनेअंतर्गत महिलांना शासनामार्फत दरमहा १५०० दिले जाणार आहेते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सात नविन बदल करण्यात आले आहेत.

1. सदर योजनेतून 5 एकर शेतीची अट वगळयात आली आहे.
2. योजनेत लाभार्थी महिलांचे पात्रता वय हे 21 ते 60 वर्ष होते पण आता वयोगट ऐवजी 21 ते65 वर्ष करण्यातआले आहे.
3. इतर राज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत यांच्या पतीचे, जन्म दाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.
4. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अर्ज करण्याची शेवटची मुदत १५ जुलै ठेवण्यात आली होती. नंतर मुदतवाढ देण्यात आली आहे, १ जुलै ते ३१ ऑगस्ट पर्यंत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करु शकतो,दोन महिन्यांची मुदतवाढ आहे.
5. 2.5 लाख रुपयांचा उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर त्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्न दाखला प्रमाणपत्रतून सुट आहे.
6. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत कुटुंबातील महिला पात्र असणारी अविवाहित असेल तरी सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.
7. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत रहिवासी प्रमाणपत्र आवश्यक आहे. असे नमूद करण्यात आले होते पण आता आता लाभार्थी महिलेकडे आधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी 15 वर्षापूर्वीच चे, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला. या चारपैकी कोणतेही ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहे.

निष्कर्ष - महाराष्ट्रात महिलांना अनेक योजनांचा लाभ मिळत असल्यामुळे व आर्थिक सक्षमीकरणामुळे महिलांना संसाधने, मालमत्ता आणि उत्पन्न नियंत्रित करण्याची आणि त्यांचा फायदा घेण्याची परवानगी मिळते . यामुळे जोखीम व्यवस्थापित करण्याची आणि महिलांचे कल्याण सुधारण्याची क्षमता देखील वाढते. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत महिलांच्या सहभागाचे केवळ महिलांनाच नव्हे तर संपूर्ण समाजालाही फायदे आहेत. दर्जेदार शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण आणि सामाजिक न्याय यासह सर्वांचे जीवन सुधारणाऱ्या धोरणांना प्राधान्य देत निर्णय प्रक्रियेत अधिक महिलांना प्रोत्साहन देण्याची वेळ आता आली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

संदर्भ ग्रंथ सूची -

१) महिला सबलीकरण / सक्षमीकरण - डी .ई खोजे
२) महिला धोरण - महाराष्ट्र शासन २००२
३) महिला योजना मासिक - महाराष्ट्र शासन
४) महिला सबलीकरण व महाराष्ट्राचे चौथे महिला धोरण - अभिजित राठोड
५) महाराष्ट्र शासन महिला योजना वेबसाईट

कोरडवाहू शेती : प्रकार, उत्पादन तंत्रे आणि आव्हाने

कुंडलिक केशव काळे

संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.

गोषवारा :

कोरडवाहू शेती हि पर्जन्यधरीत प्रणाली असून ती मर्यादित जलस्त्रोतांवर अवलंबून असते. या पद्धतीमध्ये खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामातील पिके घेतली जातात. बाजरी, ज्वारी, तूर, सुर्यफुल, करडी या सारखी कमी पाण्यावर येणारी पिके घेतली जातात. या पद्धतीच्या शेतीच्या उत्पादनावर वातावरणीय परिस्थितीचा परिणाम दिसून येतो. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, सेंद्रिय खतांचा वापर आणि पाणीपुरवठा तंत्रे वापरल्यास उत्पादन वाढू शकते. हि शेती कोरडी शेती, कोरडवाहू शेती आणि पावसावर आधारित शेती या प्रकारे केली जाते. या शेतीमध्ये पोषण घटक व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, मातीचे व्यवस्थापन आणि पिकांची निवड या प्रकारच्या उत्पादन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. दुष्काळरोधी पिकांच्या प्रजाती जसे ज्वारी बाजरी निवडणे, कृषी वानिकारान्म आणि बारमाही झाड पिकांची लागवड करणे, माहिती तंत्राच्या सहाय्याने पिकांसंदर्भात माहिती घेऊन रोग नियंत्रण करून उतपादन वाढवणे आणि मका, भात आणि मसूर यासारखी हवामानाशी जुळवून घेणाऱ्या पिकांच्या वाणांची निवड करून लागवड करणे. कोरडवाहू शेतीला अधिक संपन्न आणि फायदेशीर करण्यासाठी कृषी संशोधन आणि नवनवीन कृषी साहित्याचा वापर करणे आवश्यक आहे.

१) प्रस्तावना:

कोरडवाहू शेती म्हणजे अशी पद्धती जी अशा भू-प्रदेशामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांचा समावेश करते, की ज्या ठिकाणी शेतीसाठी शास्वत पाणी पुरवठा नसतो किंवा जी शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. म्हणून कोरडवाहू शेतीलाच पावसावर आधारीत शेती असे म्हणतात. हि शेती पद्धती ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता असते, त्या ठिकाणी अतीशय महत्त्व असते. म्हणून कोरडवाहू शेती म्हणजे "कोरडवाहू शेती ही हवामानाच्या बदलावर,विशेषतः पर्जन्यवृष्टीवर अवलंबुन असलेली शेती आहे". (बी.ए. स्टेवर्ड २०१६). "वारंवार ५०० मिमी पेक्षा कमी वार्षिक पर्जन्य असलेल्या भागात पिक उत्पादन म्हणून केली जाते". (गैरी.ए.पीटरसन२०१८). वरील व्याख्या वरून असे दिसून येते की, कोरडवाहू शेतीची उत्पादकता वार्षिक पर्जन्यमान आणि वार्षिक बाष्पीभवन यांच्यातील तुट आकाराशी विपरीतपणे संबंधित आहे. पाण्याची उपलब्धता आणि जमिनीचा फरक यांच्यामध्ये असणारा संबंध यावरून देखील जमिनीचा कोरडवाहू पणा ठरतो. महाराष्ट्रामध्ये जमिनीची उत्पादन क्षमता वेगवेगळी असल्याने १२ जिल्ह्याहून अधिक जिल्हे आणि ९० तालुके दुष्काळाच्या धोक्यात आहेत. (आर.एस.देशपांडे.जुलै २०२०).

आढावा :

Kakde L. B.(May 2019), लेखकांनी बीड जिल्ह्यातील कोरडवाहू शेतीत वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाचा अभ्यास केला आहे. त्यांनी अंबेजोगाई, आष्टी, गेवराई तालुक्यातील १२० नमुना घेऊन अभ्यास केला व तंत्रज्ञानाची माहिती कमी असल्याचे व आर्थिक साक्षरतेसाठी प्रोत्साहन द्यावे आणि अनुदानित यंत्रणा वाढवावी. **डॉ. नीता धर्माधिकारी (फेब्रु,२०२०),** शोधनिबंधातून भारतातील कृषी क्षेत्राची कमी उत्पादकता करणे

आणि उपाययोजना अध्ययन केलेले दिसून येते. शाश्वत कृषी धोरण राबवूनच उत्पादकता वाढवता येईल आणि भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचे भवितव्य उज्ज्वल होईन. **Ramesh Chand (Dec,2019),** या शोधनिबंधामध्ये २१ व्या शतकातील कृषी क्षेत्रातील समस्यांवर सखोल विचार मांडलेला दिसून येतो. या संशोधनातून नवनिर्मिती, शेतकर्यांना शिक्षण, प्रशिक्षण देण्यावर जोर दिला आहे. एकूणच शाश्वत शेती व उत्पादकता सांगड घालून आव्हानांना समोर जाण्यासाठी नवे धोरणात्मक दृष्टीकोन आवश्यक असल्याचे मांडले आहे. **khalil shaha (june,2020),** यामध्ये लेखकांनी महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या विकासाच्या आव्हानांवर प्रकाश टाकला आहे. या अभ्यासातून राज्याला एक सुसंगत कृषी धोरण तयार करण्याचा सल्ला देण्यात आला आहे .जेणेकरून दीर्घकालीन विकास सुनिश्चित करता येईल आणि शेतीचा विकास होईल.**प्रा.किशोर धोटे (फेब्रु, २०१७).** भारतातील शेतीची उत्पादकता व पिक रचनेतील बदलांचा अभ्यास. या शोधनिबंधात भारतीय शेतीच्या उत्पादकतेत आलेल्या बदलांचा सखोल अभ्यास केला आहे**. Plabani Roy (may,2022).** Improved Dryland - Farming Practices. या शोधनिबंधामध्ये कोरडवाहू शेतीची सखोल समीक्षा केली व कोरडवाहू शेतीला टिकाऊ करण्यासाठी तंत्राचा प्रसार आणि सरकार कडून अर्थसहाय्य महत्वाचे आहे. यामुळे उत्पन्नात स्थिरता व ग्रामीण भागाचा विकास होईल. **J. S. Kanwar (1982).** Rainwater And Dryland Agriculture – An Overview. या शोधनिबंधामध्ये कोरडवाहू शेतीसाठी पावसाच्या पडणाऱ्या पाण्याचे महत्त्व, त्याचा प्रभावी वापर आणि विविध भौगोलिक क्षेत्रातील समस्यांसाठी उपाय सुचविले आहेत.

उद्दिष्टे :

कोरडवाहू शेती हा विषय अध्यानासाठी निवडल्यानंतर त्याकरिता खालील उद्दिष्टे समोर ठेऊन सदरील शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

१) कोरडवाहू शेतीचा उत्पादनाचा व आव्हानांचा आढावा घेणे .
२) कोरडवाहू शेतीचे विविध प्रकार व उत्पादन तंत्र अभ्यासणे .
३) कोरडवाहू शेतीची उत्पादकता आणि उत्पादनासाठी तंत्रज्ञानाचा वापराचा अभ्यास करणे .
४) कोरडवाहू शेतीतील आव्हानांचा अभ्यास करणे .

संशोधन पद्धती :

सदरील शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध पुस्तके, शासकीय विभागातील अहवाल, मासिके, वेबसाईट, वर्तमानपत्र आणि शोधनिबंधाचा आढावा इत्यादी साधनाचा वापर करण्यात आला आहे .

कोरडवाहू शेतीचे प्रकार :

१) कोरडी शेती(Dry-Farming):

ज्या भागात वार्षिक पर्जन्यमान 750 मिमी पेक्षा कमी आहे, त्या भागात पिकांची लागवड करणे म्हणजे कोरडवाहू शेती. ७५ दिवसापेक्षा कमी पिक वाढणारा हंगाम म्हणजे पुरेशा जमिनीतील ओलाव्याचा कालावधी असलेले शुष्क प्रदेश पिक उत्पादनासाठी ओलावा संवर्धन पध्दती आवश्यक आहे. पिकांच्या कालावधीत दीर्घकालीन दुष्काळाच्या शक्यता जास्त असतात. कोरडवाहू शेतीच्या परिस्थितीत पिके अपयशी

होण्याचे प्रमाण जास्त असते. कोरडवाहू शेतीचे क्षेत्र रुक्ष प्रदेशाशी समतुल्य असून, या भागात ओलावा जपण्याच्या उपाययोजना महत्त्वाच्या असतात.

२) कोरडवाहू शेती (Dryland Farming) :

ज्या भागात वार्षिक पर्जन्यमान 750 मिमी पेक्षा जास्त आहे, त्या भागात पिकांची लागवड करणे म्हणजे कोरडपट्टी शेती. पिकांच्या कालावधीत कोरडे दिवस येऊ शकतात, पण पिके अपयशी होण्याचे प्रमाण कमी असते. ७५ ते १२० दिवसाच्या दरम्यान वाढणारा कालावधी असलेले हे अर्धमार्ग आहेत. कोरडपट्टी शेतीची क्षेत्रे अर्धरुक्ष प्रदेशात समाविष्ट केली जातात. जमिनीचे व ओलाव्याचे संवर्धन तसेच काळ्या मातीसाठी विशेषत: पाण्याचा निचरा करण्याच्या उपाययोजना आवश्यक आहेत.

३) पावसावर आधारित शेती (Raifed Farming) :

ज्या भागांमध्ये 1150 मि.मी. पेक्षा जास्त पावसाचा वर्षाव होतो, अशा भागांमध्ये पीकशेती करण्याला पावसाधारित शेती म्हणतात. ही शेती प्रामुख्याने ओलसर हवामान असलेल्या भागांमध्ये केली जाते, जिथे पिके अपयशी होण्याची शक्यता कमी असते.या प्रदेश्यात पिकाच्या वाढीचा कालावधी १२० दिवसापेक्षा जास्त असतो परंतु, या भागांमध्ये पाण्याचा निचरा (ड्रेनेज) हा एक महत्त्वाचा प्रश्न असतो. पावसाळ्यात होणाऱ्या अतिपावसामुळे पाण्याचे साचणे टाळण्यासाठी योग्य पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे असते, अन्यथा जमिनीचे नुकसान होऊ शकते आणि पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

३) उत्पादनाचे तंत्र :

अ) पिकांची निवड:

पिकांमध्ये बदल जमिनीची सुपीकता सुधारण्यासाठी आणि कीटक आणि रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी पिक बदल केला जातो. पोषक तत्वांचा योग्य वापर करण्यासाठी आणि कीटकांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकात बदल केला जातो. वैविध्यपूर्ण पिक पद्धती संवर्धन शेती विविध पिकांच्या झाकलेल्या वेळेच्या आवर्तनास प्रोत्साहन देते विशिष्ठ पिकाला लक्ष्य करू शकणाऱ्या कीटक, रोग आणि तणांचे चक्र खंडित करण्यास मदत करते. पिक बदलामुळे मातीची पोषकतत्वे देखील समृद्ध होतात कारण वेगवेगळ्या पोषक तत्वांची आवश्यता असते. शेंगायुक्त पिकात बदल केल्याने जमिनीतील नायट्रोजनची पटली वाढू शकते आणि हवेतून नायट्रोजन निश्चित करण्याची क्षमता वाढते. (कृषीतंत्र, व.ना.म.कृ.वी.प.२०१७).

ब) मातीचे व्यवस्थापन :

कोरडवाहू शेतीत पाणी टिकवण्यासाठी मातीची धूप रोखणे महत्त्वाचे आहे. नांगरणीमुळे पाणी जमिनीत मुरते, उतारावर पायऱ्या पाण्याचा प्रवाह कमी करतात, तर मातीवर थर आच्छादन बाष्पीभवन रोखते. किमान मशागत पिकांचे अवशेष ठेवून धूप टाळते. सेंद्रिय पदार्थ माती सुधारतात, पाण्याची घुसखोरी वाढते व जमिनीची रचना मजबूत होते. (www.agrifarming.in. २३ oct.२०२१).

क) पाणी व्यवस्थापन :

पाणी व्यवस्थापनासाठी पर्जन्यमानाचा वापर, पाणी साठवण आणि अपव्यय कमी करण्यावर भर दिला जातो. पावसाचे पाणी साठवून कोरड्या काळात वापरण्यासाठी टाक्या व तलावांचा उपयोग होतो. ठिबक सिंचनाद्वारे पाणी थेट मुळांपर्यंत पोहोचवले जाते, ज्यामुळे बाष्पीभवन कमी होते. मातीचे आच्छादन राखणे व सेंद्रिय पदार्थ वाढवणे पाण्याची धारणा सुधारते. पावसाचे पाणी, भूजल, सांडपाणी यांच्या एकत्रित वापराने

सिंचनासाठी पाणी उपलब्धता वाढते. पिकांच्या गरजेनुसार आणि स्थानिक पाण्याच्या उपलब्धतेनुसार कार्यक्षम योजना तयार केल्याने पाणी टंचाई कमी होऊ शकते. या पद्धतींमुळे पाण्याचा शाश्वत वापर शक्य होतो. (कृषी विभाग महाराष्ट्र शासन ,विकास्पेडिया २०२०)

ड) पोषण घटक व्यवस्थापन :

सेंद्रिय पदार्थ मातीची सुपीकता राखण्यात महत्वाची भूमिका बजावतात, विशेषतः कोरडवाहू शेती मध्ये जिथे मातीचा ह्रास हा चिंतेचा विषय आहे. सेंद्रिय पदार्थाचा जमिनीला कसा फायदा होतो ते येथे दिसून येते. पोषक तत्वांचा पुरवठा सेंद्रिय पदार्थ पोषक तत्वांचा साठा म्हनून काम करतात,ते विघटीत होताना हळूहळू बाहेर पडतात.हे वनस्पतींना आवश्यक पोषक तत्वांचा स्थिर पुरवठा प्रदान करते आणि पोषक तत्वांच्या मानवापर्यंत धोका कमी करते. (डिसे.२०१४,कृषी पत्रिका).

कोरडवाहू शेतीचे आव्हाणे :

कोरडवाहू कृषी क्षेत्रासमोर खूप आव्हाने आहेत त्यामध्ये काही नैसर्गिक आणि अनैसर्गिक अश्या पद्धतीचे दिसुन येतात.

अ) पाणी टंचाई :

पाण्याशिवाय जीवन अशक्य आहे. वाढत्या लोकसंख्या व औद्योगीकरणामुळे पाण्याचा प्रचंड वापर होतो. भूपृष्ठावरील साठा कमी पडत असल्याने भूगर्भातील पाण्याचा वापर वाढला आहे, पण तो मर्यादित आहे. जंगलतोड, धूप आणि पाणलोट क्षेत्रांतील बदलांमुळे पाण्याचा साठा कमी होत आहे. भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण व दीर्घकालीन व्यवस्थापन गरजेचे आहे. (डॉ.ज.रा.दाभोळे (२०००).

ब) हवामान परिवर्तनशीलत :

हवामान बदलाची लवचिकता शास्वत पद्धती अनेकदा विविधीकरण पिक बदल आणि कृषी वनिकरणावर भर देतात,जे परीसंस्थेची लवचिकता वाढवतात.असे पद्धती कृषी प्रणालींना बदलत्या हवामान परिस्थितीशी जुळवून घेण्यास मदत करतात,ज्यात अधिक वारंवार आणि गंभीर हवामान घटनांचा समावेश होतो.

क) मातीची अधोगती :

मातीचे आरोग्य सुधारणे शास्वत पद्धती,जसे की बिनतोड शेती आणि कव्हर पिक, मातीची रचना,आणि सुपीकता राखणे.

ड) उत्पन्न परिवर्तनशीलत :

उत्पनातील परिवर्तनशीलता वर्षानुवर्षे पर्जन्यमानाचे नमुने खूप लक्षणीय असू शकतात, पावसावर अवलंबून असलेल्या शेतीमध्ये उत्पादनात बदल घडून येतात.चांगल्या पावसाळ्यात भरपूर पिक येते, तर खराब हंगामामुळे उत्पादन कमी होते किंवा पिक निकामी होते.

इ) सामाजिक आर्थिक घटक :

सामाजिक समता शास्वत शेती रोजगाराच्या संधी निर्माण करून, दारिद्र्य कमी करून आणि शास्वत जमीन व्यवस्थापनात मालकी आणि अभिमानाची भावना वाढवून स्थानिक समुदायांना लाभ देऊ शकते. आर्थिक व्यवहार्यता शाश्वत पद्धती शेतमालाची दीर्घकालीन आर्थिक व्यवहार्यता वाढवतात, ज्यामुळे इनपुट खर्च कमी होतो. उत्पादन सुधारते आणि कृत्रिम खते आणि कीटकनाशके यांसारख्या महागड्या बाह्य

इनपुटची गरज कमी होते. आर्थिक उपजीविका कोरडवाहू प्रदेशात राहणाऱ्या लोकांसाठी शेती हा उत्पानाचा प्राथमिक स्त्रोत आहे. कोरडवाहू शेतीचे तंत्र शेतकर्यांना आव्हानात्मक परिस्थितीतही पिकांची लागवड करण्यास सक्षम करते, त्यांना आर्थिक स्थैर्य आणि उपजीविकेच्या संधी प्रदान करतात.

व्युव्हरचना आणि नवप्रवर्तण :

अ) दुष्काळरोधी पिकांच्या प्रजाती :

ज्या पिकांना उगवायला फार कमी पाऊस किंवा सिंचनाची गरज असते अशा पिकांना दुष्काळ प्रतिरोधक जाती म्हणतात, ज्वारी, मोती बाजरी, हरभरा, भुईमुग इत्यादी. दुष्काळ सहनशीलता पावसाच्या पाण्यावर आधारित पिकांची लागवड त्यांच्या दुष्काळाचा सामना करण्याच्या क्षेमातेसाठी केली जाते. ही पिके पाण्याचे संरक्षण करण्यासाठी अनुकूल आहेत, ज्यात खोल रूट सिस्टम आणि दुष्काळ-प्रतिरोधक वैशिष्ट्ये आहे. (lawrence r. parsons. oct 1979).

ब) कृषी वनीकरण आणि बारमाही पिके :

कृषी वनीकरण म्हणजे पिके, झाडे, झुडपे एकत्रीत करणे, ज्यामुळे अन्नधान्य उत्पन्न, उपजीविका, जैवविविधता, मातीचे आरोग्य सुधारते आणि कार्बन उत्सर्जन कमी होते. यामधून लाकूड, फळे व इतर उत्पादने मिळतात. (en.wikipedia.org.) बारमाही पिके दोन वर्षांहून अधिक जगणारी झाडे आहेत, जसे आंबा, नारळ, खजूर, वटवृक्ष, केळी. फळे-फुले तयार होण्यासाठी दीर्घ कालावधी लागतो. ती हवामान बदलास असुरक्षित असतात. (नेहा ग्रोवर २०२२).

क) माहिती तंत्रज्ञानाचा वापर :

कृषी माहिती व तंत्रज्ञान शेतकऱ्यांना शेतीविषयक नवनवीन तंत्रज्ञान व माहिती विविध माध्यमांतून पोहोचवते. यामुळे उत्पादन वाढ, हरितक्रांती, व शेतकऱ्यांचे सक्षमीकरण झाले. किसान सुविधा, एम-किसान, इफको किसान अशा ऐपद्वारे हवामान, कीड नियंत्रण, बाजारभाव, माती परीक्षण, पशुसंवर्धन माहिती उपलब्ध होते. यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावतो. (डॉ.नेहा दि. काळे,जुलै २०२१.कृषीपर्व.)

ड) हवामानाशी जुळवून घेणारी पिक पद्धती/पिके : बदलत्या हवामानाशी जुळवून भात, मका, मसूर, हरभरा यांसारखी पिके घेता येतात (मनिषा येरखेडे,२०२२. शेतशिवार). दुष्काळप्रतिकारक वाण तयार करण्यासाठी जननशास्त्र व अनुवांशिक तंत्रांचा वापर केला जातो. पिकांमध्ये पोषक घटक वाढवण्यासाठी जणूक संपादन तंत्र वापरले जाते. किडी, रोग, उष्णता व क्षार सहनशील पिके तयार करून उत्पादन सुधारता येते. (curious Demon,apr.२०२३).

निष्कर्ष :

कोरडवाहू शेती पावसावर आधारित आहे, मर्यादित जलस्त्रोत असलेल्या भागात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. जलस्त्रोतांच्या दुर्बलतेमुळे शास्वत शेतीसाठी कार्यक्षम जलव्यवस्थापन आवश्यक आहे. यामध्ये पाणी टंचाईच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी ठिबक सिंचन सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा, ज्यामुळे पाण्याचा अपव्यय कमी होऊन पीक उत्पादन वाढवते. तथापि, ठिबक सिंचनाची अंमलबजावणी करतांना पिकांची पाण्याची गरज, मातीचा प्रकार, हवामान आणि जलस्त्रोतांची उपलब्धता यांचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या पद्धतींना शास्वत आणि लवचिक दृष्टीकोनातून राबवून, कृषी उत्पादनाची

स्थिरता सुनिश्चित करता येते, तसेच पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून समुदायांची कल्याणासाठी मदत होते.

शिफारशी:

1. स्थानिक हवामाशी सुसंगत सुधारित वाणांचा वापर उत्पादन वाढीस मदत करू शकतो.
2. सरकारी अनुदाने कृषी तंत्रावर संशोधन आणि डिजिटल मार्गाचा वापर करून शेतकर्यांना नव्या पद्धतीने ज्ञान देणे आवश्यक आहे.
3. बविश्यात कृत्रिम बुद्धिमता AI आणि IOT आधारित शेतीचे नियोजन कोरडवाहू शेतीला अधिक फायदेशीर आणि पर्यावरणपूरक बनवू शकते.
4. स्मार्ट शेती, हवामानानुसार पेरणी, सेंद्रिय शेती, जलसंधारण तंत्र यांचा प्रभावी अवलंब केल्यास कोरडवाहू शेतीत सुधारणा होऊ शकते.
5. शाश्वत शेतीसाठी पारंपारिक ज्ञान्न आणि आधुनी तंत्रज्ञान यांचा समतोल राखणे महत्त्वाचे ठरते.

संदर्भ :

1. कृषी आणि किसान कल्याण विभाग ,भारत सरकार (१६ नोव्ह.२०२२)
2. रोशनी विजयान (जून २०१६) ISSN:०९७६-८९४७ ,dryland agriculture in India- problems and solutions.
3. रिचा सक्सेना ,रिचा शर्मा (२०२३) पिक उत्पादनातील अजैविक, ताण आणि हवामानातील बदल कमी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमता धोरणाची भूमिका.
4. जॉर्ग गेर्के (३१ मार्च २०२२) MDPI ,(the central role of soil oraganic matter in soil fertility and carbon storage.)
5. Movis Badu Brempong And Abigail Addo-Danso (24 may 2022). Importing Soil Fertility With Organic Fertilizers.
6. Rupesh Meena (2016) Stratergies of Effective Management Of Water In Agriculture.
7. Victoria Joan JOhnson And Anis Mirza (ISSN :2319 -7706) Role Of Micro And Micronutrients In The Growth And Department Of Plants.
8. डॉ. बी.व्ही. सावजी,प्रा.ए.जी.टिंगरे व श्री.आर.डी.ढगे (सप्टेंबर २०१५) कृषि पत्रिका,ISSN: २३४७-३३१२.पावसाच्या दीर्घखंडात पिकांची तग धरून ठेवण्याची दुर्दम्य क्षमता व उपाय-एक अनुभव (pp-३)
9. राष्ट्रीय पाणी धोरण,२००२.
10. डॉ. सर्जेराव साळुंखे (२०००): “जलव्यवस्थापन एक आव्हान”दैनिक सकाळ,२७ डिसेंबर २०००. पान.क्र.४.
11. अण्णासाहेब शिंदे (१९८९): “महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपतिचे नियोजन परिसंवाद.पान.क्र.६,३१३,७६,६१.
12. ramesh chand (july,2017.EPW)e-platform for national agricultural market.
13. S.K.Srivatsava,Ramesh Chand and Jasapal Singh(2017):Changing Crop Production Cost In India:Input prices,substutution and technological effects.(p.p.171,182).

लोकाभिमुख राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

देविदास बाबुराव माने

मु.पो. देवंग्रा रोड नळेगाव, ता. चाकूर जि. लातूर

कणखर बाळकडू मिळालेल्या ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील व समाजाभिमुख कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा आपल्या अहमदनगर च्या ऐतिहासिक भूमीत जन्मलेल्या लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन ,सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांना विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

वडील माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील होते तरी देखील ते विद्वान व दूरदर्शी व्यक्तिमत्त्व होते. तो काळ अठराव्या शतकाचा त्यावेळी आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नव्हती तरीही त्यांनी अहिल्येच्या शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्या मातेचे जीवन घडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. अवघ्या आठ वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह 20 मे 1733 रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

अहिल्याबाईनी लग्नानंतर फार थोड्या काळात आपल्या चतुर ,क्षमाशील व शांत स्वभावाने कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धीमत्ता परिपक्व झाली.

इ.स.1754 मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याबाईंचे शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. अहिल्याबाई वयाच्या अवघ्या 29 व्या वर्षी वैधव्य आले. जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईनी जे मनोधैर्य दाखवले ते अगदी अद्वितीय व धाडसाचे आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे, परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे माणून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

आजच्या युगात दिसणाऱ्या अनेक कल्याणकारी योजना काय असू शकतात व कशा राबविल्या जातात हे त्यांनी मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर 29 वर्षे अत्यंत यशस्वीपणे दाखवून दिले. सासरे मल्हाररावांचा मृत्यू 20 मे 1766, मुलगा मालेरावांचा मृत्यू 27 मार्च 1767 मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

आणखी एक संकट म्हणजे पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोर वर चढाई केली. हे वृत्त लोकमाता अहिल्याबाईना कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला त्या म्हणतात, "आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दुःखात बुडालेल्यास आधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू? आता आपली गाठ रणांगणात पडेल! माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल.

पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांद्यावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही." मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.

मल्हाररावांच्या मृत्यूनंतर इंदोर वरून संस्थानाची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली.

मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालविली. वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशातही आंबराई, बगीचे, वृक्षारोपण विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधतांना केवळ तज्ञांची मत विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात, कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोयीस्कर पडेल, कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात? इतक्या बारीक तपशिलासह घाट बांधून घेतले.

त्यांनी सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे ,मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले.मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या.त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन....!

वट पौर्णिमा अध्यात्म व विज्ञानाची सांगड घालणारा सण

बसवेश्वर भुजंगराव थोटे
सहशिक्षक
रविंद्रनाथ टागोर विद्यालय, अहमदपूर जि. लातूर

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अनेक सण उत्साहाने, आनंदाने साजरे केले जातात, त्याच पैकी एक म्हणजे वट पौर्णिमा. ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा ही वट पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. ह्या व्रत दरम्यान विवाहित स्त्रिया आपल्या पतीला उत्तम आरोग्य लाभावे, दिर्घआयुष्य प्राप्त व्हावे यासाठी प्रार्थना करतात आणि मनोभावे वडाच्या झाडाची पूजा करतात. वडाच्या वृक्षाचे आयुष्य जास्त असते तसेच त्याच्या पारंब्यांचा विस्तारही खूप मोठा होतो. त्याचप्रमाणे नैसर्गिकतःच दीर्घायुष्य लाभलेल्या वडाच्या वृक्षाप्रमाणे आपल्या पतीला आणि कुटुंबियांना आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभावे हा त्यामागचा हेतू आहे.

वटपौर्णिमेच्या दिवशी सुवासिनी महिला मराठी पेहराव करतात; नववारी साडी, दागिने यांनी स्वतःला सजवून घेतात. त्यादिवशी सर्व सुवासिनी पारंपरिक वेशभूषा करून पूजेचे ताट हातात घेऊन एकत्र वटवृक्षाची पूजा करण्यासाठी जातात. प्रत्येक गावामध्ये सहसा एक ठरलेले वडाचे झाड असते जिथे ही पूजा होते, शक्यतो गावी मंदिराच्या आवारात किंवा जवळच्या परिसरात वडाचे झाड नक्कीच असते. सौभाग्यच प्रतीक मानले जाणारे हळद-कुंकू आणि काळी पोत, हिरव्या बांगड्या हे सौभाग्य अलंकार तेथे अर्पण करतात. फळांचा राजा आंबा हा तेथे वटवृक्षाची पूजा करताना ठेवतात. ५ फळांचे ५ वाटे बनवतात. ते सुपामध्ये सजवतात आणि सुंदर रुमालाने तो झाकून घेतात. ते वाटे खाण्यासाठी लहान मुले पूजेच्या ठिकाणी आवर्जून गर्दी करतात. तसेच दूध साखरेचा नैवेद्यही दाखवतात. त्यानंतर वडाच्या झाडाला सफेद दोरा गुंडाळून पाच प्रदक्षिणा घालतात, आणि शेवटी त्या धाग्याची वडाच्या खोडाला गाठ मारतात.

या दिवशी सर्व सुवासिनी सावित्री उपवास करून मोठ्या भक्तिभावाने हे सावित्री व्रत पूर्ण करतात. त्या दिवस भर उपवास करतात आणि सूर्यास्तानंतर घरी परत एकदा पूजा करून उपवास सोडतात. या सर्व विधींमुळे घराचे वातावरण प्रसन्न बनते. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागात वट पौर्णिमे निगडित विविध विधी असतात. जसे कोकणातील काही भागात “सूप वाहने’ असा एक प्रकार असतो. ज्या मध्ये सुवासिनी सूप सजवतात आणि ते परिवारातील वढीलधाऱ्या माणसांना देतात आणि त्यांचा आशीर्वाद घेतात.

वटपौर्णिमा हा सण साजरा करण्यामागे एक कथा आहे. सावित्री हिने आपला पती सत्यवान ह्याचे प्राण यमाकडून कसे परत मिळवले ह्याविषयी ही कथा आहे. अश्वपती नावाचा एक राजा होता. त्याची मुलगी ही सावित्री. सावित्री ही खूप सुंदर, गुणी व नम्र मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा एका अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून पराभव झाल्यामुळे राजा आपल्या राणी व मुलासहित जंगलात राहत होता. भगवान नारदांना सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच आहे हे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नकोस असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही तिने या अल्पायुषी सत्यवानाशी लग्न केले. त्यानंतर सत्यवान आणि त्याच्या आई व वडिलांसोबत ती जंगलात राहू

लागली आणि त्यांची सेवा करू लागली. असाच त्यांचा संसार सुखाने चालू होता. बघता बघता एक वर्ष पूर्ण होत आले. सत्यवानाचा मृत्यू जेव्हा होणार होता त्याआधी तीन दिवस तिने उपवास करून सावित्री व्रत केले.

सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला त्यावेळी सावित्री सुद्धा त्याच्यासोबत जंगलात निघाली. सत्यवान लाकडे तोडत होता आणि सावित्री ती लाकडे गोळा करत होती. लाकडे तोडता तोडता अचानक त्याला चक्कर आणि तो जमिनीवर पडला. त्यावेळी यमराज तेथे आले आणि सत्यवानाचे प्राण नेऊ लागले. सावित्री यमराज्यांच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीला परत जाण्यास सांगितले. पण सावित्रीने साफ नकार दिला आणि आपल्या पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर यमाने कंटाळून पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू सासऱ्यांचे डोळे आणि त्यांचे राज्य परत मिळावे असा वर मागितला आणि आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली आणि सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखाली परत मिळवले म्हणून सुवासिनी वटवृक्षाची पूजा करून हे व्रत पूर्ण करतात.

आज काल मात्र नवीन पिढी हे सर्व सण, त्यांचे महत्व विसरत चालली आहे. आपण आता विज्ञानाची कास धरत आहोत, आणि आपल्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या सणांना, रूढींना आपण अंधश्रद्धा मानतो. विज्ञान ही गरजेचे आहे, तसेच आध्यात्म ही जरूरी आहे, आपण दोन्ही गोष्टी समजून घेण्याची गरज आहे. पुरातन काळाचे शास्त्र ही खूप प्रगल्भ आहे, ते समजून घेणे गरजेचे आहे.आपले सण, व्रत, पूजा, विधी यांना कारणे आणि इतिहास आहे, त्या डोळे बंद करून उडवून देण्यापेक्षा आपण त्या समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वटपोर्णिमा सणाच्या निमित्ताने आपण वाढत्या ग्लोबल वार्मिंग ला शह देण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करणे गरजेचे आहे जेणे करून पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. वट पौर्णिमेला सांस्कृतिक मूल्यासोबतच पर्यावरणीय महत्त्व आहे. हिंदू धर्मात, वटवृक्ष त्याच्या पर्यावरणीय महत्त्वासाठी आदरणीय आहे आणि त्याला एक पवित्र वृक्ष मानले जाते. झाडाची औषधी क्षमता आहे आणि हवा फिल्टर करण्याच्या क्षमतेसाठी प्रसिद्ध आहे. विविध प्राणी आणि पक्ष्यांच्या प्रजातींसाठी ते एक आवश्यक अधिवास म्हणून काम करते. वट पौर्णिमा हा एक उत्सव आहे जो पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणाच्या मूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करतो.

भारतात वटपौर्णिमेच्या सणाला सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व आहे. हे वटवृक्षाचा सन्मान करते, जो दृढता, सुपीकता आणि पर्यावरणीय सुसंवादाचे प्रतिनिधित्व करतो. स्त्रिया संपूर्ण सणात एकमेकांशी असलेले त्यांचे नाते आणि त्यांच्या पतीबद्दलचे प्रेम साजरे करण्यासाठी एकत्र येऊ शकतात. या उत्सवात सहभागी होऊन पर्यावरणाचे जतन आणि संरक्षण तसेच मानवी मागणी आणि पर्यावरणीय शाश्वतता यांच्यातील समतोल राखण्याची गरज लोकांना लक्षात आणून दिली जाते.

वट पौर्णिमा अध्यात्म व विज्ञानाची सांगड घालणारा सण

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अनेक सण उत्साहाने, आनंदाने साजरे केले जातात, त्याच पैकी एक म्हणजे वट पौर्णिमा. ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा ही वट पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. ह्या व्रत दरम्यान विवाहित स्त्रिया आपल्या पतीला उत्तम आरोग्य लाभावे, दिर्घआयुष्य प्राप्त व्हावे यासाठी प्रार्थना करतात आणि मनोभावे वडाच्या झाडाची पूजा करतात. वडाच्या वृक्षाचे आयुष्य जास्त असते तसेच त्याच्या

पारंब्यांचा विस्तारही खूप मोठा होतो. त्याचप्रमाणे नैसर्गिकतःच दीर्घायुष्य लाभलेल्या वडाच्या वृक्षाप्रमाणे आपल्या पतीला आणि कुटुंबियांना आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभावे हा त्यामागचा हेतू आहे.

वटपौर्णिमेच्या दिवशी सुवासिनी महिला मराठी पेहराव करतात; नववारी साडी, दागिने यांनी स्वतःला सजवून घेतात. त्यादिवशी सर्व सुवासिनी पारंपरिक वेशभूषा करून पूजेचे ताट हातात घेऊन एकत्र वटवृक्षाची पूजा करण्यासाठी जातात. प्रत्येक गावामध्ये सहसा एक ठरलेले वडाचे झाड असते जिथे ही पूजा होते, शक्यतो गावी मंदिराच्या आवारात किंवा जवळच्या परिसरात वडाचे झाड नक्कीच असते. सौभाग्यच प्रतीक मानले जाणारे हळद-कुंकू आणि काळी पोत, हिरव्या बांगड्या हे सौभाग्य अलंकार तेथे अर्पण करतात. फळांचा राजा आंबा हा तेथे वटवृक्षाची पूजा करताना ठेवतात. ५ फळांचे ५ वाटे बनवतात. ते सुपामध्ये सजवतात आणि सुंदर रुमालाने तो झाकून घेतात. ते वाटे खाण्यासाठी लहान मुले पूजेच्या ठिकाणी आवर्जून गर्दी करतात. तसेच दूध साखरेचा नैवेद्यही दाखवतात. त्यानंतर वडाच्या झाडाला सफेद दोरा गुंडाळून पाच प्रदक्षिणा घालतात आणि शेवटी त्या धाग्याची वडाच्या खोडाला गाठ मारतात.

या दिवशी सर्व सुवासिनी सावित्री उपवास करून मोठ्या भक्तिभावाने हे सावित्री व्रत पूर्ण करतात. त्या दिवस भर उपवास करतात आणि सूर्यास्तानंतर घरी परत एकदा पूजा करून उपवास सोडतात. या सर्व विधींमुळे घराचे वातावरण प्रसन्न बनते. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागात वट पौर्णिमे निगडित विविध विधी असतात. जसे कोकणातील काही भागात "सूप वाहने' असा एक प्रकार असतो. ज्या मध्ये सुवासिनी सूप सजवतात आणि ते परिवारातील वढीलधाऱ्या माणसांना देतात आणि त्यांचा आशीर्वाद घेतात.

वटपौर्णिमा हा सण साजरा करण्यामागे एक कथा आहे. सावित्री हिने आपला पती सत्यवान ह्याचे प्राण यमाकडून कसे परत मिळवले ह्याविषयी ही कथा आहे. अश्वपती नावाचा एक राजा होता. त्याची मुलगी ही सावित्री. सावित्री ही खूप सुंदर, गुणी व नम्र मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा एका अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून पराभव झाल्यामुळे राजा आपल्या राणी व मुलासहित जंगलात राहत होता. भगवान नारदांना सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच आहे हे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नकोस असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही तिने या अल्पायुषी सत्यवानाशी लग्न केले. त्यानंतर सत्यवान आणि त्याच्या आई व वडिलांसोबत ती जंगलात राहू लागली आणि त्यांची सेवा करू लागली. असाच त्यांचा संसार सुखाने चालू होता. बघता बघता एक वर्ष पूर्ण होत आले. सत्यवानाचा मृत्यू जेव्हा होणार होता त्याआधी तीन दिवस तिने उपवास करून सावित्री व्रत केले.

सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला त्यावेळी सावित्री सुद्धा त्याच्यासोबत जंगलात निघाली. सत्यवान लाकडे तोडत होता आणि सावित्री ती लाकडे गोळा करत होती. लाकडे तोडता तोडता अचानक त्याला चक्कर आणि तो जमिनीवर पडला. त्यावेळी यमराज तेथे आले आणि सत्यवानाचे प्राण नेऊ लागले. सावित्री यमराज्यांच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीला परत जाण्यास सांगितले. पण सावित्रीने साफ नकार दिला आणि आपल्या पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर यमाने कंटाळून पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू सासऱ्यांचे डोळे आणि त्यांचे राज्य परत मिळावे असा वर मागितला आणि आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली आणि सत्यवानाचे प्राण परत करावे लागले.

सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखाली परत मिळवले म्हणून सुवासिनी वटवृक्षाची पूजा करून हे व्रत पूर्ण करतात.

आज काल मात्र नवीन पिढी हे सर्व सण, त्यांचे महत्व विसरत चालली आहे. आपण आता विज्ञानाची कास धरत आहोत, आणि आपल्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या सणांना, रूढींना आपण अंधश्रद्धा मानतो. विज्ञान ही गरजेचे आहे, तसेच आध्यात्म ही जरूरी आहे, आपण दोन्ही गोष्टी समजून घेण्याची गरज आहे. पुरातन काळाचे शास्त्र ही खूप प्रगल्भ आहे, ते समजून घेणे गरजेचे आहे.आपले सण, व्रत, पूजा, विधी यांना कारणे आणि इतिहास आहे, त्या डोळे बंद करून उडवून देण्यापेक्षा आपण त्या समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वटपोर्णिमा सणाच्या निमित्ताने आपण वाढत्या ग्लोबल वार्मिंग ला शह देण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करणे गरजेचे आहे जेणे करून पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. वट पौर्णिमेला सांस्कृतिक मूल्यासोबतच पर्यावरणीय महत्त्व आहे. हिंदू धर्मात, वटवृक्ष त्याच्या पर्यावरणीय महत्त्वासाठी आदरणीय आहे आणि त्याला एक पवित्र वृक्ष मानले जाते. झाडाची औषधी क्षमता आहे आणि हवा फिल्टर करण्याच्या क्षमतेसाठी प्रसिद्ध आहे. विविध प्राणी आणि पक्ष्यांच्या प्रजातींसाठी ते एक आवश्यक अधिवास म्हणून काम करते. वट पौर्णिमा हा एक उत्सव आहे जो पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणाच्या मूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करतो.

भारतात वटपौर्णिमेच्या सणाला सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व आहे. हे वटवृक्षाचा सन्मान करते, जो दृढता, सुपीकता आणि पर्यावरणीय सुसंवादाचे प्रतिनिधित्व करतो. स्त्रिया संपूर्ण सणात एकमेकांशी असलेले त्यांचे नाते आणि त्यांच्या पतीबद्दलचे प्रेम साजरे करण्यासाठी एकत्र येऊ शकतात. या उत्सवात सहभागी होऊन पर्यावरणाचे जतन आणि संरक्षण तसेच मानवी मागणी आणि पर्यावरणीय शाश्वतता यांच्यातील समतोल राखण्याची गरज लोकांना लक्षात आणून दिली जाते.

बालकांच्या जीवनातील आरोग्यदायी आहार व शैक्षणिक - शारीरिक विकास

देविदास बाबुराव माने

मु.पो. देवंग्रा रोड नळेगाव ता. चाकूर जि. लातूर पीन कोड 413524

बालपण म्हणजे जीवनातील असा टप्पा जेथे बालकाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आजकाल पालक अतिशय महत्वाकांक्षी असतात मग या दिवसांत, मुलांचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य आरोग्य सुस्थितीत राखण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्याच्या आहाराकडे जरा विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. नेमका कोणता आहार द्यावा ? काय खाणे टाळावे ? याबद्दल पालकांनी च काळजी घेणे महत्त्वाचे असते.

योग्य आहाराचे महत्व -

आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांवर अभ्यासाचा विशेष तणाव असतो. अभ्यासाच्या तणावाबरोबरीने आहारातही हेळसांड केली तर मुलं सतत आजारी पडतात. म्हणूनच पालकांनी परीक्षेच्या काळात आपल्या पाल्याच्या आहाराकडे विशेष लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. या काळात पाल्याचे अभ्यासाच्या तणावात जागरण वाढायला लागते. परंतु पालक म्हणून आपण समुपदेशन करून ताण हलका करणे गरजेचे असते. तसेच आहारात कमीत कमी फास्ट फूड, हॉटेल फूड व अधिकाधिक घरगुती पदार्थ असावेत.

'बौद्धीक विकासासाठी सकस आहार घेणे फार गरजेचे आहे. खूप काळ वाचन , मनन करणे , केलेल्या अभ्यासाचा विचार करणे व अधिकाधिक मार्क मिळवण्याची धडपड यांमुळे मेंदू थकतो. योग्य व सकस आहार घेतल्याने शारीरिक व बौद्धीक झीज भरून निघते , ताण कमी होतो, शरीराला उर्जा मिळते व मेंदूच्या पेशींना मुबलक पोषणद्रव्ये मिळाल्याने स्मरणशक्ती वाढते .म्हणून या काळातील अन्नपदार्थ भूक भागविणारे नव्हे तर शारीरिक व बौद्धिक गरज पूर्ण करणारे असावेत.

शाळेत जाण्यापूर्वी काय द्याल

शाळेत जाण्यापूर्वी मुलांना कमी ग्लायसिमिक निर्देशांक (ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढेल) असलेले अन्नपदार्थ द्यावेत. यामुळे त्यांचा रक्तातील साखर झटकन वाढणार नाही तसेच निरुत्साहीपणा कमी होईल. मुलांना अधिकाधिक पोषक आहार द्या. तसेच आवडीचा पदार्थ दिल्यास मन उत्साही राहण्यास मदत होते.

शक्यतो परीक्षा काळात काय खावे

सुकामेवा

स्मुदीज / मिल्कशेक

व्हेजिटेबल सॅन्डविज्

फळं व पालेभाज्या

मोड आलेली कडधान्य

फारच वाटलं तर एखाद्यावेळी घरी तळलेला पदार्थ घेण्यास हरकत नाही,परंतु अधिक भर चौरस आहारावरच असावा.

पारंपारिक 'दही - साखर' हितकारी आहे का?

कोणत्याही शुभ कामाची सुरवात करण्यापूर्वी हातावर दही साखर ठेवण्याची आपली संस्कृती आहे. 'दही साखरेच्या सेवनामुळे शरीराला थंडावा मिळतो, तसेच सतत उर्जा मिळते. त्यामुळे परीक्षेला जाण्यापूर्वी 'दही - साखर' अवश्य खावी. परंतु प्रकृतीच्या नियमानुसार पाचही बोटे सारखी नसतात या न्यायाने ज्याला हे आवडत नसेल त्याला आग्रहही करू नये. दही - साखर अधिक स्वादिष्ट करायचे असल्यास, त्यात आवडीचा सुकामेवा अथवा फळ टाकून खावे. यामुळे शरीराला आवश्यक मिनरल्स व व्हिटामिन्स मिळतात'.

परीक्षेपूर्वी काय खाणे टाळाल ?

ज्या पदार्थांमुळे तुमच्या मुलांना परीक्षेदरम्यान थकवा जाणवेल असे पदार्थ टाळणेच हितकारी आहे, अन्यथा त्याचा परिणाम मुलांच्या निकालावर होऊ शकतो. अतिशय मेदयुक्त पदार्थ, प्रीझवेटीव्झ टाकलेले पदार्थ मुलांना देणे टाळणे आवश्यक आहे.कारण परीक्षा काळात सुस्ती आणणारे पदार्थ क्रयशक्तीवरही परिणाम करतात, म्हणून असे पदार्थ टाळले पाहिजे.

अहितकारी पदार्थ -

बाजारात उपलब्ध असलेल्या फळांच्या रसाचे पॅक

पिझ्झा, बर्गर यांसारखे जंकफूड वडे, समोसे यांसारखे तळलेले पदार्थ यांसारख्या पदार्थांमुळे मेंदूच्या पेशींचे नुकसान होते व त्यामुळे अस्वस्थता वाढते. परीक्षेदरम्यान मुलांना शक्यतो घरी बनवलेले पदार्थच द्यावेत. यामुळे अपचन व पोटाचे विकार होण्याचे प्रमाण कमी होते. आहाराबरोबरच पुरेशी झोप घेणे व भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. पुरेसे पाणी न प्यायल्यास डी - हायड्रेशनचा त्रास संभवू शकतो.

पाल्याला कणखर बनवा

या स्पर्धेच्या युगात फक्त आरोग्यविषयक बाबीच नाही तर पाल्याचा मित्र बनून कणखर बनविणे गरजेचे आहे. पेपर कसाही असो, ही शाळेतील परीक्षा म्हणजे अंतिम परीक्षा नसून जीवनाची परीक्षा दुसरी आहे हे पटवून देणे गरजेचे आहे.

थोडक्यात, बालपणात पालक म्हणून आपणच आहाराचे व आरोग्यविषयक सवयीचे नियोजन केले पाहिजे पण हे करत असताना पाल्यावर या बाबीचा नकारात्मक परिणाम होऊ नये म्हणून आवडी जपण्यासाठीही व यशस्वी बनविण्यासाठी आपली पालक म्हणून भूमिका महत्वाची आहे.

‘शालेय गुणवत्ता पूर्ण शिक्षणासाठी फलक लेखन व कलात्मक लेखनात कला शिक्षकाचा सहभाग’

श्री. शितल विठ्ठल गोरे

(A.T.D., Art Master) चित्रकार / कलाशिक्षक

कला विभाग प्रमुख- आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र

प्रस्तावना :

शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणारे असावे लागते. प्रभावी शिक्षणासाठी दृक-श्राव्य साधने, शैक्षणिक तक्ते, प्रात्यक्षिके आणि दृश्य माध्यमे यांचा उपयोग अत्यावश्यक ठरतो. अशा विविध दृश्यात्मक साधनांपैकी फलक लेखन व कलात्मक फलक लेखन हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.

विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक आकर्षक, सहज आणि समजण्याजोगे बनवण्यासाठी शाळेत विविध प्रकारचे फलक वापरण्यात येतात. या प्रक्रियेत कला शिक्षकांचा महत्त्वाचा सहभाग असतो. ते आपल्या सृजनशीलतेच्या माध्यमातून शालेय परिसर सुंदर, प्रेरणादायी आणि शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त बनवतात.

फलक लेखनाचे महत्त्व आणि प्रकार :

फलक लेखन हे माहिती प्रसाराचे प्रभावी माध्यम आहे. शाळेच्या प्रत्येक भागात विविध प्रकारच्या फलकांचा उपयोग केला जातो. हे फलक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांना जीवनमूल्ये शिकविण्यास मदत करतात.

फलक लेखनाचे प्रकार :

1. **शैक्षणिक फलक :** वर्गात विविध विषयांशी संबंधित महत्त्वाच्या संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यासाठी.
2. **सूचना फलक :** शाळेतील सूचना, वेळापत्रक, परीक्षा वेळापत्रक यासाठी.
3. **सुविचार फलक :** प्रेरणादायी विचार आणि नीतिमूल्ये शिकवण्यासाठी.
4. **घडामोडी फलक :** वर्तमान घडामोडी, महत्त्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घटनांची माहिती देण्यासाठी.
5. **सांस्कृतिक व सणोत्सव फलक :** विविध सण, विशेष दिवस आणि कार्यक्रमांच्या सजावटीसाठी.

- **कलात्मक फलक लेखनाचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये :**

कलात्मक फलक लेखन म्हणजे साध्या अक्षरबद्ध फलकाच्या पुढील पायरी होय. यात अक्षरलेखनासोबत चित्रकला, रेखाटन, डिझाईन, रंगसंगती, आकर्षक फॉन्ट शैली, विविध माध्यमांतील प्रयोग यांचा समावेश असतो.

- **कलात्मक फलक लेखनाची वैशिष्ट्ये :**

अधिक आकर्षक आणि लक्षवेधी असते. विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी प्रेरणादायी ठरते. शालेय परिसर अधिक सुंदर आणि शिस्तबद्ध बनतो. शैक्षणिक विषय समजावून सांगण्यासाठी प्रभावी ठरते. विद्यार्थी स्वतः फलक तयार करत असल्याने त्यांची सर्जनशीलता आणि कल्पकता वाढते.

- **कला शिक्षकांचा सहभाग आणि जबाबदारी :**

शालेय गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कला शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. फलक लेखनाच्या माध्यमातून ते शाळेतील विविध उपक्रमांमध्ये योगदान देतात.

- **कला शिक्षकाच्या प्रमुख जबाबदाऱ्या :**

1. शालेय फलक लेखनाचे नियोजन : वर्षभर कोणत्या विषयांवर फलक तयार करायचे याचे नियोजन करणे.

2. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन : योग्य फॉन्ट, रंगसंगती, थीम, सजावट यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

3. शालेय महत्त्वाच्या दिवसांसाठी विशेष फलक तयार करणे : स्वतंत्रता दिवस, प्रजासत्ताक दिन, शिक्षक दिन, पर्यावरण दिन यांसाठी आकर्षक फलक तयार करणे.

4. शालेय सौंदर्यात भर घालणे : कला शिक्षकांनी शाळेतील भिंतींवर शैक्षणिक चित्रे, माहितीपर फलक तयार करून परिसर सुंदर बनवणे.

5. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेला चालना देणे : फलक लेखन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि इतर कलात्मक उपक्रम आयोजित करणे.

6. सहकार्य आणि सहसंवाद : मुख्याध्यापक, इतर शिक्षक आणि पालकांसोबत समन्वय ठेवून शाळेच्या गुणवत्तेत भर घालणे.

- **शालेय गुणवत्तापूर्ण शिक्षणात फलक लेखनाचा उपयोग:**

1) विषय शिकवण्याच्या प्रभावी पद्धतीसाठी :

गणित, विज्ञान, इतिहास, पर्यावरणशास्त्र यांसारख्या विषयांची अवघड संकल्पना सहज समजण्यासाठी फलक उपयोगी ठरतात.

2) विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करण्यासाठी :

आकर्षक रंगसंगती आणि चित्रांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांचे शिकण्याकडे अधिक लक्ष वेधले जाते.

3) मूल्य शिक्षणासाठी :

नैतिक शिक्षण, पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी यांसाठी सुविचार आणि संदेश फलकावर मांडता येतात.

4) शाळेच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी :

नीटनेटका आणि कलात्मक फलक लेखन शाळेच्या स्वच्छतेला आणि सौंदर्याला महत्त्व देते.

- **उदाहरणे आणि प्रात्यक्षिके :**

उदाहरण १ :

जर गणिताच्या वर्गात पाढे शिकवायचे असतील, तर त्या विषयावर आकर्षक फलक तयार करून विद्यार्थ्यांना रोज त्याचा सराव करता येईल.

उदाहरण २ :

पर्यावरण शिक्षणासाठी भिंतींवर 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश आकर्षक फलकाच्या स्वरूपात सादर करता येईल.

उदाहरण ३ :

शालेय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः हस्तलिखित फलक तयार करून त्यात वेगवेगळ्या थीम्स सादर कराव्यात.

- **समारोप :**

शालेय गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी फलक लेखन आणि कलात्मक फलक लेखन हा अत्यंत प्रभावी मार्ग आहे. कला शिक्षकांनी आपल्या सृजनशीलतेच्या मदतीने हे लेखन अधिक आकर्षक, शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बनवावे.

शाळेतील शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी फलक लेखनाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, सृजनात्मक आणि नैतिक विकास साधता येतो. कला शिक्षकांनी या प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेतल्यास विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड वाढते आणि शालेय वातावरण अधिक प्रेरणादायी बनते. त्यामुळे कला शिक्षकांनी आपल्या कौशल्यांचा उपयोग करून फलक लेखनाच्या माध्यमातून शालेय शिक्षणाला नवा आयाम द्यावा.

कलात्मक फलक लेखनाचे काही नमुने :

संदर्भ

1. कला शिक्षक मुलाखतीतून संकलित माहिती.
2. शिक्षण तज्ञांचे लेख व संशोधन पेपर.
3. फलक लेखन प्रात्यक्षिक निरीक्षणावर आधारित निष्कर्ष.
4. फळा तिथे शाळा हे श्री मनोहर बाविस्कर यांचे पुस्तक.

शिक्षण आणि संस्काराचे महत्त्व

सौ. प्रिया नितीन उपासनी
माहीम मनपा माध्यमिक शाळा

"पारंपारिक संस्कृती जणू
संस्काराची आहे खाण".
"जपु वारसा जिजाऊ सावित्रीचा
बनेल भक्कम पाया वाढेल शान'.

भारतीय संस्कृतीमध्ये संस्काराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

मग संस्कार म्हणजे नेमके काय हो?

तर संस्कार म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दोषांचा भागाकार.

गुणांचा गुणाकार याचा अर्थ स्वतःमधील गुण वाढवायचे व दोषांचा भागाकार म्हणजे स्वतःमधील दोष अल्प करायचे.

मानवाचे विचार कृती परिपूर्ण होण्यासाठी गरज असते ती संस्काराची.

उदा

केळी खाऊन साल कचऱ्याच्या टोपलीत टाकणे ही प्रवृत्ती तर केळी खाऊन साल रस्त्यावर टाकणे ही विकृती होय. आणि दुसऱ्याने रस्त्यावर टाकलेली साल कचऱ्याच्या डब्यात टाकणे हीच खरी संस्कृती होय.

"लवकर निजे
लवकर उठे
तया आरोग्य संपत्ती मिळे".

असे आपण नेहमीच म्हणतो म्हणजेच लवकर उठणे. आई वडील मोठी माणसे यांना नमस्कार करणे.

सर्वांशी प्रेमाने वागणे. प्रतिदिन शाळेत जाणे. आईला घर कामात मदत करणे या आणि अशा अनेक गोष्टी यात येतात.

संस्कार करणे म्हणजे चांगल्या सवयी अंगीकारून वाईट सवयींचा त्याग करणे होय.

पूर्वीच्या काळी सर्व मुले मोठ्यांना दररोज वंदन करत असत.

"वदनी कवळ घेता
नाम घ्या श्रीहरीचे"

म्हणून मग जेवणाला सुरुवात करत असत.

संध्याकाळ होताच "शुभम करोति कल्याणम आरोग्यम् धनसंपदा"

म्हणून देवाची आळवणी करत पण आता काळ बदलला तसे नवीन पिढीमध्ये संस्काराचे महत्व लोप पावत चालले आहे.

पूर्वी गुरुगृही असणाऱ्या मुलांवर शिक्षणाद्वारे हे संस्कार होत होते मग आता होत नाहीत का?

"शिक्षण हे समाज उन्नतीचे महत्त्वाचे साधन आहे'

मग त्या साधनाद्वारे आपले ध्येय साध्य कसे होईल हे प्रत्येकाने बघायला हवे. आजी आजोबांचे महत्त्व यासाठीच आहे.

आज शाळेत विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे म्हणून आपण प्रार्थना, मूल्य ,मूल्याधारित शिक्षण या सर्वांचाच अभ्यासक्रमात समावेश करतो. "शाळा हे संस्काराचे केंद्रच आहे' मग फक्त शाळेने संस्कार करून भागणार आहे का?

आडात नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार या उक्तीप्रमाणे सुरुवातही घरापासूनच करायला हवी नाही का? मग ही सुरुवात आपल्या घरापासून होते का? तर याचे उत्तर नाही असेच आहे. आपला दिवस चालू होतो तो मोबाईलच्या गजराने, व्हाट्सअप चा मेसेज, इंस्टाग्राम चे रिल्स, फेसबुकला आलेले कमेंट्स, चेंज केलेला लुक, स्टेटस सगळ्या गोष्टींना महत्त्व देता देता आपण सगळ्या प्रार्थना लोकांचा सहभाग पूर्ण विसरलो जणू.

भारतीय संस्कृतीत आजही उपनयन,

बारसे, लग्न, संस्कारामुळे मनुष्यातील सदगुणांचा विकास होतो आणि दोषांचे निराकरण होते यासाठी शालेय शिक्षणात विद्यार्थ्यांचा संस्काराचा पाया मजबूत असायला हवा.

कारण शिक्षणामुळेच मुले संस्कारक्षम होतात. संस्कारक्षमशिक्षक हे सक्षम विद्यार्थी घडवतात. शिक्षण देताना काय चांगले काय वाईट हे दाखवून चांगले वागण्यास शिकवले जाते असे म्हणतात.

"शिक्षण हे जीवनाची मौल्यवान भेट आहे आणि संस्कार हे जीवनाचे सार आहे"

शिक्षणातून काय घ्यायचे काय स्वीकारायचे?

आदर्श आणि वास्तव यांची सांगड कशी घालायची त्याचबरोबर जीवनातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर ज्यातून मिळते ते खरे शिक्षण. शिक्षणाबरोबरच संस्काराच्या प्रक्रियेत वातावरणाचा सुद्धा महत्त्वाचा सहभाग आहे प्राकृतिक, पारिवारिक, सांस्कृतिक, सामाजिक परिस्थितीचा खूप मोठा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर होत असतो. भारतीय मनोविज्ञानाच्या आधारे संस्कार हा शिक्षणाचा आधार आहे. आज संस्कारपरंपरा कमी पडल्याने संस्कार शून्य पिढी निर्माण होत आहे. आपला समाज, संस्कृती, इतिहास, भाषा, साहित्य, चालीरीती या सर्व गोष्टी संस्कारावर प्रभाव टाकतात. माणूस हा घर करणारा. आपल्या पुढच्या पिढींची चिंता वाहणारा प्राणी हीच माणसाची खरी व्याख्या आहे. माझा पाल्य मी सुसंस्कृत करेन असा आग्रह प्रत्येक पालकांनी केलाच पाहिजे आणि ती फक्त तुमची मुले नाहीत त्यांच्यावर झालेल्या संस्काराचे फलित म्हणजे सुसंस्कृत समाज निर्मिती होय. म्हणूनच पालकत्वाचा संस्कार अतिशय महत्त्वाचा आहे. संस्कार हे एका क्षणात एका दिवसात एका रात्रीत होत नाही तर मनाची मशागत हळुवारपणे कौशल्याने करून संस्काराचे बीज पेरावे लागते. योग्य संस्कार करण्यासाठी सुजाण पालकांची गरज आहे. मूल्यांचे घास भरवता येत नाही तर ती उदाहरणांमधून रुजवली जातात. याबाबत अश्विनी देव म्हणतात

"पालकांना स्वतःच्या मूल्यांबाबत स्पष्टता असेल तरच ते योग्य ती मूल्ये मुलांपर्यंत खंबीरपणे व सहजतेने पोहोचवू शकतील म्हणजेच मुलांवर संस्कार होण्यासाठी पालकांची सुजाणता आवश्यक ठरते."

डॉक्टर ह वि सरदेसाई म्हणतात "मुलांना जन्म देणे एक वेळेस सोपं पण त्यांना संपन्न व्यक्तिमत्त्वाची माणसं होण्यासाठी संधी आणि वातावरण देणे फार कठीण काम आहे." मुलाला समर्थपणे वाढवण्याची पूर्वतयारी करायची म्हणजेच स्वतःचं थोडं नव्याने मोठं व्हायचं.ही कविता याबाबत बरेच काही सांगून जाते.

मूल म्हणजे नसतात काही
देवाघरची फुलं
मूल म्हणजे नसतात फक्त
मातीचेही गोळे
तीही तुमच्या आमच्यासारखी
माणसच तर असतात
एवढंच की खूप खूप
चिमुकली दिसतात
पालक म्हणून तुम्ही आम्ही
काय करायला हवं?
मुलांबद्दलच वास्तव हे
स्वीकारायला हवं
जा बरं खेळा जाऊन
असं म्हणून भागत नसतं
कारण कधी त्यांना सुद्धा
तुमच्याशीच खेळायचं असतं
आकाशीचे इंद्रधनुष्य
त्यांनाही सुंदर दिसत असतं
अहो पण तेही त्यांना
तुमच्यासोबत बघायचं असतं.

म्हणून शिक्षण आणि संस्काराची सुजाण पालकत्वाची समाजाला नितांत गरज आहे. म्हणूनच संवाद हा पालकत्वाचा मुलाधार आहे मग ज्यावेळेस हा सुसंवाद दोन्ही बाजूने होईल तेव्हा सुजाण नागरिकत्व उदयास येईल यात शंकाच नाही.

संदर्भ

1. गुगल
2. नवप्रभा
3. शिक्षण आणि संस्कार
4. संस्कार प्रकाश

मराठी लोकसाहित्यातून व्यक्त होणारे स्त्रीजीवन

डॉ. लक्ष्मण बळीराम थिट्टे

सहयोगी प्राध्यापक,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग. ता. तुळजापूर जि. धाराशिव. पिन 413602

मराठीमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर लोकसाहित्य निर्माण झाले. या लोकसाहित्याचा इतिहास फार पूर्वीचा आहे. मानव जेव्हापासून भाषा बोलायला लागला तेव्हापासून या साहित्याची निर्मिती झालेली असावी. एखादी घटना कथन करणे मुखावाटे काहीतरी गुणगुणत राहणे हा मानवाचा जन्मतः स्वभाव आहे. भाषा प्रथम जन्माला आली आणि त्यानंतर बऱ्याच काळाने तिची लिपी निर्माण झाली. अगदी इंग्रजांच्या काळापर्यंत स्त्रियांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांची अभिव्यक्ती ही मौखिक स्वरूपात प्रकट झाली. त्याचबरोबर स्त्रियांचा वाटा खूप मोठा आहे. विशेषतः ग्रामीण स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर ओव्यांची रचना केलेली दिसून येते. दळण हा गरीब शेतकरी स्त्रियांचा बाळ अभ्यासच म्हटला पाहिजे. दोन दोन तासाचा हा रोजचा कार्यक्रम गीतांच्या साथीत सोपा होतो. जात्याचा दगड ओडताना मनाशी ओढ लागते. सुपात दाणे भरलेले पाहून मन ही सासर माहेरच्या आठवणीने भरून येते. एक एक मुठीने जात्याला घास भरवताना एक एक सुंदर ओवी सुचू लागते. जाते पळत असते मनही भराऱ्या घेऊ लागते. पतीच्या मुलाबाळांच्या जीवनाची दृश्य नजरेसमोर साकार होतात. आई-वडिलांच्या पुण्यमूर्ती दिसू लागतात. सारे बालपण प्रकट होते. जणू स्वतःचे संपूर्ण जीवन चित्र पहाटेच्या त्या एकांतात दृष्टीस दिसू लागते. मग मन दाटून येऊन सहज सुंदर ओव्या ओठावर नाचू लागतात. एक प्रकारे हे ग्रामवासी स्त्रीचे जीवनगीत असते. मग त्यात जीव जणू काटोकाठ भरलेला असावा यात काय नवल नाही. स्त्री ही मुळातच हळव्या मनाची श्रद्धाळू वृत्तीची आणि संवेदनशील मनाची असल्यामुळे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना येणारे अनुभव कौटुंबिक नाती आणि सभोवतालचा परिसर यांचे संस्कार तिच्या मनावर उमटणे साहजिकच आहे. स्त्री जीवनाचे भावविश्व विविध भावछटांनी विणलेले आहे. सुख- दुःख राग-लोभ वात्सल्य स्नेह आधी मानवी भावनांचा अविष्कार लोकसाहित्यातून झालेला आहे. शहरी स्त्री जीवनापेक्षा ग्रामीण भागातील स्त्री जीवन वेगळे आहे. खेडे हे शेतीशी निगडित आहे. कृषी जीवनात शेतीवाडी, पशुधन, मोटा, विहिरी, पीकपाणी, नांगरट, पेरणी, खुरपणी, मळणी, पाऊस इत्यादी गोष्टीचे महत्त्व सगळ्यात अधिक असणारच त्याला उद्देशून जी गीते आहेत. ती अर्थातच ग्रामीण स्त्रीच्या मुखातून आलेली आहेत. या स्त्री जीवनात मांगल्य, पावित्र्य आणि श्रद्धेला विशेष महत्त्व आहे या जीवन मूल्यांची जोपासना जिवापाड करणारी स्त्री लोकसाहित्यातून पहावयास मिळते. देवाधर्मावर या स्त्रीची नितांत श्रद्धा आहे. पूर्वीच्या जीवनातून नांगरणे, पेरणे, शेती, कापणी, मळणी इत्यादी व्यवसाय चालत. दळणे कांढणे, सूत काढणे, विणणे, दूध काढणे, गुरे राखणे, कापड विणणे, बांगड्या भरणे, अवजारे बनवणे, घरे बांधणे हे व्यवसाय करून लोक जीवन जगत असत. बारा बलुतेदार व अठरा आलुतेदार हे कुणब्याला वस्तू व सेवा पुरवत असत.

तांबोळीन बाई पान द्यावी बारा तेरा
विडा जायाचा माझ्या सुभेदारा!
माळीन साद देई माझ्या वाड्याच्या भंवती

माझ्या राजसाच्या जेवणाला भाजी मेथीची हवी होती

स्त्रियांचा ज्या व्यावसायिक लोकांशी संबंध आला त्यांच्याविषयीचे सूचना भाव त्यांच्याशी झालेला संवाद ओव्या मधून व्यक्त केलेल्या दिसून येतात.

शिव शिंप्या चोळी आखूड, बाहया लाव!
माझ्या मैनाबाईच्या, वाकिला जागा ठेव!
गडीण मी केली लोहाराची ताई
तिची लोखंडाची कडी पाळण्यावरी जाई
सांगून पाठविते सुतार मैतराला
बंधुजीची माडी आलिया आकाराला.
लुगडं घेतलं दुही पदराला जर
चाटी बंधूचा मैतर
चाट्याच्या दुकानी बंधू बसे मोतीदाणा
हात मी टाकीते उंच खणा

अशा प्रकारे गावातील स्त्रियांचा अनेक लोकांची संबंध यायचा त्यांच्यावर खूप मोठ्या प्रमाणावर ओव्या निर्माण झालेल्या दिसून येतात. लोकसाहित्यातील या स्त्रीच्या जीवनात सीता, द्रोपदी, पार्वती, सावित्री, तारामती इत्यादी आदर्श जीवनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या आदिमातांची स्त्री पूजा करीत असते. पुराणातील आदर्श जीवनाची ओढ स्त्रियांना सुरुवातीपासूनच आसलेली दिसून येते. राम, लक्ष्मण, सीता, मारुती, श्रीकृष्ण, पांडव, द्रौपदी या सोबतच हरिश्चंद्र तारामती श्रीमाळ चांगुना इत्यादी विषयी तिचे मन श्रद्धेने भरलेले आढळते पंढरपूरच्या विठोबा अवघ्या मराठी मनाचे श्रद्धास्थान अशा या विठोबाला आणि त्याच्या परिवाराला मराठी स्त्रीच्या जीवनात उच्च स्थान प्राप्त झालेले आहे. तिला लिहिता वाचता येत नसले तरी हरिपाठाचे अभंग तोंडपाठ आहेत. या देव देवता सोबतच अनेक ग्रामदैवतेही या स्त्रीला पूजनीय आहेत. प्रत्येक गावाचे एक ग्रामदैवत असते वर्षातून एकदा त्याची जत्रा भरत असते. संताविषयी तिच्या मनात श्रद्धा आहे. स्त्री जीवनाला झालेल्या या धार्मिकतेच्या श्रद्धेचा स्पर्श आपणास मराठी लोकसाहित्यातून पहावयास मिळतो. देव देवता विषयी स्त्रीच्या मनात असलेली श्रद्धा पुढील ओळीतून व्यक्त होते

पहिली माझी ओवी पहिला माझा नेम
तुळशी जवळी राम पोथी वाची
दुसरी माझी ओवी दुधाची भावना
लक्ष्मीनारायणा विनंती माझी
तिसरी माझी ओवी तिरकुटाच्या घरी
ब्रहमा विष्णुवरी बेलपत्री
चौथी माझी ओवी चवथीचा चांदा
मोतीयाच्या भांगा अंबाबाई.

आपापल्या घराण्याचे कुळधर्म कुळाचार आणि धार्मिक विधी अत्यंत मनोभावाने पाळणारी ही स्त्री आहे. आपण जे सण उत्सव साजरे करतो त्यामध्ये बरेच सण स्त्रियांचे असलेले दिसून येतात. नागपंचमी,

मकरसंक्रात, वटसावित्री पौर्णिमा आणि दिवाळी या सणांना स्त्री जीवनात विशेष महत्त्व आहे नागपंचमीच्या दिवशी तर स्त्रीच्या आनंदाला पारावारच उरत नाही. आजच्यासारखी दळणवळणाची प्रगत साधने नव्हती. गाडीला छत लावून बैलांना घुंगुरमाळा घालून सणासुदीला बोलवायला यायचा. संपर्काची प्रगत साधने नव्हती मित्र मैत्रिणींची नातेवाईकांची कित्येक महिन्यांनी भेट व्हायची त्यामुळे आपुलकी प्रेम जिव्हाळा या गोष्टी दिसून येतात. आपल्या मैत्रिणी सोबत फेऱ्याची गाणी म्हणण्यात मग्न असलेली स्त्री म्हणजे लोकसाहित्याचा एक दागिना होय. आपले सौभाग्य अखंडित रहावे कपाळीचे कुंकू अक्षय राहावे. म्हणून मराठी स्त्री हळदीकुंकू वाटताना दिसते. तर आपल्या सत्यवानासाठी दीर्घ आयुष्य मागण्यासाठी ती वडाची पूजा करताना आढळते. आणि दिवाळीचा सणाला सासरी गेलेल्या स्त्रीस तर या सणाची उत्सुकता दसऱ्यापासूनच लागते.

दसऱ्यापासून दिवाळी दिस रोज
वाट पाहते नित रोज
दिवाळीची चोळी भाऊबीजेच लुगडं
हाक माझ्या बंधुराया तुझ्याकडे.

माहेरच्या प्रेमळ वातावरणात रमण्यासाठी तिचे मन आसुसलेले आहे आणि मनाच्या तृप्तीसाठी ती दिवाळीच्या सणाची मोठ्या आतुरतेने वाट पाहते लोकसाहित्यातून आविष्कृत होणारे स्त्री जीवन सोज्वळ मानवी मनाला भारावून टाकणारे आणि अलौकिक पातळीवर नेणारे असेच आहे. लग्नानंतरच्या पहिल्या काही वर्षात मुलीची माहेराबद्दलची ओढ अन प्रेम काही विलक्षणच असते. म्हणूनच म्हटलं जातं माहेरचं कुत्रं जरी आलं तरी अप्रूप वाटायचं. याचे कारण एकच बाळपणीच मुलीचे लग्न होते छोट्या छोट्या मुली लग्न होऊन सासरी जातात व अशा प्रकारे लहानपणीचे आईबाप भाऊ-बहिणी हे प्रीतीची जग दुरावते माहेर हे जणू आनंदाचे निधानच आहे. की एक आपघर आणि एक बापघर या लहान सासुरवाशीने ना माहेरच्या किती आठवणी येतात. आईची आठवण पावलोपावली होते सणासुदीला भाऊ माहेरी न्यायला येईल का म्हणून मन वाट पाहत असते. वडिलांच्या आठवणी जाग्या होतात आणि मग मनाच्या या उत्कटआतुरतेमधून शब्दरूप घेऊन ओव्या बाहेर पडतात.

माहयाराला जाते जीवाला इसावा
बापजी बयाबाई सारा संजोग असावा.
बाप समिंदर बया गोदायन
काशीला जाती वाट, दोन्हीच्या मधयानं

सासरी काबाडकष्ट करून थकलेली ही स्त्री माहेरामध्ये तिला आराम मिळणार आहे. सागरासारखं विशाल हृदय असलेला बाप आणि गोदा समान असलेली माय यांचं प्रेम तिला मिळणार आहे.

वढ्याखुड्याच्या पाण्यानं न्हाई भागली तहान
बया माझी माऊली तू गंगासमान

आई बाप आहे तोवर माहेर असतं त्यांच्या माघारी कुणाचा भाऊ आणि कुणाची भावजय. आई-वडिलांना सोडून मुलगी दूर नांदायला जातील म्हणून मुलापेक्षा आई-वडिलांचे मुलीवर अधिक प्रेमात असते.

आई बापाच्या माघारी भाऊभावजया कोणाच्या?
झळा मारती उन्हाच्या!

आईबापाच्या माघारीं घरीं हाईती गूळभेल्या
बहिणी दारावरनं गेल्या नाही बंधून बोलावल्या

मराठी लोकसाहित्यातून स्त्रियांचे कौटुंबिक जीवन हे मोठ्या प्रमाणावर चित्रीत झालेली दिसून येते. आपल्या संसारात रममाण झालेली, कुटुंबातील आपल्या माणसासाठी जीवापाड परिश्रम करणारी कुटुंबातील अनेक नातीगोती मायेन सांभाळणारी आणि आपल्या जीवनात पुराणातल्या आदर्श बाळगणारी स्त्री लोकसाहित्यातून पहावयास मिळते. आपल्या पतीचा रुबाबदारपणा आपल्या शेती विषयी असलेले प्रेम मामंजीचा असलेला धाक या सगळ्या गोष्टी ओव्या मधून चित्रित झालेली दिसून येतात.

लग्न जमवणे हा एक सुंदर विधी होता. मुलगी कशी आहे मुलगा कसा आहे दोघांची सोयरीक जमवत असताना जे संवाद घडतात जे पाहुणेमंडळी येतात त्या सोयरीकी संदर्भाने अनेक ओव्या लोकसाहित्यात आलेल्या दिसून येतात अशीच एक ओवी पुढील प्रमाणे.

नवरीचा बाप हुंडा मोजतो फाडीफाडी
नवऱ्या बाळासाठीं लागल्या चढाओढी
नवरा बघुं आलं, काय बघतां वाडाहुडा
बाळ अंगठी वरला खडा.
आपल्या भावाच्या मुलालाच मुलगी बहुतेक करून दिली जात असे.
भावाला ती म्हणते करणी धरणी बघू नकोस मुलीला आम्ही पण दागिने घालू.
बंधू ईवाही करू गेले, नको भिऊस करणीला
सोन्याचं कारलं घालूं तुझ्या हरणीला

लग्नातील हळदी समारंभ, देवक, मधुपर्क पूजन, लग्न सोहळा, जेवण, पाठवणी या सगळ्या विधीवर मोठ्या प्रमाणात लोकसाहित्यात लेखन झालेले दिसून येते. लोकसात्यातून स्त्रियांचे सुखदुःख आले असले तरी आजच्या स्त्रियांचे लेखन आणि त्या काळातील स्त्रियांचे लेखन यामध्ये खूप आंतर आहे त्या काळात स्त्रियांना दुय्यम लेखले जात नव्हते असे नाही. त्या काळात आपल्याकडे अजून आधुनिक विचार आलेले नव्हते म्हणून त्यांना आपल्या हक्काची जाणीव नव्हती. लोकसाहित्यातून स्त्रियांचे दुःख आलेला आहे ते दुःख गरीबी कष्ट अस्मानी संकट माहेरचा विरह असे त्याचे स्वरूप होते.

मुलीच्या आयुष्याची पहिली 10-20 वर्षे सोडली तर संपूर्ण आयुष्य सासरी जाते. पती सासू-सासरे चांगले मिळाले तर आयुष्य सुखकर होते नाहीतर दुःख हे पाचवीला पुजलेले. कोणत्या गीतातून सासरच्या ऐश्वर्याचे वर्णन येते तर कोणत्या गीतातून दारिद्र्याची छाया प्रकट होताना दिसते. मुलं झाली तर त्यांचे बालपणीच कोड कौतुक गीतातून येते तर कोठे वांझपणामुळे वाट्याला आलेले दुःख तिचं मन पिळवटून टाकतं.

सासू आणि सासरा दोन सोनियाच्या तारा
त्यांच्या सावलीला मला लागेना ऊन वारा
माळ्याच्या मळ्यामंदी, केळी पेरूला काय तोटा?
माझ्या मामाजीच्या एका इहिरीला बारा मोटा
धाखला माझा दीर वहिनी म्हणाया लाजतो

बंधू पाठीच्या साजतो
सर्व गोता मंदी नंदाबाईची आवड
कंथापाठची शालजोड

रामायण महाभारत काळापासून सुनाना सासुरवास भोगावा लागत आहे. आजच्या आधुनिक युगातही तो अजूनही तग धरून आहे सासुरवास शब्दातून व्यक्त करताना ती म्हणते.

सासुरवास एवढा नका करू सासूबाई
चांदी आलिया सोन्या पायी!
सासुरवासा मंदी गेली काकन कोपराला
बया इच्यारते काय जाचलं लेकराला?

पती हाच परमेश्वर अशी भारतीय स्त्रीच्या मनावर पुराण काळापासून बिंबवलेले आहे. लोकसाहित्यातही हे आपणास पहावयास मिळते. नवऱ्याबद्दल अतिशय सौम्य शब्दामध्ये आपल्या भावना स्त्रियांनी प्रकट केलेल्या दिसून येतात. पती बद्दलचा स्वाभिमान, त्याचे कर्तृत्व, स्वभाव, वागणूक उद्योग धंदा या सर्व गोष्टीबद्दल सुंदर वर्णने लोकसाहित्यात आढळतात.

उंची उंची चोळ्या जावा घालीती शेजाराला
घरधनी किती सांगूं? चला बाजाराला
सोनं झालं सस्त रुपै आलं मोडी
राणी कंथाला हात जोडी

परंतु शेतकरी नेहमीच गरिबीत जीवन जगताना दिसतो. कितीही निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून होती आजच्यासारखी सिंचनाची साधने त्या काळात नव्हती पाऊस पाणी वेळेवर आले तर पीक चांगले यायचे पीक चांगले आले तर रोगराई पडायची. आपल्या पत्नीचे सर्वच हट्ट तो पुरवू शकत नाही. समजावणी घालण्यासाठी तो म्हणतो.

भरतार बोले दमानं घे ग नारी
लेन्यालुगड्याची हौस पूरवीन सारी

माहेरचं गणगोत सासरची मंडळी पती मुल बाळ समाज या सगळ्यांमध्ये ती पूरती गुंतून गेली आहे. परंतु कधी कधी तीचं मन भावना उचंबळून येतात तीच स्वतःच म्हणून जे दुःख आहे. ते अनेक गीतामधून ओव्या मधून लोकसाहित्यातून आलेलं दिसून येतं

आजच्या आधुनिक काळात मुली शिकायला लागल्यात कुटुंबामध्ये त्यांना मानाचे स्थान मिळाले आहे कोणत्याही निर्णयांमध्ये तिच्या मताचा विचार केला जातो. स्त्रिया नोकरी करायला लागलेत पण अजूनही खेड्यामध्ये पाहिले तर मुलींना मुलाप्रमाणे समान वागणूक दिली जात नाही. मुलीच्या शिक्षणाविषयी उदासीनता दिसून येते. प्राथमिक शिक्षण झाले की तिचा विवाह लावून दिला जातो. आणि तिला शेतीमध्ये राबावं लागतं. विवाहासाठी मुलगा पाहताना तिच्या मताचा विचार केला जात नाही. खेड्यात आजही विधवांचा पुनर्विवाह होत नाही. स्त्री ही शेवटी एक माणूस आहे. तिलाही भावना आहेत मन आहे. या भावना दुःख लोकसाहित्यातून काही प्रमाणात चित्रीत झालेल्या दिसून येतात.

दळपाकांडपान दुखतात माझं दंड

बयाच्या जीवावरी सुखवाशी माझा पिंड
नको मला दळू लागू बैस माझ्या जवळी
सावळे मैनाबाई तुझी मनगट कवळी

आपल्या घराण्याचे नाव काढण्यासाठी ती रात्रंदिवस काबाडकष्ट करते सर्व नातीगोती जपते मुलाबाळांची कर्तव्य पार पाडते. नांदून आई बापाचं नाव करते हेच भाव ओवी मधून ती प्रकट करते.

जातीसाठी खाते माती कुळासाठी खाते खस्त
जातकुळी ही लौकिकाची वस्त
जातीसाठी माती खावं गोतासाठी खडे
पिता दौलती लौकिकाला चढे.

पूर्वीपासून आणि आज तागायत देखील बालविवाह मोठ्या प्रमाणावर होत आहेत अनेक असाध्य असे रोग व्हायचे त्यामध्ये पती मरून जायचा आणि आयुष्यभर विधवेच जीवन तिला जगावं लागत होतं त्याची व्यथा शब्दातून मांडली आहे

भरताराचं झालं सरगामंदी सोनं
माग बाईल तुळशीचे वाळवण
रांडपन पण आलं कुन्या अशीलाची तान्ही
ज्वानी जळे दिव्यावानी

समारोप

आधुनिक कालखंडाला सुरुवात होण्या अगोदर स्त्रियांना आपल्या दुःखाची जाणीवच नव्हती म्हणून नकार वेदना किंवा विद्रोहाची भावना त्यांच्या मनामध्ये नव्हती म्हणून लोकसाहित्यात या गोष्टी आपणास पाहावयास मिळत नाहीत. आपण जे जीवन जगतो ते योग्यच आहे अशी त्यांची समजूत होती. मुळातच मध्ययुगीन कालखंडात साहित्यामध्ये व्यक्ती जीवनाला फारसे महत्व नव्हते जे काही साहित्य निर्माण होत होते ते देव देवतांच्या भक्तीपर निर्माण होत होते.

संदर्भ ग्रंथ

१) भागवत दुर्गाबाई - लोकसाहित्याची रूपरेखा
२) मांडे प्रभाकर - लोकसाहित्यचे स्वरूप
३) ढेरे रा. चिं.- लोकसाहित्य शोध आणि समीक्षा
४) मालती दांडेकर - लोकसाहित्याचे लेणे

भारतीय संस्कृतीतील जैन धर्माचे योगदान

डॉ. सुग्रीव बाबुराव आंधळे
(इतिहास विभाग प्रमुख)
अंबिकाबाई जाधव महिला महाविद्यालय, वज्रेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे

भारत उपखंडात जे पाच-सहा प्रसिद्ध धर्म उदयाला आले व ज्यांनी भारताची धर्मभूमी हे नाव सार्थ केले अशा धर्मापैकी जैन धर्म हा एक आहे. विष्णूला उपास्य मानणाऱ्या लोकांचा जसा वैष्णव धर्म किंवा शिवाला उपास्य मानणाऱ्या लोकांचा जसा शैव धर्म तसा जिनाला परमपूज्य मानणाऱ्या लोकांचा जो धर्म तो म्हणजे जैन धर्म होय. जीना ने ज्या धर्माचे कथन केले किंवा ज्याचा उपदेश केला तो जैन धर्म होय. इ.स.पू. सहाव्या शतकाच्या काळात भारताच्या पूर्व भागात नैऋत्य बिहार मध्ये म्हणजे मगधात फार मोठ्या प्रमाणात बौद्धिक चळवळ चालू होती. त्यावेळी वैदिक धर्माचे अनुयायी ब्राह्मण आणि अवैदिक मते प्रतिपादन करणारे श्रमण असे तत्कालीन मतप्रणालीचे दोन ठळक भेद होते. अवैदिक पंथातील एक पंथ म्हणजे निरग्रंथांचा पंथ म्हणून अस्तित्वात होता. याच पंथात होऊन गेलेल्या व पुढे स्वतंत्र महत्त्व प्राप्त झालेल्या महावीरांना जीनही उपाधी प्राप्त झाली व हा पंथ जैनांचा पंथ म्हणून ओळखला जाऊ लागला.

विचार व अचार अशी प्रत्येक धर्माची दोन अंगे असतात. जैन धर्माच्या विचारांचे मूळ स्यादवाद व आचारांचे मूळ अहिंसा हे आहे. कोणत्याही व कोणाच्याही विचारांचा अन्याय न व्हावा किंवा कोणत्याही प्राण्याची हिंसा न व्हावी अर्थात सर्वांचे विचार समजून घ्यावे आणि सर्वांनी सर्वांच्या जीवनाची रक्षा करावी हे जिनांच्या उपदेशांची मूलतत्त्वे आहेत. जैन परंपरा ऋषभ देवापासून आपल्या धर्माची उत्पत्ती झाल्याचे सांगते. जैन धर्माचे एकूण 24 तीर्थंकार होऊन गेले.1. शेवटचा तीर्थंकार म्हणून वर्धमान महावीराचे नाव घ्यावे लागेल. 63 शलाका पुरुषात सर्वप्रथम आदि तीर्थंकार ऋषभदेवाचे नाव येते. जैन पुराणातून ऋषभदेवाची जीवन तपस्या, त्यांनी मिळवलेले केवल ज्ञान आणि केलेला धर्म उपदेश या गोष्टींची विस्तृत वर्णने मिळतात. ऋषभ देवाला शंभर पुत्र होते, त्याने आपल्या या पुत्रांना जो उपदेश केला त्याचा सारांश जैन साहित्यात आढळतो.

पार्श्वनाथ हा 23 वा तीर्थंकार होय पार्श्वनाथाने अहिंसा, सत्य, अस्तेय व अपरिग्रह या चार तत्त्वावर आपल्या चतुर्य धर्माची मांडणी केली. जैन धर्माच्या इतिहासात भगवान महावीराची कामगिरी अद्वितीय आहे. महावीराने उत्तर आणि पूर्व भारतात सर्वत्र प्रवास करून सर्वांना प्रभावित केले. तत्कालीन अनेक पंथोपंथांच्या उलाढालित जैन धर्माला स्थैर्य आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हे महावीरांचे अलौकिक कार्य होय. महावीरांच्या पश्चात त्यांच्या शिष्यामध्ये गौतम, सुधर्म व जम्बुस्वामी हे तीन केवल ज्ञानी झाले. शेवटचा ऋतकेवली भद्रबाहू हा मगधात दुष्काळ पडला असता एका मोठ्या जैन संघाबरोबर दक्षिण देशात निघून गेला. त्या कारणाने तमिळनाडू व कर्नाटक या प्रदेशात जैन धर्माचा पुष्कळ प्रसार झाला. महावीराच्या काळी भारतात 16 महाजन पदे होती. यापैकी बऱ्याचशा जनपदातील राजपुरुषांशी महावीरांचा संपर्क आला होता. चेतक हा वैशाली जनपदाचा राजा

होता तो जैन स्रावक होता. शिशुनाग वंश, नंदवंशाच्या राजांनी जैन धर्माला पाठिंबा दिलेला आपणाला पाहायला मिळतो.

जैन धर्माचा प्रसार:

मौर्यकाळात जैन धर्मापेक्षा बौद्ध धर्माला राजाश्रय अधिक प्रमाणात लाभला असला तरी सगळेच मौर्य राजे बौद्ध होते असे म्हणता येणार नाही. चंद्रगुप्त मौर्य जैन असून भद्रबाहूचा शिष्य होता. मगधाच्या दुष्काळाच्या वेळी भद्रबाहू बरोबर तोही दक्षिणेत गेला आणि श्रावणबेळगोळ येथे त्यांनी आपला देह ठेवला. जे कार्य अशोकाने बौद्ध धर्माच्या बाबतीत केले तेच कार्य संप्रतीने जैन धर्माच्या बाबतीत केले. त्यांनी भारताच्या उत्तरेस आणि पश्चिमेस जैन धर्माचे प्रचारक पाठवले आणि त्या भागात जैन साधूसाठी विहारही बांधले. 2. इ.स.पू. काही शतकापासून ते इ. स.च्या दहाव्या शतकापर्यंत मथुरा हे जैन धर्माचे मोठे केंद्र होते. इ.स.पू. चौथ्या शतकात दुष्काळाच्या प्रसंगी मगधातून भद्रबाहूच्या नेतृत्वाखाली जैन श्रमण दक्षिणेत गेले तोच काळ दक्षिणेच्या जैन धर्मात प्रवेशाचा असावा. तमिळनाडूच्या चोल व पांड्यराजांनी जैन धर्माला आश्रय दिला होता. तमिळनाडूपेक्षा कर्नाटकात जैन धर्माचा चांगला जम बसला. कर्नाटकातल्या अनेक महिलांनी जैन धर्माच्या प्रसारासाठी परिश्रम केलेले आहेत. इ.स.च्या सातव्या शतकात दक्षिण भारतात राष्ट्रकूट राजवंशानेही जैन धर्माला राजाश्रय दिला. त्यानंतर आलेले चालुक्य राजे ही जैन धर्माचे होते. होईसळ वंशाची स्थापना जैन मुनीनेच केली होती. अशा रीतीने कर्नाटकात जैन धर्म वाढला परंतु पुढच्या काळात तमिळनाडूमध्ये मात्र त्याला वाईट दिवस आले. तिथल्या पांड्य व पल्लव राजांनी शैवाचार्यांच्या प्रभावामुळे जैन धर्माच्या उच्चाटनाला मदत केली.

गुजरात मधील काठीयावाड अनिहिलवाढ येथे जैन धर्माची केंद्र होती. गुजरात बरोबर राजस्थानमधील अबूच्या पहाडावर ऋषभ देवाचे कलापूर्ण मंदिर बांधून जैन धर्माचा प्रसार केला. इ.स.च्या आठव्या, नवव्या शतकात मध्य प्रांतात कलचुरी राजांनीही जैन धर्माला आधार दिला. बुंदेलखंडातही जैन धर्माने आपला जम बसवला. खजुराहोची जैन मंदिरे, सोनगीर, देवगड इत्यादी क्षेत्रे या गोष्टींची साक्ष देतात. पश्चिम बंगालमध्ये जैन धर्माचा विशेष प्रसार झाला होता. कर्नाटकाच्या उत्तरेतील व कोल्हापूर हे जैनांचे एक प्रमुख केंद्र होते. पैठण, वेरूळ येथेही जैनांची प्रमुख केंद्र होती. इ.स.च्या दहाव्या शतकापासून दक्षिणेत जैन धर्माच्या ऱ्हासाला प्रारंभ झाल्यामुळे महाराष्ट्रात जैनांचे प्राबल्य वाढू शकलं नाही. चक्रधर स्वामींच्या विचार विश्वावर जैन धर्माचा प्रभाव दिसतो. महानुभव पंथाच्या आचार विचारांचे जैन धर्माशी बरेच साम्य आहे.4. शिलाहारांची जैनावर कृपा होती. महाराष्ट्रात पैठण, एलीचपूर, कोल्हापूर व तेर ही जैन तीर्थक्षेत्रे प्रसिद्ध आहेत.5. इ.स.च्या अकराव्या शतकापासून भारताला मुसलमानांच्या विध्वंसक आक्रमणाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे भारतातील धार्मिक, सामाजिक व राजकीय जीवनाचे धागे विस्कळीत झाले. अशा स्थितीत सुद्धा कित्येक जैनाचार्यांनी कडव्या मुसलमान सुलतानावर प्रभाव पडून आपला धर्म टिकून ठेवण्याचे काम केले.

वैदिक व जैन धर्मातील साम्य स्थळे:

बौद्ध व जैन धर्माच्या आधी वैदिक व पुढे ब्राह्मणी अशा परंपरेतील धर्म अस्तित्वात होता. ब्राह्मणी धर्माचे मूळ बदलत जाऊन तो हिंदू धर्म या नावाने ओळखला जाऊ लागला. हा वैदिक

ब्राह्मणी धर्म आणि बौद्ध व जैन धर्म यांच्या परस्परासंबंधीत चर्चा फार उद्भवधक ठरतात. जैन धर्म हा इ.स.पू. सहाव्या शतकाच्या आधीपासूनच अस्तित्वात होता. पहिले तीर्थंकार ऋषभदेव यांचा काळ जैन धर्मियांनी अगदी सृष्टीच्या प्रारंभाच्या काळाशी जोडला आहे. भगवान महावीरांनी जैन धर्म लोकाभुमूत केला. जैन धर्माने जन्माधीष्टीत श्रेष्ठता नाकारून कर्म सिद्धांतावर भर दिला आहे. वैदिक धर्मातील यज्ञातील पशुहिसेला विरोध करून जैन व बुद्धांनी अहिंसेचा मार्ग अवलंबला. जैन उपासकाच्या संसारी जीवनाला योग्य वळण लागावे यासाठी संस्काराची आवश्यकता मान्य करण्यात आली. जैन धर्माने वैदिक परंपरेतील गृहयधर्म अनुसरला हे स्पष्ट आहे.6. वर्णव्यवस्था प्रारंभी जैनांनी नाकारली होती. वैदिक परंपरेतील संन्यास ही संकल्पना व जैन धर्मातील श्रमण साठीचे नियम यात बरेच साम्य आहे. मनुचे संन्यासा विषयीचे नियम नंतर जैन श्रमाणासाठी जैनांनी स्वीकारलेले दिसतात. वैदिक परंपरेतील संन्याशी, बौद्ध धर्मातील भिक्षू आणि जैन धर्मातील साधू यांच्यासाठी जे नियम केलेले आहेत ते बऱ्याच अंशी सारखे वाटतात. याचे मूळ प्राचीन काळातील श्रमण परंपरा होय.7.

हिंदू, बौद्ध व जैन धर्मावर तांत्रिक मतांचाही प्रभाव पडलेला दिसतो. हिंदू व बौद्ध धर्माप्रमाणेच जैन धर्मातही तांत्रिक विचार डोकावल्याशिवाय राहिला नाही. जैन देवता मंडळातील 64 योगिनी सारख्या तांत्रिक देवतांना मिळालेले स्थान व जैन मंदिरात आढळणारी सिद्धचक्र पूजा, मुद्रा विचार, मुद्राविधी हे ग्रंथ जैन धर्मावरील तांत्रिक विचारांचा प्रभाव स्पष्ट करतात. वैदिकांचा कर्म सिद्धांत जैन धर्माने मान्य केला आहे.8. या कर्म सिद्धांतावरच स्वर्ग नरक यांच्या कल्पना आधारलेल्या आहेत.

जैन व बौद्ध या दोन्ही धर्मांचा भारताच्या सांस्कृतिक जीवनावर बराच मोठा प्रभाव पडलेला आहे. या दोन्ही धर्मातील नीती विषयक कल्पना पैकी उच्च अशा कल्पना हिंदू विचारसरणीने अंगीकृत केलेल्या आहेत. कोणत्याही जीवाबद्दल वाटणारी अस्ता, प्राण्याबद्दल वाटणारी दया त्या दृष्टीने मनुष्य प्राण्यावर असलेली जबाबदारी आणि उच्च मानवी मूल्यांसाठी करावयाची धडपड या सर्व गोष्टींची नव्याने जाणीव जैन धर्मने दिली असे मानावे लागते. जैन धर्मियांच्या ज्या प्रदेशांशी संबंध आला त्या त्या प्रदेशातील बहुसंख्य लोक शाकाहारी आहेत हा जैन धर्मातील अहिंसा तत्त्वांचाच प्रभाव आहे असे मानावे. महाभारताच्या लोकाभिमुख धर्मावर जैन व बुद्ध या दोन्ही धर्मांचा प्रभाव पडलेला स्पष्टपणे जाणवतो. एकंदर विचार करता असे म्हणावे लागते की जैन धर्मातील तत्त्वांचे महत्त्व पटल्यामुळे प्राचीन काळापासून असलेला धर्म अधिक लोकाभिमुख आणि मानवतावादी झाला.

कुणीही जन्माने शुद्ध होत नाही किंवा जन्माने ब्राह्मण होत नाही कर्माने तो शुद्ध होतो व कर्मानेच ब्राह्मण होतो, ही जैन धर्मातील वचन लक्षात ठेवण्यासारखी आहेत. या दोन्ही धर्माने जन्माने श्रेष्ठत्व ओढुन घेण्याच्या वृत्तीवर टीका केली आहे. जातीभेद निर्मूलना बरोबरच सर्वांना मोक्षाची द्वारे खुली करण्याचा उदात्त हेतू या धर्माने बाळगला. अध्यात्मिक क्षेत्रात जन्मनिरपेक्ष समान संधीची तत्त्व या धर्माने स्वीकारली. ही संधी स्त्रियांनाही देण्यात आली हे विशेष मानाले पाहिजे.10. जैन धर्मातील श्रमनि संघाची स्थापना व संघटना या दृष्टीने महत्त्वाची मानावी लागते. दैनंदिन आचरणातील अहिंसा तत्वाला दिले गेलेले महत्त्व लक्षात घेण्याजोगे आहे. आपल्या तत्त्वाचा प्रसार करण्याच्या पद्धतींनी ही या दोन्ही धर्मांनी भारतीय संस्कृतीच्या विकासात एक महत्त्वाच्या

अंगाची भर घातली. बहुजन समाजाच्या भाषेत या धर्माने वांग्मय रचना केली. त्यामुळे भारताच्या सांस्कृतिक इतिहास समजण्यास मदत झाली.11. शून्यवादाचे तत्त्वज्ञान व विज्ञानवादी विचारसरणी या दोन्हींचा प्रभाव शंकराचार्यावर पडलेला दिसतो. जैन दर्शनाने स्यादवादाचा विचार करताना उदार व विशाल दृष्टिकोन कसा ठेवावा हे विशद करतो.

अशाप्रकारे आध्यात्मिक क्षेत्रात समान संधीचे तत्व पुरस्कारणार्या या धर्माच्या सांस्कृतिक कार्याचे मूल्यमापन वाखाणण्याजोगे आहे. अनेक चढउताराच्या कालावधीतील आपले अस्तित्व टिकून ठेवून भारतीय संस्कृतीला उच्चतम पातळीवर नेऊन ठेवण्याचे काम जैन धर्माने केलेले दिसते यातच जैन धर्माचे मोठेपण आहे.

संदर्भ साधने

1. जोशी महादेव शास्त्री, भारतीय संस्कृती कोश, तिसरा खंड, अनमोल प्रकाशन, पुनर्मुद्रण 1993, प्र.क्र. 651
2. उपरोक्त, भारतीय संस्कृती कोश, प्र. क्र.653
3. उपरोक्त, भारतीय संस्कृती कोश, प्र. क्र.654
4. उपरोक्त,भारतीय संस्कृती कोश, पृ. क्र. 654
5. उपरोक्त, भारतीय संस्कृती कोश, पृ. क्र. 655
6. सिंधू डांगे, जैन धर्म आणि तत्त्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती 1980 ,पृ. क्र. 186
7. उपरोक्त, जैन धर्म आणि तत्त्वज्ञान,पृ.क्र. 194
8. उपरोक्त, जैन धर्म आणि तत्त्वज्ञान, पृ. क्र. 202
9. Basham A.L.The Wonder That was India, page no.171
10. थापर रोमिला, प्राचीन भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली,संस्करण चौथे, प्र. क्र.107
11. कोसंबी डी.डी., पुराणकथा आणि वास्तवता, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, प्र. क्र. 215

'खाण' कादंबरीमधील वडार समाजाच्या व्यथा

डॉ. शारदा किशन धामणगांवकर

रामचंद्र नलावडे यांनी 'खाण'या कादंबरी मधून वंचित उपेक्षित भटक्या समाजाचे चित्रण केले आहे. वडार समाजाची सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक परिस्थिती कशी आहे, याचे वास्तव दर्शन 'खाण' कादंबरीमधून मांडले आहे. पिढ्यानपिढ्या भटका - विमुक्त वडार समाज भीषण दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा व्यसनाधीनता, निरक्षरता इत्यादी दुष्टचक्रात सापडून लाजिरवाणे जीवन जगत आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पासून कसा वंचित आहे, याचे वास्तव चित्रण रामचंद्र नलावडे यांनी 'खाण' या कादंबरी मधून केले आहे.

वडार ही भटकी जमात असल्याने आज येथे तर उद्या तेथे अशी त्यांना सारखी भटकंती करावी लागत होती. रस्ता दुरुस्ती, विहीर व तळी खोदणे, जाती, उखळे, पाटे, वरवंटे तयार करणे, रस्ता तयार करण्याकरता दगड पुरविणे, घरे, वाडे, मंदिर यांच्या बांधकामाकरिता दगडाचे चिरे तयार करणे इत्यादी कामामुळे त्यांना सतत भटकंती करावी लागत होती. मोठ मोठ्या इमारती, तलाव, धरणे, रेल्वेमार्ग यांच्या अवतीभोवती ते वास्तव्य करतात. काम सुरू असेपर्यंत त्यांचे तेथे वास्तव्य असते. काम संपले की पुन्हा स्थलांतर करतात. वडार समाज अनादी काळापासून गावकुसाबाहेरचे जीवन अनेक अपत्तींना तोंड देत जगत होता. त्यामुळे हा समाज शिक्षणापासून वंचित राहिला. वडार समाज राणावनात पशुवत जीवन जगत असल्यामुळे त्याला पोट भरण्याशिवाय अन्य कसलीही भ्रान्त उरली नव्हती. वडार,या भटक्या जातीचा पिढ्यानपिढ्यांचा व्यवसाय म्हणजे दगड फोडण्याचा. दगड फोडून हा समाज स्वतःच्या कुटुंबाची उपजिविका भागवीत असे. सांगायला गावाचं नाव नाही, राहण्यासाठी घर नाही, आणि खाण्यासाठी पोटात अन्नाचा कण नाही, अशी वडारांची परिस्थिती होती.

'खाण' या कादंबरी मधील वडार समाजातील लोकांवर दागिने चोरीचा आरोप आला होता. त्याच्या चौकशीसाठी पोलीस इन्स्पेक्टर घोसाळकर आले असताना वडार वस्तीतील मुकारी त्याला दोन्ही हात जोडीत गयावया करीत म्हणाला. "साहेब आमी खाणीत दगाड फोडून पॉट भरनारी मान्स हाव. ऐकूद्या बारीला खायाला नसलं तर आमी शेतातील उंदीर, घोरपड आणि नदीतलं मासं भाजून खाताव. पर कुनाच्या वस्तूकीला आमची जात आजाबाद हात लावणार न्हाय. त्ये पाप हाय.आमच्या देवाला दिकून चोरी करून पॉट भरलेलं चालत न्हाय बगा."१

वडार समाजाची आर्थिक परिस्थिती बिकट होती. हा समाज दगड फोडून आपली उपजीविका भागवीत असे. तसेच रानावनात फिरून, शिकार करून, उदरनिर्वाह करीत असे. असे असले तरीही त्यांच्यामध्ये प्रामाणिकपणा होता. हे कधीही चोरी करीत नसत. प्रामाणिकपणाने काम करून आपले जीवन जगतात.

वडार समाज हा कष्टकरी असल्याने थकवा घालविण्यासाठी काम करून संध्याकाळी घरी आल्यावर ते दारू पितात. अशा त्यांच्या नित्याच्या दारू पिण्याच्या सवयीमुळे त्यांना व्यसन लागते. खूप काबाड कष्ट करून मिळवलेली मजुरी दारूत खर्च करतात.लग्न व मरण या दोन्ही वेळी मद्यपानाचे प्रमाण वाढलेले दिसते. म्हणून आनंदोत्सव साजरा करण्यासाठी लग्नात दारू पितात,तर

दुःख विसरण्यासाठी मरणात दारू पितात. कोणाचा मृत्यू झाला असेल तर त्याला स्मशानात पोहचून आल्यावर दारू पितात. दारूमुळे कुटुंबात कलह निर्माण होतात.अशावेळी बायका पोरांचे हाल होतात. मुलांच्या खाण्यापिण्या बरोबर शिक्षणाची आबाळ होते.

वडार समाजात दारिद्र्य, निरक्षरता आणि व्यसनाधीनता असली तरीही या समाजाची देवावर अपार श्रद्धा आहे. देवाचा कोप आपल्यावर होईल म्हणून ते देवाला खूप घाबरतात. भटकंतीचे जीवन जगत असतानाही ते देव आपल्याबरोबर घेऊन फिरतात. पोटाला चिमटा देऊन वडार समाज दरवर्षी आपल्या ऐपतीप्रमाणे देवाची जत्रा करीत असतो. या समाजातील काही लोक यल्लमा देवीचे निस्सीम भक्त आहेत. याल्लाकाचे आई-वडील शेवंता आणि तिम्मा हे दोघे यल्लमा देवीचे निस्सीम भक्त होते. त्यांची सौदंत्तीच्या यल्लमा देवीवर खूप भक्ती होती. त्यांनी यल्लाक्काच्या जन्मासाठी देवीला नवस बोलला होता. ती देवी त्यांना पावली होती. यल्लमा देवीच्या नावावरून त्यांनी मुलीचे नाव यल्लाक्का ठेवले होते. एके दिवशी, आकाराम म्हातारा यल्लाक्काचे वडील तिम्माला म्हणाला, "तिम्मा, तू यल्लाक्काच लगीन करण्याच्या भानगडीत आजाबात पडू नकूस."

"का? " तिम्माने त्याला दचकून इचारलं.

"आरं, असा रं काय करत्यूस? तुम्ही दोगा न्हवरा बायकूनं यल्लामा देवीला नवस बोल्लाव म्हून तर ती जल्माला आली हाय. तुज्या लेकीला आता जल्मभर आईची शेवा करीत जगायला होवं. तिच्या नावाने जोगवा मागून आता तिला तिचं पॉट भराया पाहयजे. तवा तू तिच्या लगनाचा तुज्या मनात आजाबाद इचार आनू नूकूस. आईची सेवा केली म्हंजी मेवा सुदिक खायाला मिळतू. यल्लामा देवीच्या मना इरुद तू काय केलंस तर तुजा ती भयाभंग करील. तुज नाव सांगनारा म्होरं तुज्या घरात कुणी ऱ्हानार न्हाय. तवा तू त्याचा तुज्या मनात नीट इचार कर."[2]

वडार समाजातील लोकं, देवी आपला निर्वंश करील म्हणून देवीला घाबरतात. यावरून असे दिसून येते की, गरीब असो किंवा श्रीमंत वडार समाजाची यल्लमा देवीवर अपार श्रद्धा आहे. कर्नाटक राज्यातील सौंदत्ती गावी असणाऱ्या यल्लामा देवीची वडार समाजात मोठ्या प्रमाणात पुजाआर्चा केली जाते. देवीच्या नावाने मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी निरंकार उपवास करतात. गरीब कुटुंबातील स्त्रिया 'अक्कूल दे जोगवा' म्हणत जोगवाही मागतात.

पूर्वापार भटकंतीचे जीवन जगणाऱ्या वडार समाजात अंधश्रद्धा इतर मागास समाजापेक्षा अधिक पाळली जाते. सीता रामा बरोबर वनवास भोगताना अंगात चोळी घालत नव्हती. तिच्यावर असणाऱ्या श्रद्धेमुळे वडार समाजातील स्त्रिया अंगात चोळी घालत नव्हत्या, परंतु सध्या सर्रास स्त्रिया चोळी घालतात. चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी हे प्रमाण नगन्य होतं. खोटं बोलणाऱ्याला यल्लामा देवी कडक शिक्षा करते, म्हणून अरेरावी, व्याभिचार, चोरी, लांडी, लबाडी केली तर त्या इसमाला यल्लमा देवीचा भंडारा उचलायला सांगतात. त्याने भंडारा उचलला नाही तर तो अपराधी आहे असे समजतात. घुबडाचा आणि कोल्ह्याचा आवाज कानावर पडल्यावर अशुभ मानतात. सकाळी कामाला निघताना मांजर आडवे गेले तर ते मनाने खूप निराश होतात.आज काम होणार नाही असा ते मनात समज करून घेतात. भूत पिशाच्चा पासून रक्षण व्हावे, साप नजरेला पडू नये म्हणून अमावस्येच्या दिवशी नारळ फोडतात. शनिवारी दाढी केस कापणे निषीद्ध मानतात. घरातील एखादी मृत व्यक्ती स्वप्नात

आल्यावर सकाळी कुटुंबात त्याची चर्चा होते. सण असेल तर त्या दिवशी मृतात्म्यास नैवेद्य दाखवितात. तसेच दारु मटणाचा नैवेद्य हि मृतात्म्यास दाखवितात.

वडार समाजामध्ये न्यायासाठी जातपंचायत अस्तित्वात होती. वडार समाजातील जातपंचायत स्त्रीच्या चारित्र्यावर बारीक लक्ष ठेवून असायची,एखाद्या स्त्रीबद्दल तिच्या नवऱ्याने तक्रार केली तर जात पंचायत बैठक घेऊन त्या स्त्रीला त्याचा जाब विचारीत असे. अशावेळी ती स्त्री दोषी आहे असे, पंचाचे मत झाल्यावर त्याला आणखी पुराव्याची गरज उरत नसे. जातपंचायतीचा प्रमुख तिला उपस्थित मंडळींच्या चपला टोपलीत भरून ती टोपली तिच्या डोक्यावर देत असे. बैठक संपेपर्यंत ती स्त्री डोक्यावर टोपली घेऊन बैठकीच्या मधोमध उभी राहत असे. एखाद्या वेळी त्या स्त्रीला उकळत्या तेलातून पैसा काढून दाखवण्यासाठी जातपंचायतीचा प्रमुख फर्मान सोडी किंवा यल्लमा देवीचा अंगारा उचलायला लावत असे. एखादी स्त्री दोषी असेल तर ती देवीचा भंडारा उचलत नसे. ती पंचायती समोर लगेच गुन्हा कबूल करायची. स्त्रीने गुन्हा कबूल केल्यावर तिला कोणती शिक्षा करायची याचा पूर्ण अधिकार जातपंचायतीलाच असे. मुकारी हा जात पंचायतीचा प्रमुख होता. तिम्माची मुलगी यल्लाक्का बाळू ड्रायव्हर सोबत पळून गेली होती. म्हणून मुकारी तिम्माला म्हणाला. "तिम्मा, तुज्या लेकीनं डायवर संगट पळून जाऊन जातीला बट्टा लावलाय. आपल्या जातीत हे असलं काय चालत नाय. तवा तू येत्या आईतवारी बोकड कापून समद्यांना दारू मटणाचे जेवान घाल. पंचाचा खर्च म्हून तू रोक दोनशे पन्नास रुपये बैठकीत आनून भर. असं तू जर करनार नसशील तर तुला आमी जातीच्या बाहिर पडायला सांगू. उद्या तुज्या घरात मैत झालं तर आमी कुनी येणार न्हाय. तुजा तू आनि आमच आमी. तुजा काय इचार हाय त्ये तू आमाला या बैठकीत लगीच सांग. म्हंजी म्होरं काय करायचं त्ये आमी ठरवू!"३

तिम्माच्या मुलीने बाळू ड्रायव्हर सोबत पळून जाऊन जातीला बट्टा लावला आहे, म्हणून जात पंचायतीत न्यायदानाचे काम करणारा प्रमुख आणि त्याला मदत करण्यासाठी आणखी चार-पाच माणसे असतात. ते आपापसात चर्चा करून अपराध्याला शिक्षा करतात. ही शिक्षा दारू मटण किंवा दंड रोख रकमेची असायची. हे जर केले नाही तर त्यांना वाळीत टाकले जात. जातपंचायतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान असल्याचे दिसून येते. जातपंचायतीत स्त्रीला बोलण्याचा मुळीच अधिकार नाही. तसा कोणी प्रयत्न केलाच तर जातपंचायतीच्या रोषाला तिला नाहक बळी पडावे लागते. त्यामुळे या समाजातील स्त्री चूल आणि मूल या पलीकडे जाऊ शकले नाही.

वडार समाजातील काही लोक ठेकेदारीचा व्यवसाय करून श्रीमंत झाले आहेत. श्रीमंत ठेकेदार त्याच्याकडे काम करणाऱ्या समाज बांधवाकडे सहानुभूतीने पाहत नसत. काम करणाऱ्या मजुराची पिळवणूक करत. कादंबरी मधील एका प्रसंगात तिम्मा रघुला म्हणाला, "लेका, या दगूड कामात आता काय राम ऱ्हाईला न्हाय."

"का रं?" रघु.

"आपून येवडं उनातानात मरमर काम करतू तरी कंधी आपल्याला पॉटभर खायाला मिळत न्हाय. अंगावर घालायला नवं धडुत दिकून मिळत न्हाय. ठेकेदार समदी मलई खातू आन आपल्या त्वाडाला त्यो पानं पुसतो. जो ठेकेदार आपल्याला भेटतू, त्यो आपल्याला फसवतू आपल्या जीवावर त्ये शारगावात जागा, जमिनी घेऊन बंगले बांधतात. बायकू मुलांना त्ये सोन्याच्या दागिन्यांनी मढवतात. हिकड आपूण कोरभर भाकरीसाठी महाग अस्तू. आपून जगतू कि मरतू याची ठेकेदार कंधी बी साधी चवकशी करीत न्हाईत. आपल्या जातीचा ठेकेदार असला तरी त्यो आपल्याला फसवतू. मला समद्या ठेकेदाराचा चांगला अनुभव आलाय. गरिबांचे रगत प्याल्या बिगार त्यास्नी बंगले बांधता येत न्हाईत.

नव्या गाड्या उडवता येत न्हाईत." तिम्मा मनात निराश व्हवून म्हणला. "बा,मला सुदीक त्ये ठाव हाय बग. पर आपून गरीब हाव. त्याचा त्ये लई गैरफायदा घेतात."४

ठेकेदार त्यांच्याकडे काम करणाऱ्या मजुराची पिळवणूक करतात.अशिक्षित मजूर ठेकेदाराच्या विरोधात कधीही जात नाहीत. त्यांची मर्जी सांभाळण्यासाठी ते नेहमी धडपडत असतात. वडार जातीत ज्यांचा जन्म झाला त्यांचा या ठेकेदारांशी संबंध येतो. त्यांच्या जातीतील ठेकेदार असला तरी त्यांची फसवणूक करतो. धूर्त ठेकेदार वडारांना कायम हिशोबात फसवीत,त्यांच्या कामाचा कधीही हिशोब करीत नसत आणि हिशोब केला तर त्यांच्यावर थकबाकी दाखवीत. वडार ठेकेदारावर विश्वास ठेवून त्यांच्याकडे वर्षानुवर्ष काम करीत.त्या ठेकेदारावर अविश्वास दाखवीत नसत. ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे वडार समाजातील लोकांना वागावे लागत असे.

स्वातंत्र्योत्तर काळात वडार समाजात मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे. भारतातील राज्यघटनेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तरतूद केल्यामुळे मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणासाठी अनेक कल्याणकारी योजना जाहीर झाल्या आहेत. त्याचा फायदा तळागाळात राहणाऱ्या वडार समाजाला होत आहे. वडार समाजातील काही व्यक्ती शिक्षण घेऊन आज मोठ्या पदावर काम करताना दिसत आहेत. आज वडार समाजातील काही तरुण-तरुणी डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, वकील झालेले आहेत. काही जण स्पर्धा परीक्षेत यश मिळवून शासनाच्या मोठ्या पदावर काम करीत आहेत. अगोदर या समाजातील महिलांची वाईट परिस्थिती होती. परंतु ती आता राहिली नाही. आज वडार समाजाच्या मुली शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. या समाजातील मुली डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षिका झाल्या आहेत. याचे श्रेय नक्कीच थोर युगपुरुष महात्मा ज्योतिबा फुले यांचे आहे. त्यांनी देशात सर्वप्रथम मुलींची शाळा पुण्यात सुरू केली. त्यामुळे भटक्या विमुक्त समाजातील मुलींना शिक्षण घेता आले. स्वतंत्र्योत्तर काळात भटक्या विमुक्त वडार समाजाला शिक्षण घेतल्यानंतर सरकारी खात्यात नोकरी मिळू लागल्या. त्यामुळे त्यांच्या जीवनात काही प्रमाणात स्थैर्य आलेले आहे. या समाजातील काही मंडळी नौकरी धंदा करून श्रीमंत झाली म्हणजे सर्व वडार समाज सुधारला असे म्हणता येणार नाही.

निष्कर्ष

१) प्रस्तुत कादंबरीमध्ये वडार समाजाचे वास्तववादी जीवनदर्शन घडत असल्यामुळे त्यांच्या जीवनशैलीबरोबर भाषाशैलीचेही दर्शन घडते.

२) रामचंद्र नलावडे यांच्या 'खाण' कादंबरीमधून मनोरंजन, उद्बोधन होत असले तरी समाजातील धगधगत्या वास्तवाचा अस्वस्थ जीवनपट वाचकाला अंतर्मुख करून सोडतो.

३) खाण' कादंबरीचे शीर्षक आशयाला अनुरूप असून सूचकार्थ सुचविणारे आहे.

४) वडार समाजाच्या व्यथावेदनेचा आक्रोश 'खाण' कादंबरी मधून अविष्कृत झाला आहे.

संदर्भ ग्रंथ

१) नलावडे रामचंद्र -'खाण', दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, प्रथम आवृत्ती २०१७ पृ.३९.

२) तत्रैव,पृ.१७ ३) तत्रैव,पृ.३७ ४) तत्रैव पृ.४९

भारतीय राज्यघटनेतील घटनादुरूस्ती एक दृष्टीक्षेप

सहा. प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव
राज्यशास्त्र विभाग
बा. दे. पारवेकर महाविद्यालय पारवा

प्रस्तावना :–

दीडशे ते पाउने दोनशे वर्ष ब्रिटीशांच्या पारतंत्र्यात असलेल्या भारतीया समोर दोन महत्वाचे प्रश्न होते. पहिला प्रश्न भारताला ब्रिटीशांच्या पारतंत्र्यातुन मुक्त करून भारताला स्वातंत्र्य मिळून देणे आणि दुसरा महत्वाचा प्रश्न म्हणजे स्वातंत्र्य भारताची राज्यव्यवस्था कशी असावी आणि ती कशी चालवावी हे दोन प्रश्न भारतीयांसमोर असतांना, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. अशा या स्वातंत्र्य भारताचे संविधान निर्माण करण्यासाठी जुलै १९४६ च्या कॅबीनेट मिशन योजनेनुसार घटना समीतीच्या निवडणुका झाल्या. या घटना समीतीने ९ डिसेंबर १९४६ ते २६ नोव्हेंबर १९४९ हा कालावधी २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतका असुन, या कालावधीत स्वातंत्र्य भारताचे संविधान लिहुन पुर्ण झाले. आणि या संविधानाचा अमल २६ जानेवारी १९५० या दिवसापासुन सुरू झाला.

भारतीय घटना कर्त्यांनी राज्यघटना लिहत असतांना, भुतकाळ, वर्तमानकाळ, व याबरोबरच भविष्यकाळ समोर ठेउनच आपल्या भारताचे संविधान निर्माण केले. हे संविधान विशिष्ठ काळी निर्माण केलेले असल्यामुळे, बदलत्या समाजाबरोबरच परिस्थीती सापेक्ष भारतीय संविधानात देखील बदल अत्यंत महत्वाचा असतो, कारण संविधान हे साध्य नुसन साधन आहे. ते बदलत्या परिस्थीतीनुसार साधनात देखील बदल अपेक्षीत असतो. असेच संविधान त्रीकालाबाधीत ठरते. अन्यथा ते संविधान निरूपयोगी दोषपुर्ण ठरते. याच उद्देशाने घटनाकर्त्यांने बदलत्या समाजाबरोबरच संविधानात देखील बदल करता आला पाहिजे. याकरीता राज्यघटनेतील भाग २० कलम ३६८ नुसार घटना दुरूस्तीची पध्दत राज्यघटनेत स्वीकारण्यात आलेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात घटनादुरूस्तीची आवश्यकता, घटनादुरूस्तीच्या पध्दती, व घटनादुरूस्तीची वैशिष्ठे यासंदर्भात सविस्तर विश्लेषन करण्यात आलेले आहेत.

घटनादुरूस्तीची आवश्यकता :–

कोणत्याही देशाची राज्यघटना ही एका विशिष्ठ काळी निर्माण केलेली असते. त्यामध्ये कालसापेक्ष त्या राज्यघटनेत काही दोष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा भविष्यकालीन परिस्थीतीचा विचार प्रत्येक देशाच्या राज्यघटनेत केलेला असतो. राज्यघटना ही अंतीम साध्य नुसन ते एक साधन आहे. बदलत्या परिस्थीतीनुसार या साधनात देखील बदल अपेक्षीत असतो. अन्यथा राज्यघटनेत अनेक दोष निर्माण होतात. राज्यघटना कालबाह्य ठरते. परिणामी समाजात क्रांतीची शक्यता नाकारता येत नाही.

घटनादुरूस्तीच्या संदर्भात संविधान सभेत **पंडीत जवाहरलाल नेहरू** आपल्या भाषणात असे म्हणतात की, ''आम्ही भारतीय संविधानाला एक ठोस आणि स्थायी स्वरूप देउ इच्छितो परंतु संविधानात कोणतेही गोष्ट चिरस्थायी नसते. जर आपण संविधान पुर्णपणे परिदृढ केले तर त्यामुळे राष्ट्राची प्रगती खुंटते. परिणामत: राष्ट्रातील लोकांचे जीवनही खुंटते.''

प्रा. गार्नर असे म्हणतात की, ''कोणतेही लिखित संविधान त्यामध्ये सांगीतलेल्या संविधान प्रक्रियेशिवाय पूर्ण होत नसते. कालानुसार मानवसमाज उन्नत होत आहे आणि त्याच्या उन्नतीबरोबरच संविधानाचा विकास होत नसेल तर त्याच्या उन्नतीची गती खुंटल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक लिखीत संविधानामध्ये संशोधन प्रक्रियेची माहिती दिली नसेल तर ते संविधान अतार्किक बुध्दिहीन सावधान ठरते.''

प्रेसिडेन्ट विल्सन यांनी घटनादुरूस्तीच्या संदर्भात ''संविधान हे निश्चित स्वरूपात जीवनाला प्रेरक असले पाहिजे. म्हणूनच राष्ट्रीय जीवनातील परिवर्तनाबरोबरच संविधानाचा विकास होणे आवश्यक आहे.'' असे मत व्यक्त केले. भारत हे संघात्मक शासन पध्दतीत असल्यामुळे या संघराज्याचे संविधान काही अंशी परिदृढ तर काही अंशी लवचीक आहे. परिदृढ संविधान हे राष्ट्रीय प्रगतीला मारक ठरते. तर लवचीक संविधान हे सत्ताधारी लोकांच्या हातातील खेळणी बनते. आणि त्यामुळे लोकांचे स्वातंत्र्य धोक्यात येते. या दोन्ही परिनामांचा विचार करून भारतीय

घटनाकर्त्यांनी संविधान दुरूस्तीचा सुवर्ण मध्य मार्गाचा अवलंबन केला. आणि राज्यघटनेत ३६८ या कलमाचा समावेश करण्यात आला.

भारतीय संविधानातील घटनादुरूस्तीच्या पध्दती :–

घटनाकर्त्यांनी राज्यघटनेतील कलम ३६८ नुसार राज्यघटनेत घटनादुरूस्तीकरीता तीन पध्दतीचा मार्ग अवलंबला आहे. तो पुढीलप्रमाणे,

१. **संसदेच्या साध्या बहुमताने** – राज्य घटनेत ज्या काही घटनादुरूस्तीच्या तीन पध्दती सांगण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये संसदेच्या साध्या बहुमताने या पहिल्या मार्गाचा उल्लेख करता येईल. संसदेच्या कोणत्याही एका सभाग्रहात घटनादुरूस्ती विषयक विधेयक मांडल्या जातील. संसदेच्या प्रत्येक सभाग्रहात उपस्थित सभासदाच्या बहुमताने या विधेयकास मान्यता मिळाल्यास त्या विधायकाला राष्ट्रपतीची संमती मिळाल्यानंतरच ती घटनादुरूस्ती अस्तीत्वात येते. ही घटनादुरूस्ती राज्यघटनेतील खालील घटकाबाबत करता येते.

१. कलम ३ ते ४ अंतर्गत नविन घटकराज्य निर्माण करणे. एखाद्या घटकराज्याची सिमारेषा बदलवीने.
२. कलम ५ ते ११ अंतर्गत नागरीकत्वा संबंधी नियमामध्ये बदल करणे अथवा कायदे करणे.
३. कलम १००(३) मध्ये संसदेच्या प्रत्येक सभाग्रहाची गणसंख्या ठरविणे.
४. कलम १०५(३) मध्ये संसदेच्या सदस्यांचे विशेष अधिकार ठरविणे.
५. कलम १०६ मध्ये संसद संदस्यांचे वेतन व भत्ते ठरविणे.
६. कलम १६९ नुसार एखाद्या घटकराज्यात विधानपरिषद निर्माण करणे. किंवा अस्तीत्वात असलेली रद्द करणे.
७. कलम ३४३, ३४५ यामध्ये केंद्र आणि घटकराज्याची अधिकृत भाषा ठरविणे.
८. कलम १२४(१) मध्ये सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांची संख्या ठरविणे.

राज्यघटनेच्या या वरिल कलमामध्ये किंवा घटकामध्ये दुरूस्ती करायची असेल तर, ती केवळ संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरूस्ती केल्या जातील.

२. **संसदेच्या विशेष बहुमताने** – हि घटनादुरूस्तीची दुसरी पध्दत होय. या पध्दतीत घटनादुरूस्ती विषयक विधेयक संसदेच्या कोणत्याही सभाग्रहात मांडता येते. सभाग्रहातील उपस्थीत आणि मतदानात भाग घेणाऱ्या २/३ बहुमताने मान्यता प्राप्त झाल्यास तसेच प्रत्येक सभाग्रहाच्या एकुण सभासद संख्येच्या बहुमताने मान्यता मिळाल्यास त्यावर राष्ट्रपतीची स्वाक्षरी घेतल्या जाते. आणि घटनादुरूस्ती अस्तीत्वात येते. उदा. मुलभूत अधिकार आणी राज्यनितीचे मार्गदर्शकतत्वे यामध्ये बदल याच घटनादुरूस्तीने करता येतो.

३. **संसदेच्या विशेष आणि घटकराज्याच्या बहुमताने** – हि घटनादुरूस्तीची तिसरी परंतु ताटर किंवा कठीन पध्दत म्हणुन ओळखली जाते. या पध्दतीत घटनादुरूस्ती विषयक विधेयक संसदेच्या कोणत्याही एका सभाग्रहात प्रथम मांडता येते. संसदेच्या दोन्ही सभाग्रहात सभाग्रहातील उपस्थित आणि मतदानात भाग घेणाऱ्या सभासदांच्या २/३ बहुमताने आणि प्रत्येक सभाग्रहाच्या एकुण सदस्यांच्या बहुमताने तसेच किमान अर्ध्या पेक्षा जास्त घटकराज्याच्या विधिमंडळाने (विधानसभेने) संमती दिली तरच त्यावर राष्ट्रपतीची स्वाक्षरी घेतल्या जाते. आणि घटनादुरूस्ती अमलात येते. हि तिसरी पध्दत संघराज्याचे प्रतीक म्हणुन ओळखल्या जाते.

उदा.

१. केंद्र आणि घटकराज्य यांची कार्यकारी सत्ता
२. केंद्र आणि घटकराज्य कायदेशीर संबंध
३. संसदेतील घटकराज्याचे प्रतिनिधीत्व
४. राष्ट्रपतीची निवडणुक पध्दत बदलविने.
५. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र
६. केंद्र शासीत प्रदेशातील उच्च न्यायालयांची निर्मीती
७. घटनादुरूस्ती पध्दतीचे ३६८ वे कलम

या घटकाच्या बाबतीत घटनादुरूस्ती करायची असेल तर, या तिसऱ्या पध्दतीचा अवलंब केला जातो. हि तिसरी पध्दत अतिशय ताटर किंवा कठीन समजली जाते.

घटनादुरूस्तीच्या पध्दतीचे वैशिष्ठे :–

१. घटनादुरूस्ती विषयक विधेयक फक्त संसदच मांडू शकते. घटक राज्यांना हा अधिकार नाही.
२. घटनादुरूस्ती विषयक विधेयकच्या बाबतीत लोकसभेत आणि राज्यसभेत मतभेद निर्माण झाल्यास दोन्ही सभाग्रहाचे संयुक्त अधिवेशन बोलावले जात नाही.
३. संसदेने घटनादुरूस्ती विषयक विधेयक संमत केल्यानंतर राष्ट्रपतीला त्यावर स्वाक्षरी करावीच लागते.
४. संसदेने घटनादुरूस्ती विषयक विधेयक संमत केल्यानंतर घटकराज्यांच्या विधीमंडळाच्या संमतीसाठी पाठवल्यास, त्यांच्या संमतीसाठीचा निश्चीत कालावधी ठरविला गेलेला नाही.
५. भारतात घटनादुरूस्तीच्या तीन पध्दती सांगण्यात आलेल्या आहेत.
६. संसदेला घटनादुरूस्ती विषयक विधेयक मंजुर करण्यासाठी दुहेरी बहुमताचा अवलंब करावा लागतो.
७. घटनादुरूस्ती साठी लोकमत आजमाविण्याची अजिबात गरज नाही.

हि काही घटनादुरूस्तीच्या पध्दतीच्या वैशिष्ठे आपणाला स्पष्ट करता येते.

सारांश :–

२६ जानेवारी १९५० रोजी अमलात आलेल्या राज्यघटनेत १९५१ रोजी मुलभूत अधिकाराच्या १९ (१)(g) हि पहिली घटनादुरूस्ती भारताच्या राज्यघटनेत करण्यात आली. ती मुलभूत अधिकारासंबंधीत अशी होती. ते आजपर्यंत जवळपास १०६ वेळा राज्यघटनेत दुरूस्त्या करण्यात आल्या. १०६ वी घटनादुरूस्ती हि महिला आरक्षणा संबंधीची असुन भारताच्या आज राष्ट्रपती पदावर विराजमान असलेल्या श्रीमती. द्रोपदी मुर्मू यांनी २८ सप्टेंबर २०२३ रोजी १०६ व्या घटना दुरूस्ती विधेयकावर स्वाक्षरी केल्या. यावरून आपणाला असे म्हणता येते की, भारतीय समाजामध्ये कालसापेक्ष व निरंतर बदल होत असल्यामुळे या बदलत्या समाजाबरोबर राज्यघटनेत देखील बदल अपेक्षीत आहे. हे आपल्या घटनाकर्त्यांनी ओळखून राज्यघटनेतील भाग २० कलम ३६८ मध्ये घटनादुरूस्तीची पध्दत समाविष्ठ केली. आणि राज्यघटनेचे भवितव्य अधिक मजबुत करण्यास हातभार लावला. असे आपणाला म्हणता येईल.

संदर्भग्रंथ :

१. भारतीय राज्यघटना आणि शासन – एम. लक्ष्मीकांत
२. Our Constitution – सुभाष सी. कश्यप
३. Indian Government and Politics – बी. एल. फाडीया
४. Indian Constitutional Law – एम. पी. जैन
५. Introduction to the Constitution of India – डी. डी. बासु
६. भारतीय राज्यघटना : एक अभ्यास – चि. घ. घांगारेकर

महिलांचे सशक्तिकरण आणि राजकीय सहभाग

डॉ. प्रदीप शा. ढोले

इतिहास विभाग प्रमुख

स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरुड,जि. अमरावती

पृथ्वीवरील अर्धी लोकसंख्या म्हणजे स्त्रीवर्ग. या स्त्री वर्गाचे सर्वांगीण जीवनमान सुधारणे व त्यांना सक्षम करणे म्हणजे महिला सशक्तिकरण होय.महिला सशक्तिकरण केवळ एक शब्द नाही तर तो एक विचार आहे.जो महिलांच्या विकासावर,समाजाच्या प्रगतीवर आधारित आहे.सामाजिक समानता, आर्थिक स्वावलंबन, राजकीय सहभाग,शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रात स्त्रीची प्रगती घडवून आणणे हा सशक्तिकरणामागे मुख्य उद्देश आहे.कारण पुरुष आणि स्त्रियांमध्ये समानता निर्माण करणे त्यांना समान संधी मिळवून देणे आणि समाजातील अनिष्ट रूढी व परंपरांवर मात करणे, स्त्रीला आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे, तिला शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे,तिच्या राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागाला प्रोत्साहन देऊन तिला राजकीय स्तरावर सक्षम बनविणे,स्त्रीला शिक्षणासाठी प्रोत्साहित करून तिला आरोग्याच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देणे खर्या अर्थाने स्त्रीचे सशक्तीकरण घडून येण्याचा पाया आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:-

1) महिलांची सामाजिक, राजकीय ऐतिहासिक परिस्थिती पाहणे
2) महिला राजकारणाची पार्श्वभूमी अभ्यासणे
3) महिलांचा विविध कालखंडातील राजकारणातील सहभाग अभ्यासणे
4) संविधानातील महिलांन विषयक कायदे पहाणे

महिलांचे सशक्तीकरण घडून आल्यास समाजात समानता वाढवून समाजाचा सर्वांगीण विकास साधता येईल, तिच्या आर्थिक स्वावलंबनामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, स्त्रीच्या सशक्तीकरणामुळे लोकशाही अधिक मजबूत होण्यास मदत होईल. स्त्रीच्या सशक्तीकरणामुळे ती कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम होते.प्राचीन काळात भारतीय समाजात असलेल्या विषमतेमुळे तिचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्वाची वागणूक स्त्री जातीला मिळत राहिली. हा भेदभाव दूर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि तिचे सुचालन करणे आणि लैंगिक समतेद्वारे समाजाचे संतुलन साधणे यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. स्त्रीवर्गाच्या जीवन प्रसंगामुळे मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारांना मान्यता मिळूनही स्त्रीवरील निर्बंध आणि तिच्या निरक्षर राहण्याचे प्रमाणही मोठे आहे. आजही तिला वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते.सोबतच तिला पुरुषांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या सक्रिय असल्याची संधी मिळत नाही. शिवाय घरगुती हिंसाचाराचा बळी ठरण्याची अधिक शक्यता असते. ग्रामीण भागात स्त्रिया अजूनही स्वतः निर्णय घेण्यास हिम्मत करत नाही. तिथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. म्हणून त्यांची निर्णय क्षमता वाढवून त्यांना घटनेने दिलेले अधिकारांची जाणीव करून दिली पाहिजे. तीचे प्रबोधन करून ती माहिती तिच्यापर्यंत पोचविली पाहिजे.

प्राचीन काळापासून समाजात चालत आलेल्या अनिष्ट चालीरीती रूढी परंपरा यामुळे शतकानु शतके पुरुषवर्गाने स्त्री वर्गावर सातत्याने अत्याचार केले पितृसत्ताक कुटुंबपद्धती अंगीकारलेल्या समाजाने स्त्रियांवर सामाजिक आर्थिक शैक्षणिक गुलामगिरी लादली स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत समाजात बालविवाह प्रथा प्रचलित होती वयाने लहान मुलींना कधी कधी तर वृद्ध व्यक्तीसोबत विवाह करण्यास भाग पाडले जात त्यातूनच बालविधवाची समस्या निर्माण झाली अगदी तरुण वया स्त्रियांना सती जावे लागत अनेक स्त्रियांना पति निधनानंतर त्यांचे केशो पण करून विद्रूप केले जात विधवा स्त्रियांना त्या कितीही श्रीमंत घरातील असतील तरी झोपडी अलिप्तपणे अपमानास्पद जीवन जगावे लागत पुरुषांनी किती लग्न केले तरी चालतील पण स्त्रियाना पुनर्विवाह करण्यास बंदी होती वर्षानुवर्ष समाजाने स्त्रियांवर जाचक बंधने लादल्याने स्त्रियांना मानसिक गुलामगिरीची सवय झाली पण विसाव्या शतकात भारतातील अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणा करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केल्याने स्त्री वर्गात मोठ्या प्रमाणात जागृती झाली अनेक स्त्री आणि उच्चशिक्षण घेऊन अनेक क्षेत्रांतील उच्च पदे काबीज केली इतकेच नव्हे तर स्त्री वर्गात राजकीय जागृती होऊन त्यांनी राजकारणात भाग घेण्यास सुरवात केली.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटिश सरकारने स्त्रियांसाठी केलेले सुधारणाविषयक कायदे व शिक्षणविषयक धोरणामुळे स्त्री सक्षमीकरणाला मोठी चालना मिळाली. सतीप्रथा, बालविवाह, विधवाविवाह, केशवपन इत्यादि अनिष्ट रूढी कायद्याने बंद केल्या. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तर स्त्री सबलीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. राजा राममोहन राय पासून राजश्री शाहू, महात्मा फुले, अण्णासाहेब कर्वे, पंडिता रमाबाई आदी समाजसुधारकांनी मनुवादी मानसिकतेला छेद देत महिला विशेष सुधारणा कार्य गतिमान केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी तर हिंदू कोड बिलाद्वारे स्त्रियांना कायदेविषयक हक्क दर्जा आणि प्रतिष्ठा मिळवून दिली. अनेक समाजसुधारकांचे प्रयत्न तथा भारतीय राज्यघट्नेद्वारा प्राप्त अधिकारामुले स्त्रीयांना शिक्षणाच्या संधी प्राप्त झाल्याने स्त्रियांच्या सामाजिक स्थितीबरोबरच राजकीय स्थितीत सुद्धा सुधारणा झाली. प्रसारमाध्यमेही स्त्रियांना सन्मान देण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रसारमाध्यमे मुलगी व मुलगा हा भेदभावाचा दृष्टिकोण कमी करण्याची समानतेची अनुकूल वातावरण निर्मिती करत आहेत.

भारतातील महिलांनी स्त्री शिक्षण, बालविवाह, जरठ विवाह, सतीप्रथा घटस्फोट असे अनेक प्रश्न हाती घेत भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला.

तसेच समाजसुधारकांनी महिलांचा राजकारणात समावेश केला.1824 मध्ये राणी चेनम्माने कित्तूर वाचविण्यासाठी इंग्रजांशी प्राणपणाने झुंज दिली. इ .स.1839 मध्ये पंजाब प्रांत वाचविण्यासाठी राणी जिनदाने इंग्रज विरुद्ध निकराचा लढा दिला. स्वातंत्र्य संग्रामातील सर्वात शुर् व्यक्ती म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी झाशी नही दुंगी असे इंग्रजांना ठणकावून सांगितले. झाशी, काल्पी, ग्वाल्हेर येथे इंग्रजांविरुद्ध लढा देत वीरमरण स्वीकारले. याशिवाय दिल्लीची बेगम झीनत महल, तुळजापूरची राणी ग्वाल्हेरची बायजाबाई शिंदे, कोल्हापूरची ताराबाई, नरगुंदची राजमाता यमुनाबाई आर आपल गीची नागाबाई या स्त्रियानी स्पेस स्वातंत्र लढ्यात सहभाग घेतला राष्ट्रसभेच्या 1889 साली मुंबई येथे भरलेल्या पाचव्या अधिवेशनात दोन

इंग्रजी एक पारसी चार मराठी व तीन बंगाली स्त्रियानी सहभाग घेतला होता. महात्मा गांधीनी इंग्रजांविरुद्ध अनेक आंदोलने करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. 2021 च्या असहकार चळवळीत स्त्री पुरुष मुले मुली शामिल झाली होती. सन 1932 च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत हजारो संख्येने स्त्रिया सामील झाल्या होत्या. सन 1942 च्या अखेरीच्या लढ्यातहि स्त्रीयांनी खूप कष्ट केले.

स्वातंत्र्यानंतर 1950 मध्ये भारतीय घटनेने स्वीकारलेल्या स्वातंत्र्य समता व न्याय या धोरणामुळे तसेच स्त्रीविषयक सुधारणावादी धोरणामुळे त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यास मदत झाली. भारतीय राज्यघटनेने स्त्रीला राजकीय सहभागाची संधी दिली. लिंगभेद न करता घटनेने 14 व्या कलमात स्त्रीपुरुषांना समान हक्क तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रात समान संधी दिली. 15 व्या कलमानुसार धर्म, वंश, जात या शिवाय लिंगभेदावर बंदी घातली. तर 51 व्या कलमानुसार स्त्रीयांच्या प्रतिष्ठेला बाधक ठरणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरा मोडीत काढून त्यांच्या सक्षमीकरणाची वाट खुली करून दिली. या कलमामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्त्रीया सहज पणे पुरुषांच्या बरोबरीने राजकीय क्षेत्रात उभ्या राहिल्या. घटना समितीच्या बैठकीत राज्ययंत्रणेत राष्ट्रीय नियोजनात आपोआप स्त्रियांना सभासद म्हणून प्रवेश मिळाला.

भारतीय संविधानाने स्वीकारलेल्या समतेच्या धोरणाला अधिक वास्तव करण्यासाठी भारत सरकारने 1955 चा हिंदू विवाह कायदा, 1961 चा हुंडा प्रतिबंधक कायदा, 1971चा वैद्यकीय गर्भपात कायदा, 1976 चा समान वेतन कायदा तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा, 1983 चा बलात्कार प्रतिबंधक कायदा,1984 चा लिंग निर्धारण प्रतिबंध कायदा, 1986 चा वेश्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा, 1987 चा स्त्रीविरूद्ध हिंसा व पिळवणूक प्रतिबंधक कायदा, 2005 चा कौटुंबिक हिंसाचार कायदा याशिवाय 1990 ला स्वतंत्र राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करून स्त्रियांच्या शोषणाला प्रतिबंध घातला.

महाराष्ट्र शासनाने 1994 मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात बदल करत 2001 मध्ये दुसरे तर 2014 मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती स्वयंसाहयता बचत गटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला गेला. शासकीय निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत 30 टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात 50 टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात

निष्कर्ष :- महिला सशक्तीकरण हे केवळ स्त्रियांचे अधिकार नव्हे तर ते समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. महिला सशक्तीकरणामुळे समाजात समानता वाढेल, झीआर्थिक विकास साधता येईल आणि लोकशाही अधिक मजबूत होईल म्हणून सरकारने, अंतरी सामाजिक संस्थांनी आणि प्रत्येक व्यक्तीने महिला सशक्तीकरण प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे.

संदर्भग्रंथ :-

1) पाटील डॉ लीला मुलींचे शिक्षण साकेत प्रकाशन औरंगाबाद

2) वडगबाळकर सौ श्रुती श्री मराठीतील स्त्री आत्मचरित्राचा सामाजिक अंगाने अभ्यास श्रीविद्या प्रकाशन शनिवार पेठ पुणे 2006
3) डॉक्टर पवार वैशाली महिलांच्या सत्ता संघर्षाचा आलेख डायमंड पब्लिकेशन पुणे 2012
4) कडू डॉक्टर मोहिनी भारतीय राजकारणातील स्त्रिया विजय प्रकाशन नागपूर
5) डॉक्टर कर्वे स्वाती संपादक स्त्री विकासाच्या पाऊलखुणा प्रतिमा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे 2003
6) भारतीय संविधान भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय नवी दिल्ली 2014

सत्यनारायण गोयंका यांच्या विपश्यना साधनेचा मानवी जीवनावर होणारा परिणाम

श्रीमती मनिषा लावरे

संशोधक विद्यार्थी, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई.

डॉ. भावना पाटोळे

इतिहास विभाग प्रमुख, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई.

गोषवारा

विपश्यना साधना ही भारताची एक पुरातन ध्यान साधना आहे. या साधनेचे मुख्य उदिष्ट मन शुद्ध व निर्मळ करणे असे आहे. आपल्या अंतरंगात साचून राहिलेले अनेक मनोविकार दैनंदिन जीवनातील ताण-तणाव व्याकुळता यातून आपली सुटका होऊ शकते. 'पश्य' म्हणजे 'बघणे', 'वि' म्हणजे विशेष पध्दतीने आपल्यामध्ये बघणे, समतोल दृष्टीने स्वतःकडे बघणे, असे करता करता राग (आसक्ती) व द्वेष[1]अशा विकारातून मुक्त होऊन मन निर्मळ करणे. आपल्या सर्वांना सुखी व शांततामय जीवन जगण्याची इच्छा असते. आंतरिक शांतीतच खरे सुख सामावलेले आहे.शांती मन विकारविहीन केल्यानेच लाभते. क्रोध, लोभ, भय, वासना, ईर्षा, अहंकार, मत्सर इत्यादी विकारांकडून शिकार होत असते व आपण व्याकुळ, बेचैन व दुःखी बनत जातो. या विकारांपासून मन जसजसे मुक्त होत जाते तसतसे ते निर्मळ होत जाते व मग ते मैत्री, सद्भावना, स्नेह, करूणा यांनी भरून येते व मग स्वतःला व इतरांना सुख-शांतीचा अनुभव देते.

सुचक शब्द

विपश्यना, ध्यान, साधना, साधक, आचार्य.

उद्देश

सदर लेखाचा उद्देश विपश्यना साधनेचा मानवी जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे, हा आहे

ऐतिहासिक पार्श्वभूमी

विपश्यना ही प्राचीन भारतीय आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. पण काळाच्या ओघात ती लुप्त झाली.सुमारे २५०० वर्षापूर्वी[2] एका महामानवाचा उदय झाला. गौतम बुद्धांनी आपल्या कठोर परिश्रमाने या विधीचे खोलवर संशोधन करून ती पुनर्जीवित केली व सर्वसामान्य मानवाला सुलभ रीतीने ती उपलब्ध करून दिली. भगवान बुद्धाच्या महानिर्वाणानंतर काही शतके ती भारतात खूप प्रचलित होती. कालांतराने ती भारतातून लुप्त झाली. ब्रम्हदेशात ही विद्या मूळ स्वरुपात टिकून राहिली. ब्रह्मदेशाचे पहिले अकाऊंटंट जनरल तसेच विपश्यनेचे एक महान आचार्य कै. सयाजी उ बा खिन होते. होते. त्यांच्याकडून श्री. सत्यनारायण गोयंका यांनी ही विद्या आत्मसात केली.

श्री. सत्यनारायण गोयंकार्जीचे पूर्वज हे मूळ राजस्थानमधील चुरूचे[3] होते. पण व्यवसायानिमित्त ते ब्रह्मदेशात स्थायिक झाले. गोयंकाजींचा जन्म तेथेच झाला. शिक्षण पण तेथेच झाले. ते सयाजी उ बा खिन यांच्या संपर्कात आले. त्यांच्याकडून ही विद्या शिकले. १४ वर्षे ते सयाजींच्या संपर्कात राहिले व या विद्येचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या जीवनात खूप मोठे परिवर्तन घडून आले.

सयाजींनी त्यांना विपश्यनेच्या आचार्य पदावर प्रस्थापित केले.गोयंकाजीं १९६९ मध्ये भारतात[४] आले व भारतातून त्यांनी विपश्यनेच्या प्रशिक्षणाच्या कार्यास प्रारंभ केला.

सध्याचे मानवी जीवन

आज आपले जीवन इतके वेगवान झाले आहे की, श्वास घ्यावयास फुरसत नाही. सत्ता, संपत्ती, यश, वैभव, पद, प्रतिष्ठा मिळविण्यामागे आमची घोडदौड प्रचंड वेगाने होत आहे. विज्ञान तंत्र-युगातील प्रगतीमुळे मानवी समाज जीवनात क्रांतिकारक परिवर्तन घडून येत आहे; पण ही प्रगती वरवरची आहे. माणूस खूप ताणतणावाचे जीवन जगत आहे.जगभर अशांती, अस्वस्थता, विफलता पसरलेली दिसते. सामाजिक, नितीविषयक, जातीजमाती द्वेषातून उद्भवलेल्या समस्या, दारिद्र्य, अज्ञान, नशिल्या पदार्थांचे सेवन, अतिरेकी, दहशतवादी, अधोगतीकडे नेणारी मूल्ये यामुळे समाज अगदी त्रासून गेला आहे. मनोविकारांचे प्रमाण कितीतरी पटीने वाढले आहे. समृद्ध व संपन्न देशातही अनेक समस्या मोठ्या प्रमाणात आढळून येतात. समाजाचे मानसिक संतुलन ढळलेले दिसते.

विपश्यना साधना अभ्यास पद्धती

विपश्यना साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी गोयंकाजीं यांनी नेमलेल्या सहाय्यक आचार्यांच्या मार्गदर्शनाखाली दहा दिवसांच्या निवासी साधना शिबिरात भाग घेणे आवश्यक आहे. शिबिराच्या कालावधीत साधकाला निवासस्थानीच राहावयाचे असते व बाह्य जगाशी संपर्क तोडावयाचा असतो. त्या काळात लेखन-वाचन न करण्याचे बंधन असते. तसेच स्वतःची धार्मिक कर्मे, पूजा-अर्चा, उपास-तापास न करण्याचे पण बंधन असते. दिवसाच्या दिनचर्येत साधनेच्या समयसारीणीमध्ये नियमितपणे भाग घ्यावा लागतो. साधारण एकंदरीत १० तास बसून दररोज साधना करावी लागते. त्याकरीता वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. तसेच विश्रांती, भोजन इत्यादीच्या वेळा ठरलेल्या असतात. पहिले ९ दिवस मौनव्रताचे पालन करावे लागते. दररोज सायंकाळी गोयंकाजींच्या प्रवचनांची ध्वनिफीत लावली जाते. त्यात ते साधनेच्या तत्त्वज्ञानाचे व शास्त्रशुध्द विचारांचे विश्लेषण करतात. आचार्यांशी साधनेसंबंधी प्रश्न किंवा स्पष्टीकरण करून घेण्यासाठी बोलता येते. त्यासाठी दिवसातून काही ठराविक वेळ नेमून दिला जातो. अन्यथा पूर्ण मौन पाळावयाचे असते. कारण त्यामुळे अंतर्मुख होऊन आपली साधना जास्त परिणामकारक होते.या प्रशिक्षणाची तीन[५] अंगे आहेत: १) शील, २) समाधि ३) प्रज्ञा.

ही साधनेची तीनही अंगे एकमेकांस पूरक आहेत. शील सदाचाराचे पालन तर त्याचा पाया आहे. शील पालनाची गरज ही फक्त समाजाच्या हितासाठीच नाही तर आपल्या स्वतःच्या हितासाठी आहे. विपश्यना साधनेच्या शिबिरात सर्व प्रकारच्या शिलपालनाचा अभ्यास करण्याची उत्तम संधी मिळते. दुसरी पायरी मनाला ताब्यात ठेवण्याची किंवा मन वश करण्याची एकाग्र करण्याची सम्यक समाधी. पहिले साडेतीन दिवस चित्ताला एकाग्र करण्यासाठी नासिकेच्याद्वारे आवागमन करणाऱ्या सहज स्वाभाविक श्वासाचा अनुभव घेत राहणे.

प्रत्येकजण सतत श्वासोच्छवास करीत असतो. म्हणून हे सार्वजनिक ध्यानाचे साधन होऊ शकते. याला "आनापानसति" म्हणतात. म्हणजे श्वासाची सजगता, जागरूकता[६]. येथे श्वासाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण प्राणायामचा अभ्यास नाही. श्वासावर सगळे लक्ष केंद्रीत करून तो जसा

आहे तो बदलण्याचा बिलकूल प्रयत्न न करणे व वर्तमान क्षणाचा विकास करणे, जागरूकता शक्य तेवढी जास्त वेळ टिकवून ठेवणे म्हणजेच सम्यक समाधी (एकाग्रता).पण ही एकाग्रता सम्यक निर्मळ असावयास हवी. समाधी जर शील सदाचाराच्या, निर्मळ चित्ताच्या भक्कम पायावर उभी असेल तरच उपयुक्त व फलदायी होते.

साधनेचे तिसरे अंग प्रज्ञा. मनाचे शुद्धीकरण मनातील अपवित्रता दूर करणारी प्रज्ञा जागृत केल्याशिवाय पहिल्या दोन पायऱ्या अपुऱ्या होतील. संवेदनांच्या रूपाने जे विकारांचे प्रकटीकरण होते त्या स्थूल सत्याचे प्रथम साक्षीभावाने, तटस्थपणे निरीक्षण करणे, त्याचा अनित्य स्वभाव ओळखणे व त्याचे आलंबन घेऊन समताभाव पुष्ट करत जाणे व पुढे त्याचा छेद अन सूक्ष्म सत्य, सूक्ष्मतम सत्यापर्यंत पोहोचणे व शेवटी शरीर व मन या पलीकडील जे अंतिम सत्य तेथपर्यंत अनुभूतीद्वारे पोहोचणे, हा खरा अभ्यास आहे. या तिन्ही पायऱ्या एकमेकांना पोषक आहेत. स्वनिरीक्षणाने, एकाग्र चित्ताने करत जाणे.आपली प्रज्ञा वाढविणे हीच विपश्यना साधना आहे.चित्त[७] निर्मळ आणि निर्विकार होत जाईल व मग निर्मळ चित्त प्रेम, करूणा, सद्भावना, समता याने साहजिकच भरून जाईल साधकाला, स्वतःला तर लाभ होतोच पण त्याचसोबत समाजालाही सुख शांती मिळते. साधनेत पुढे गेलेल्या साधकांच्या प्रगतीसाठी वीस, तीस आणि पंचेचाळीस दिवसांची दीर्घ मुदतीची शिबिरेही निरनिराळ्या केंद्रावर भरविली जातात.

विपश्यना व मानवी जीवनावर होणारा परिणाम

विपश्यना साधनेचे ध्येय राग, द्वेष, क्रोध, मत्सर, लोभ, आसक्ती या सर्वांपासून मन निर्मळ करणे, मनाच्या खोल गाभाऱ्यात अंतर्मनात पोहोचून मन शुद्ध करण्याची ही साधना आहे. म्हणजे मनातील विचारांचे मुळापासून निर्मूलन करणे. केवळ वरचे चेतन मन शुद्ध करून शांती मिळणार नाही तर आपले अंतर्मन आपल्या संपूर्ण मनाचा मोठा भाग आहे. या मनात आपल्या विकारांच्या गाठी बांधलेल्या असतात व आपण नव्याने रोज नव्या गाठी बांधत असतो. हे मन आपल्या संवेदनांच्या सतत संपर्कात असते व अंध प्रतिक्रिया करत असते. चेतन मनाला त्याची जाणीवही नसते.कारण ते संपूर्ण मनाचा फार लहान भाग असतो व अंतर्मन त्याच्यापेक्षा खूप बलवान असते.या साधनेमुळे आपले चेतन मन जास्त जागरूक होऊ लागेल व हळूहळू या दोन मनातील भिंत विरघळू लागेल व संपूर्ण मन हळूहळू जागरूक होऊ लागेल, जास्त प्रभावशाली बनू लागेल. जेव्हा आपण अंध प्रतिक्रिया करण्याचे हळूहळू बंद करू व जसजसे अचेतन अंतर्मन मनाच्या भांडारात साचलेल्या जुन्याविकारांचे मुळापासून उच्चाटन होऊन निर्मूलन होऊ लागते तसतसे आपले दैनंदिन जीवनात परिवर्तन झालेले दिसून येते, हा अनेकांचा अनुभव आहे. स्वच्छ मनाची विचार क्षमता वाढते. आपले निर्णय योग्य होऊ लागतात काम करण्याची शक्ती वाढते, जी विकारांशी युद्ध करण्यात ताणतणावात व्यर्थ होत होती ती आता आपण योग्य कामाला लावतो.

विपश्यना आचार्य सयाजी उ.बा. खीन यांचे बोलके उदाहरण आहे. ते स्वतंत्र ब्रह्मदेशाचे पहिले अकाउंटंट जनरल[८] होते. आपल्या सगळ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना त्यांनी ही विद्या शिकविली. नियमित साधना करावयास लावली. परिणामी त्यांच्या विभागातील भ्रष्टाचाराचे गैरव्यवहाराचे समूळ उच्चाटन झाले. त्यांच्या पंतप्रधानांनी त्यांना आणखी तीन विभागांची जबाबदारी दिली. ती खाती पण

त्यांनी अत्यंत कार्यक्षम व कर्तव्यनिष्ठ पद्धतीने सांभाळली. निवृत्तीच्या वयानंतर सुद्धा त्यांना निवृत्त होऊ दिले नाही. त्यानंतर आणखी तेरा वर्षे ते काम करत होते. शेवटी वयाच्या ७३ व्या वर्षी ते स्वतः निवृत्त झाले.

भारतात लहान मुलांसाठी आनापान ची लहान-लहान शिबिरे, एक ते तीन दिवसांची शिबिरे नियमितपणे भरविली जातात. यात त्यांना केवळ साधनेची पहिली पायरी आनापान व शील सदाचाराचे प्रशिक्षण दिले जाते. आठ ते अकरा व बारा ते पंधरा वर्षे वयाच्या मुलांचे दोन ग्रुप केले जातात. आता ही शिबिरे सगळीकडे खूप लोकप्रिय होऊ लागली आहेत. पालक व शिक्षक वर्गाकडून याचे फार चांगले रिपोर्ट येतात. मुलांच्या अभ्यासात,व्यवहारात, एकाग्रतेत, आत्मविश्वास वाढण्यात लक्षणीय फरक दिसून येतो. अनेक शाळांमधून अशी शिबिर घेतली जात आहेत. तसेच पुष्कळ औद्योगिक क्षेत्रातील मॅनेजर्स, व्यापारी वर्गातील श्रेष्ठ शासनाचे अधिकारी इत्यादी या विद्येचा लाभ घेऊन जातात व आपल्या कर्मचाऱ्यांना कामगारांना या प्रशिक्षणास पाठवितात. त्या सगळ्यांना याचा लाभ होत आहे. भारतातील काही तुरुंगात राजस्थान, गुजरात, दिल्ली, नाशिक, कोल्हापूर, पुणे येथील तुरुंगात या साधनेचे प्रयोग करण्यात आले व काही तुरुंगात, दिल्लीच्या तिहार[९] जेलमध्ये व नाशिक जेलमध्ये तर विपश्यना ध्यान केंद्राची स्थापना झाली आहे. तेथे दर महिन्याला नियमितपणे शिबिरे आयोजिली जातात. अनेक कैदी उस्फूर्तपणे यात भाग घेतात असे आढळून येते.

निष्कर्ष

विपश्यना हे कर्मकांड नाही.ती शुद्ध तपश्चर्या आहे .साधनेतील शील जोपासण्यामुळे मानवाच्या सर्वांगीण विकासाला ही साधना निश्चित उपयुक्त आहे. सतत विवेक बुद्धीचा वापर करावयास लावणारी, जीवन मुक्तीचा मार्ग सांगणारी ,ध्यान धारणेचा नेमका अर्थ अनुभवास लावणारी, वर्तमानात जगण्याचा अत्यंत उपयुक्त मार्ग सांगणारी, ही साधना आहे. दैनंदिन जीवनातील आसक्ती आणि व्याकुळता कमी झाल्याने दुःख भाव कमी होईल, हा विश्वास वाटतो. श्वास व संवेदना मार्फत अंतर्मन जाणण्याचे मर्म कळते. एकाग्रता वाढण्यासाठी विद्यार्थ्यांनाही या साधनेचा निश्चित उपयोग होतो. यामुळे समाजात अधिक सामंजस्य व सहकार्य भावना वाढीस लागेल अंतकरणातील क्रोधाच्या गाठी सुटून करुणेचे, प्रेमाचे संबंध दृढ होतील, शत्रू निर्माण होणार नाहीत, प्रेमाचे, मैत्रीचे तरंग जीवनात शांती समाधान देतील, असा विश्वास वाटतो.

संदर्भ

1. आचार्य गोयंका सत्यनारायण, प्रवचन- सारांश- मराठी, विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी,जि. नाशिक (महाराष्ट्र), १९९८, पृ.४५
2. विपश्यना विशोधन विन्यास,.विपश्यना पत्रिका संग्रह (जुलाई १९७४ से जून १९७७ तक) भाग- २, विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक (महाराष्ट्र), २०१२,पृ.९७
3. गोयंका बाळकृष्ण,कल्याण मित्र सत्यनारायण गोयंका व्यक्तित्व और कृतित्व,विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक (महाराष्ट्र), २००२ ,पृ.११
4. हार्ट विलियम, जगण्याची कला विपश्यना साधना, श्री. गोयंकाजींच्या शिकवणुकीनुसार द आर्ट ऑफ लिव्हिंग पुस्तकाचं मराठी भाषांतर, विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक (महाराष्ट्र), १९९२ ,पृ.२

5. आचार्य गोयंका सत्यनारायण, महामानव बुद्धाची महान विद्या विपश्यनाः उगम आणि विकास (मराठी), विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक (महाराष्ट्र), २०१५ ,पृ.vii
6. हार्ट विलियम, जगण्याची कला विपश्यना साधना, श्री. गोयंकाजींच्या शिकवणुकीनुसार द आर्ट ऑफ लिव्हिंग पुस्तकाचं मराठी भाषांतर, विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक (महाराष्ट्र), १९९२ ,पृ.८३
7. आचार्य गोयंका सत्यनारायण, प्रवचन- सारांश- मराठी, विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक (महाराष्ट्र), १९९८, पृ.४३
8. आचार्य गोयंका सत्यनारायण, महामानव बुद्धाची महान विद्या विपश्यनाः उगम आणि विकास(मराठी),विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक (महाराष्ट्र), २०१५ ,पृ.२२९
9. ग्लोबल विश्यना फाउंडेशन, विपश्यना पगोडा स्मारिका, ग्लोबल विश्यना फाउंडेशन, मुंबई, २०००,पृ.२९

कुपोषण एक समस्या: सद्यस्थिती, कारणे आणि उपाययोजना

प्रा. प्रवीण सोमा पारधी

सहा. प्रा. अर्थशास्त्र विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव. ता. आंबेगाव जि. पुणे ४१२४०८

घोषवारा

भारत हा गरीब लोकसंख्येचा श्रीमंत देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये एकूण १४२.८६ कोटी लोकसंख्या अस्तित्वात आहे. भारत हा देश विकसनशील देश म्हणून गणला जातो. कुपोषण ही बालविकसच्या मार्गातील एक महत्वाची समस्या आहे. त्यामुळे ही देशपातळीवरील समस्या नसून जागतिक पातळीवरील समस्या आहे. जगाच्या एक तृतीयांश कुपोषित बालके ही केवळ एकट्या भारतात राहतात. या देशामध्ये कुपोषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येत आहे. भारतातील कुपोषणाचे एक प्रमुख कारण म्हणजे उत्पन्न विषमता. बहुसंख्य लोकसंख्येची सामाजिक आणि आर्थिक स्थिती कमी असल्यामुळे, त्यांच्या आहारात गुणवत्ता आणि पोषकद्रव्याचे प्रमाण दोन्ही कमी असते किंवा नसते. आहारातील जीवनसत्त्वे आणि खनिजांच्या कमतरतेमुळे कुपोषण होते. ज्या महिलांना कुपोषणाचा त्रास होतो किंवा कुपोषित आहेत, त्यांना निरोगी बाळांची शक्यता फारच कमी असते. त्यामुळे नव्याने येणारे बाळ हे देखील कुपोषितच असते. आयोडिन, अ जीवनसत्त्व व लोह हे मानवाच्या आरोग्यासाठीचे महत्त्वाचे घटक आहेत. पौष्टिकतेच्या कमतरतेमुळे व्यक्ती आणि समाज या दोघांनाही दीर्घकालीन नुकसान होते. या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. प्रस्तुत या शोधनिबंधांमध्ये कुपोषणाची सद्यस्थिती, कुपोषणाची कारणे व परिणाम, आणि उपाययोजना या मुद्द्यांवर विशेषतः भर देवून याचा अभ्यास केला जाणार आहे.

उद्दिष्टे

- कुपोषण या समस्येचा सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
- कुपोषणाच्या कारणांचा अभ्यास करणे.
- कुपोषणाची समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधन पद्धती

या शोधनिबंधाचे लेखन करण्यासाठी वर्णनात्मक आणि संख्यात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच माहिती संकलनासाठी द्वितीय स्त्रोताचा वापर करून माहितीचे संकलन केलेले आहे.

प्रस्तावना

बालविकास अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय समजला जातो. कोणत्याही देशामध्ये लहान मुलांच्या विकासाला महत्व दिले गेले पाहिजे. कारण राष्ट्राचे भवितव्य हे त्याबालकांवर आधारित असते. म्हणून त्यांना राष्ट्राचे भावी आधारस्तंभ असे लहान मुलांना संबोधले जाते. कुपोषण म्हणजे पुरेसा आणि योग्य आहार मिळत नसल्याने होणारी आरोग्य समस्या, जी विशेषत: बालकांसाठी गंभीर ठरते. या समस्येमुळे शारीरिक आणि मानसिक विकासावर नकारात्मक परिणाम होतो, रोगप्रतिकारशक्ती कमी होते आणि अनेक विविध आजार होण्याची शक्यता वाढते. भारतातील कुपोषणाचे एक प्रमुख कारण म्हणजे उत्पन्न विषमता. बहुसंख्य लोकसंख्येची सामाजिक आणि आर्थिक स्थिती कमी असल्यामुळे, त्यांच्या आहारात गुणवत्ता आणि पोषकद्रव्याचे प्रमाण दोन्ही नसतात. ज्या महिलांना कुपोषणाचा त्रास होतो किंवा कुपोषित आहेत, त्यांना निरोगी बाळांची शक्यता कमी असते. त्यामुळे नव्याने येणारे बाळ हे देखील कुपोषितच असते. पौष्टिकतेच्या कमतरतेमुळे व्यक्ती आणि समाज या दोघांनाही दीर्घकालीन नुकसान होते. त्यांच्या पोषक आहारात पोषक

नसलेल्या व्यक्तींच्या तुलनेत, न्यूमोनिया आणि क्षयरोग सारख्या संसर्गजन्य रोग होण्याची शक्यता असते, ज्यामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त होते. भारतामध्ये ५०% पेक्षा जास्त बालके कुपोषित आहेत. आहारातील जीवनसत्त्वे आणि खनिजांच्या कमतरतेमुळे कुपोषण होते. जीवनसत्त्वे व खनिजे बालकाच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक असलेल्या enzymes, hormones ची निर्मिती करण्यासाठी मदत करतात. आयोडिन, अ जीवनसत्त्व व लोह हे मानवाच्या आरोग्यासाठीचे महत्त्वाचे घटक आहेत. या सूक्ष्म घटकांच्या कमतरतेमुळे विकसनशील देशातील लहान मुले व गरोदर माता यांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे.

माहिती विश्लेषण

भारतामध्ये कुपोषण ही समस्या चिंताजनक बनत चाललेली आहे. २०२३ च्या अहवालानुसार भारतामध्ये ७४% जनतेला योग्य पोषक युक्त आहार मिळत नाही. २०२४ जागतिक भुकबळीच्या निर्देशांकानुसार भारताचा भुकबळी निर्देशांकाचा स्कोर २७.३% आहे. म्हणजेच भारत १२७ देशापैकी १०५ व्या क्रमांकावर आहे. पाकिस्तान, बांग्लादेश, अफगाणिस्तान यासारखे देश आपल्यापुढे आहेत. हे एक कुपोषणाचे महत्वाचे कारण आहे.



Source : NFHS5

उंचीच्या मानाने वजन कमी असणे

अत्यंत अल्पकालावधीत बालकाचे वजन वेगाने कमी होत जाते. पोषकयुक्त पुरेसा आहार मिळत नसल्यास, संसर्गजन्य आजार झाला असल्यास, मातृत्व समस्या, खूप प्रमाणात उलट्या जुलाब झालेल्या मुलांमध्ये दिसून येतात. योग्य वेळेत उपचार न केल्यास बालमृत्यू होऊ शकतो. योग्य वेळी योग्य उपचार केल्यास बाळाला यातून वाचवता येते. उंचीच्या मानाने वजन कमी असणारी बालके १९.३० % आहेत.

वयाच्या मानाने कमी उंची असणे

हा कुपोषणाचा प्रकार मुख्यत्वे सातत्याने पोषकयुक्त अपुरा व सकस आहार न मिळाल्याने, गरीब घरातील बालकांमध्ये, आईला योग्य व पुरेसा आहार न मिळाल्यामुळे, आई सातत्याने आजारी असल्यामुळे, बालके सातत्याने काही न काही कारणाने आजारी पडत असल्यामुळे अशा बालकांची शारीरिक व मानसिक वाढ पूर्ण होत नाही. वयाच्या मानाने कमी उंची असणाऱ्या बालकांचे प्रमाण ३५.५% आहे.

वयाच्या मानाने वजन कमी असणे

हा कुपोषणाचा प्रकार मुख्यत्वे सातत्याने अपुरा व सकस आहार न मिळाल्याने, गरीब घरातील बालकांमध्ये, आईला योग्य व पुरेसा आहार न मिळाल्यामुळे, आई सातत्याने आजारी असल्यामुळे, बालके सातत्याने काही न काही कारणाने आजारी पडत असल्यामुळे याचा एकंदरीत परिणाम बालकावर होतो. एकूणच

वजनात घट होते किंवा जेनेटिक समस्या असल्यामुळे देखील हा प्रकार घडत असतो. वयाच्या मानाने वजन कमी असणाऱ्या बालकांचे प्रमाण ३२.१% आहे.

जास्तीचे वजन आणि लट्ठपणा

एखाद्या व्यक्तीचे वजन त्याच्या उंचीच्या प्रमाणापेक्षा खूप जास्त असणे म्हणजे जादा वजन आणि लट्ठपणा. जास्तीच्या वजनामुळे आरोग्यास धोका निर्माण होतो.

कुपोषणाची कारणे :-

लोकसंख्या वाढ: वाढती लोकसंख्या ही फार मोठी गंभीर समस्या मानली जाते भारतातील लोकसंख्या वाढ हा कुपोषणासाठी महत्वाचा घटक मानला जातो. जन्माच्या मानाने अन्न उत्पादन त्याप्रमाणात वाढत नाही गरीब कुटूंबात जास्त बालकांचा जन्म होत असल्यामुळे त्याचे दरडोई उत्पन्न कमी होते. त्यामुळे मुले आणि माता कुपोषणाचे बळी होतात.

भेसळयुक्त अन्न: अन्न पदार्थामध्ये भेसळीचे प्रमाण बरेच जास्त दिसते उपयोगात आणू नयेत असे रंग, तेल, यांच्या सततच्या उपयोगाने पदार्थापासून मिळणाऱ्या पोषक मुल्याचे प्रमाण कमी होऊन शरीराला पदार्थापासून फायदा न होता हानी होताना दिसते विक्रेत्याच्या लोभापायी माणसे भरडली जात आहेत.

अस्वच्छ वातावरण आणि घराबाहेरील जेवण: आजच्या परिस्थितीत घरातील स्वच्छ वातावरणापेक्षा बाहेरच्या अस्वच्छ वातावरणात खाण्याची पद्धती रूढ झालेली दिसून येते सतत बाहेरचे पदार्थ सेवन केल्याने पचनासंबंधीच्या तक्रारी निर्माण होतात आणि त्याचा परिणाम शरीर स्वास्थ्यावर होऊन कुपोषण ही समस्या निर्माण होते. यामुळे आरोग्याविषयीच्या निरनिराळ्या तक्रारी उद्भवतात ज्यामुळे व्यक्तीची रोग प्रतिकार शक्ती कमी होते अस्वच्छ वातावरण आणि घराबाहेरील जेवण असल्यास कोणत्याही रोगाचा संसर्ग लवकर होतो आणि कुपोषणाची समस्या निर्माण होते.

अंधश्रद्धा आणि आहार वेळेवर न घेणे: अंधश्रद्धेमुळे बहुतेक व्यक्तीचा आहार सदोष आढळतो विशिष्ट ऋतूत विशिष्ट पदार्थ खायचे नाही उदा. श्रावणमास उपवासावर विशेष भर देणे त्यामुळे पोषणमुल्ये आहारात कमी पडतात. आहार योग्य वेळी न घेतल्यास त्याचा परिणाम हा बालकांच्या आणि मातेच्या आरोग्यावर होतो.

व्यसनाधिनता: व्यसन हा एक मानसिक आजार असून ते प्राणघातक व समाजविरोधी संकट आहे. व्यसनांमुळे शारिरीक, मानसिक, आर्थिक, सामाजिक. बौद्धिक आणि नैतिक अशा सर्वच बाजुंनी व्यक्तींची व पर्यायाने समाजाची देशाची अपरिमित हानी होते. तंबाखू, गुटखा किंवा जलप्रदूषण आणि मद्यपदार्थ सेवनाने तरूण वयात होणाऱ्या कॅन्सरचे प्रमाण भारतात प्रचंड प्रमाणात वाढत आहे.

दारिद्र्य: भारतात गरिबी ही एक मोठी गंभीर सामाजिक समस्या आहे पैसा नसल्यास लोकांना खायलासुद्धा मिळत नाही. त्यामुळे अतिनिकृष्ठ जीवन जगावे लागते. दारिद्रय म्हणजे किमान राहणीमान मिळण्याची लोकांची असमर्थता होय किंवा मूलभूत गरज पूर्ण न होणे होय. राहणीमान, पोषणघटक घेण्याची क्षमता, शिशू अवस्थेतील बालकांचा मृत्यू दर, बालकांचे शाळेत जाण्याचे प्रमाण, त्यांचे आयुर्मान इत्यादी गोष्टी दारिद्रयात विचारात घेतल्या जातात.

सवयी: अन्न सेवनाच्या चूकीच्या सवयीमुळे कुपोषणाला मदत होते. जेवणात विविध खाद्य पदार्थांचा अभाव असतो. त्यामुळे पोषणतत्वाची कमतरता निर्माण होते. तळलेले पदार्थ मसाले युक्तपदार्थ रूचीने खाणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

कुपोषणाची समस्या सोडविण्याचे उपाय :-

सेंद्रिय शेती: सेंद्रिय शेती ही सद्य काळाची गरज बनली आहे. काही राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात सेंद्रिय शेती केली जाते. या शेतीच्या माध्यमातून आरोग्यावर कोणताही परिणाम होत नाही. परिणामी आरोग्य सुदृढ बनते.

लोकसंख्येवर नियंत्रण: छोटे कुटूंब सुखी कुटूंब ही संकल्पना मोठ्या प्रमाणावर राबविली जाणे आवश्यक आहे. विशेष करून ग्रामीण भागात व अशिक्षित समाजात याचा प्रचार मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे लहान कुटूंबातील लोकांना शिक्षण, नोकरी, सोई सुविधा यासारख्या ठिकाणी प्राध्यान्य दिल्यास एकूणच लोकांचा कल लहान कुटूंब ठेवण्याकडे होईल.

शिक्षण: अनेक समस्यांच्या मुळाशी अज्ञान हा घटक कारणीभूत ठरत असल्याचे दिसून येते. अनेक क्षेत्रांमधील अज्ञानामुळे लोकांच्या बौद्धिक क्षमतेच्या योग्य उपयोग होऊ शकत नाही. शिक्षणाचा अभाव यामुळे समतोल आहार घेतला जात नाही. वयानुसार अन्न घटकांची असणारी आवश्यकता न समजल्यामुळे सर्व वयांमध्ये अभावाचे रोग आढळून येतात शिक्षणामुळे कुपोषणावर नियंत्रण ठेवता येईल

तंत्रज्ञान व अन्नपदार्थ साठा: शेती उत्पादनात नविन तंत्राचान किंवा अधुनिक उपकरणाचा वापर करण्याचे प्रमाण वाढवल्यास उत्पादन वाढते. नाशवंत पदार्थाचा साठा संरक्षणासाठी विविध तंत्रज्ञानाचा वापर करून टिकवण्याचा कालावधी वाढवून खाद्यपदार्थाची उपलब्धता वाढवता येते. खाद्यपदार्थाचे समृध्दीकरण, दृढीकरण करून पोषणात्मक दर्जा वाढवल्यास कुपोषणाला आळा घातला जातो.

डाळी कडधान्ये: डाळी कडधान्ये हा शाकाहारी लोकांना प्रथिनांचा पुरवठा करण्यासाठी डाळीचे उत्पादन सोयाबीनचे उत्पादन वाढवायला पाहिजे. शेतकऱ्यांना भुईमुग हे पीक घेण्यास प्रोत्साहीत केले पाहिजे. त्यामुळे शेंगदाण्याच्या उत्पादनात वाढ होईल. शेतीत उत्पादन वाढेल यासाठी शेतकऱ्यांना शिक्षण देणे महत्वाचे आहे

दुध: शाकाहारी व मांसाहारी लोकांच्या आहारात वापरला जाणारा हा प्राणिजन्य पदार्थ आहे. दुधात पुर्ण प्रथिने व कॅल्शियम तसेच इतरही सर्व पोषक घटके चांगल्या प्रमाणात मिळत असतात म्हणून दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी दुभत्या जनावरांची पैदास करणे. भेसळ युक्त दुधाचा वापर न करणे. त्यासाठी गाय, म्हैस आणि शेळी यांच्या पालनास प्रोत्साहित करणे.

कोंबड्यांची अंडी व मासे: कोंबड्यांच्या अंड्यांचा व माश्यांचा आहारात वापर केल्यास उच्च जैविक मुल्य असलेली प्रथिने मिळून कुपोषण कमी करण्यास फायदेशीर ठरेल. त्यासाठी कुक्कुटपालनाच्या व मत्स्यपालन व्यवसायात सुधारणा करुन त्याला प्रोत्साहन दिल्यास त्याचा आहारातील वापर वाढून पोषणविषयक समस्या कमी होईल.

भाज्या व फळे: आहारात सर्व प्रकारच्या भाज्या व फळांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. आहारात फळे व भाज्या घ्याव्यात. शरीर संरक्षक घटकांचा पुरवठा करणारा अन्न गट आहे त्यासाठी परस बाग करणे फळझाडे लावणे, भाजीपाल्याचे उत्पादन घेणे महत्वाचे आहे.

सारांश

कुपोषण ही बालविकसच्या मार्गातील एक महत्वाची समस्या आहे. त्यामुळे ही देशपातळीवरील समस्या नसून जागतिक जागतीकपातळीवरील समस्या आहे. भारतामध्ये आर्थिक विषमता हे कुपोषणाचे महत्वाचे कारण आहे. १०% लोकसंख्येकडे ९०% संपत्ती आहे आणि ९०% लोकसंख्येकडे केवळ १०% संपत्ती आहे. त्यामुळे आर्थिक विषमतेचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे. वय आणि श्रमाच्या मानाने योग्य आहार मिळणे हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे, पण हा हक्क प्रत्यक्षात उतरत नाही. भारतासारख्या देशांत निदान निम्मा समाज दारिद्रयरेषेखाली राहतो. कुपोषण हे या समाजाचे अंग बनलेले आहे. उरलेल्या समाजातील काही टक्के लोकांना अतिपोषणामुळे येणारे आजार जडतात. कुपोषण म्हणजे पोषणाची कमतरता किंवा अतिरेक. आपल्या देशाच्या संदर्भात कुपोषण म्हणजे बहुशः अन्नाची कमतरता हाच अर्थ घेतला जातो. वरील प्रमाणे कुपोषणाची भारतातील सद्यस्थिती कारणे आणि उपाययोजना आहेत

संदर्भ:

1) National Family Health Survey 2023 - 2024

2) डॉ. मनमोहन सिंग यांचा भुकबळीचा अहवाल दि. १० जाने २०१२
3) लोकराज्य मासिक, महाराष्ट्र शासन.
4) जागतिक आरोग्य संघटना, कुपोषण निर्मूलन मार्गदर्शक तत्वे अहवाल
5) The Hindu News Paper Article
6) Raj Krishna & Sanchit Kumar, "Unemployment & Poverty paradox in India " EPW, Nov 1983
7) CMIE Report 2019, 2020, 2021 & 2022.

गुणवत्ता विकासासाठी विद्यार्थी-शिक्षक-पालक समन्वय

श्री. महेश रामकिशन बोधणे
जि.प.कें.प्रा.शा.नहाद ता.वसमत जि.हिंगोली

विद्यार्थी गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यात समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे. संवाद, सहकार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग आणि योग्य पद्धतींचा अवलंब केल्यास विद्यार्थ्यांची बौद्धिक आणि व्यावहारिक गुणवत्ता नक्कीच सुधारेल. शिक्षण हा केवळ ज्ञानार्जनाचा प्रवास नसून तो विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांसाठी एक सक्षम आणि प्रेरणादायी शिक्षणव्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

शालेय गुणवत्तेचा विकास हा अनेक घटकांवर अवलंबून असतो. त्यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शिक्षकांची अध्यापन पद्धती, पालकांचा सहभाग आणि शाळेचे व्यवस्थापन या सर्वांचा महत्त्वाचा वाटा असतो. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा परस्पर समन्वय जितका प्रभावी असेल तितकी शाळेची गुणवत्ता सुधारू शकते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाच्या प्रत्येक घटकाचे उद्दिष्ट असते. या प्रक्रियेत शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांचा परस्पर समन्वय फार महत्त्वाचा ठरतो. हा समन्वय अधिक चांगला असेल तर विद्यार्थी गुणवत्तेचा स्तर वाढतो आणि शिक्षण अधिक प्रभावी होते.विद्यार्थ्यांचा बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकास होण्यासाठी शिक्षक आणि पालकांनी परस्पर सहकार्याने कार्य करणे आवश्यक आहे. हा समन्वय विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाला पूरक ठरतो.

शिक्षकांची भूमिका :

- विद्यार्थ्यांना समजून घेणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे.
- आधुनिक अध्यापन पद्धतींचा अवलंब करून शिक्षण अधिक रंजक बनवणे.
- पालकांशी नियमित संपर्क ठेवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती देणे.
- विद्यार्थी केवळ परीक्षेपुरते शिकत नाहीत, तर त्यांना जीवन कौशल्ये शिकवणे.

पालकांची भूमिका :

- मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेणे.
- शिक्षकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे.
- मुलांना सकारात्मक प्रेरणा देणे आणि त्यांच्यावर अनावश्यक दबाव न टाकणे.
- शाळेतील उपक्रमांमध्ये सहभागी होणे आणि विद्यार्थ्यांना सहकार्य करणे.

विद्यार्थ्यांची जबाबदारी :

- शाळेतील आणि घरी शिकण्याच्या प्रक्रियेत उत्साहाने भाग घेणे.
- शिक्षक आणि पालक यांच्या मार्गदर्शनानुसार वागणे.
- शिस्तबद्ध अभ्यास आणि स्वअध्ययनाची सवय लावणे.
- मनातल्या शंका स्पष्ट करण्यासाठी शिक्षक आणि पालक यांच्याशी संवाद साधणे.

विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी आवश्यक उपाय :

विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांनी खालील गोष्टींवर भर द्यावा:

संवाद आणि सहभाग :

- शिक्षक-विद्यार्थी-पालक यांच्यात नियमित संवाद होणे आवश्यक आहे.
- पालक-शिक्षक सभा (PTA) आणि इतर चर्चासत्रांचे आयोजन करावे.

तणावमुक्त शिक्षण :

- विद्यार्थी तणावमुक्त राहतील यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणे.
- पाठ्यपुस्तकांबरोबरच क्रियाशील शिक्षणपद्धतींचा वापर करणे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :

- शिक्षणासाठी स्मार्ट क्लासरूम, ई-लर्निंग आणि ऑनलाइन साधनांचा वापर करणे.
- पालकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास प्रोत्साहित करणे.

कौशल्य विकास आणि स्वावलंबन :

- विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान, सृजनशीलता आणि आत्मनिर्भरता यांचे शिक्षण देणे.
- उपक्रमशील शिक्षण (Project-Based Learning) आणि कृती आधारित अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे.

नैतिक आणि चारित्र्य विकास :

- विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.
- शाळेत नैतिक शिक्षण आणि मुल्याधारित कार्यक्रम राबवणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार

डॉ. लोखंडे बंडू बाबुराव

राज्यशात्र विभाग प्रमुख, जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्याल पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड ४१४२०४

प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार हे पाश्चिमात्य राजकीय विचारवंत कार्ल मार्क यांच्या विचाराची मांडणी आहे. कार्ल मार्कने ज्या प्रमाणे वर्ग समजून संघर्ष, उदारमतवाद या विषयी राजकीय विचार मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर फ उदारमतवादि विचारवंत आहे. स्वातंत्र्यं, समता, बंधुभाव या उदारमतवाडी विचाराचा स्वीकार डॉ. आंबेडकरांनी केला. स्वातंत्र्या नंतर भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांच्या राजकीय विचाराची प्रस्तुता लक्षात येते. सर्व समावेशक आहे. प्रस्तुत शोधनिबंधात राजकीय विचाराची मांडणी करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजसुधारक, राजकारणी, विधिज्ञ आणि संविधानाचे शिल्पकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे राजकीय विचार समाजातील असमानतेविरुद्ध संघर्ष, दलितांच्या हक्कांची संरक्षण आणि समानतेच्या सिद्धांतावर आधारित होते. डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय विचारांची मांडणी विविध पातळ्यांवर केली जाऊ शकते.

- **सामाजिक समानता आणि न्याय**

  डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार समाजातील असमानता, विशेषत: जातिवाद, धर्म आणि स्त्री-पुरुष भेदभाव यावर आधारित होते. त्यांना विश्वास होता की भारतातील समाजव्यवस्था जातिवादावर आधारित आहे आणि त्यासाठी त्यांना 'जातिवादाचा विरोध' हा मुख्य मुद्दा मानला. जातिवादाचा विरोध: डॉ. आंबेडकर यांनी जातींच्या भेदभावाच्या विरोधात आपले जीवन समर्पित केले. त्यांनी 'हिंदू धर्म' आणि 'जातिवाद' यावर अनेक पुस्तकं लिहिली. त्यांचे म्हणणे होते की, समाजाच्या प्रत्येक व्यक्तीस समान अधिकार मिळायला हवे, त्यात धर्म, जात किंवा सामाजिक स्थिती यांचा विचार केला जाऊ नये. समानता: डॉ. आंबेडकर यांच्या विचारधारेचा मुख्य घटक म्हणजे समानतेचा सिद्धांत. त्यांना मान्यता होती की सर्व माणसांना समान अधिकार मिळायला हवे, विशेषत: शिक्षण, रोजगार आणि राजकीय भागीदारीत.

- **राजकीय सत्तेतील समान हक्क**

  आंबेडकर यांना राजकारणात एक महत्त्वपूर्ण भूमिका होती, आणि त्यांनी भारतीय समाजासाठी समानता आणण्यासाठी संविधान तयार केले. त्यांनी 'राजकीय अधिकार' ह्याचे महत्त्व स्पष्ट केले, विशेषत: लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क असावा. लोकशाहीचे महत्व: डॉ. आंबेडकर नेहमीच भारतीय लोकशाहीचे समर्थन करत होते. त्यांना विश्वास होता की, जर समाजातील सर्व नागरिकांना समान मताधिकार मिळाले तर ती लोकशाही एक चांगली व्यवस्थापन प्रणाली ठरू शकते. दलितांचा हक्क: डॉ. आंबेडकर यांचा प्रमुख उद्देश्य दलित समाजाला सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अधिकार मिळवून देणे होता. भारतीय संविधानातील 'आरक्षण' हा त्यांचा मोठा योगदान होता, ज्याद्वारे वंचित समाजाला शिक्षण आणि नोकरीतील संधी मिळाल्या.

- **धार्मिक राजकीय व्यवस्थेला विरोध**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय विचाराची मांडणी करताना कोणत्याही व्यवस्थेत धर्म व्यवस्थेला विरोध करतात. व धर्मनिरपेक्ष राजकीय विचार मांडतात. डॉ. आंबेडकर हे हिंदू धर्माचे कडवे आलोचक होते, कारण त्यांना हिंदू धर्माच्या जातीव्यवस्थेची खूप निंदा होती. त्यांनी आपल्या जीवनात 'बौद्ध धर्म' स्वीकारला आणि अनेक अनुयायांना बौद्ध धर्म स्वीकारण्याचे आवाहन केले. बौद्ध धर्माचा स्वीकार: आंबेडकर यांनी 1956 मध्ये बौद्ध धर्म स्वीकारला आणि 'धर्म परिवर्तन' हा सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला. त्यांचे धर्म परिवर्तन हे एक विद्रोह होते आणि यामुळे अनेक दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारला.

- **लोकशाही बाबतचे विचार**

  डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय विचाराची मांडणी करीत असताना लोकशाहीच्या मुल्याना अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. कारण लोकशाही शासन व्यवस्था हि नसर्गिक स्वातंत्र्याचा विचार करणारी विचार सारणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते राजकीय व्यवस्थेचा उदारमतवाद हा केंद्र बिंदू असला पाहिजे. लोकशाहीत कोणत्याही व्यवस्थेवर अन्याय अत्याचार केले जात नाही. लोकशाही शासन व्यवस्था हि सामान न्यायावर आधारित असल्या मुले ते लोकशाहीचा स्वीकार करतात.

- **संविधानाचे शिल्पकार**

  डॉ. आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. त्यांनी भारतीय समाजातील विविध जाती, धर्म, लिंग आणि समाजातील इतर घटकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी संविधानाची रचना केली. संविधानातील हक्क: भारतीय संविधानात आंबेडकर यांनी 'समानता', 'स्वातंत्र्य', 'बंधुता' आणि 'न्याय' या सिद्धांतांवर आधारित कलमांची समावेश केला. त्यांनी दलित, आदिवासी आणि इतर वंचित समुदायांना आरक्षण दिले.

- **आर्थिक समानता आणि विकास**

  आंबेडकर यांचे विचार सामाजिक न्यायाचे आणि आर्थिक समानतेचे होते. त्यांनी 'आर्थिक समानता'च्या दिशेने अनेक योजनांची शिफारस केली, ज्या समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळवून देऊ शकतात. आर्थिक न्याय: आंबेडकर यांना विश्वास होता की, आर्थिक समानतेशिवाय सामाजिक समानता साधता येणार नाही. त्यांच्या मते, सर्व नागरिकांना एकसारखे आर्थिक हक्क दिले पाहिजे.

निष्कर्ष : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे महत्व आजही भारतीय राजकीय व्यवस्थेत आहे. बाबासाहेबाच्या राजकीय विचारांचे मूल्य आधुनिक राजकीय व्यवस्थेसाठी अत्यंत महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारधारेत समाजातील असमानतेविरुद्ध उभे राहण्याचे, दलित समाजाला समान हक्क देण्याचे, लोकशाहीत समान हक्क प्राप्त करण्याचे आणि शिक्षण आणि जागरूकतेचा प्रसार करण्याचे विचार होते. त्यांचे योगदान भारतीय समाजातील मोठ्या सुधारणा घडवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे.

संदर्भ ग्रंथ

1. डॉ. भा. ल. भोळे - भारतीय राजकीय विचारवंत
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - भारतीय राज्यघटना
3. डॉ. सुधाकर कुलकर्णी - भारताचे शासन आणि राजकारण
4. डॉ. सुनील दाते - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत
5. डॉ. शैयलेंद्र देवळालकर - भारतीय राजकीय विचार
6. इंटनरनेट वृत्तपत्र इत्यादी साधने

'महात्मा फुले यांचे शेती विषयक विचार'

प्रा. डॉ. रंजीता डी. जाधव

गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना

सारांश

सामाजिक सुधारणा, स्त्रीशिक्षण, स्त्री प्रश्नांप्रमाणेच महात्मा फुले यांच्या कार्यातील कृषी हा महत्त्वाचा विचार होय. हवामानातील बदल, अवेळी पर्जन्यवृष्टी आणि बदलता बाजारभाव अशी अनेक आव्हाने आजही शेतकऱ्यांसमोर उभी आहेत. त्यावेळी महात्मा फुले यांनी पारंपरिक शेतीला विरोध दर्शविला. ते म्हणत असत आधुनिक यंत्राद्वारे व अद्ययावत पद्धतीने शेती करावयास पाहिजे. महात्मा जोतीराव फुले यांचे शेतीविषयक विचार हे मर्यादित नव्हे, तर संपूर्ण मानव जातीचा विचार करणारे आहेत. सामाजिक समता, आर्थिक सुबत्ता, कृषी संस्कृतीची समृद्धता आणि निकोप एकता यांचा विचार त्यात सामावलेला आहे.देशाच्या सर्वांगीण उन्नती आणि विकासाचा पाया कृषीक्षेत्राशी आणि शेतकऱ्यांशी निगडीत आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या सर्व समस्या, अडचणी व प्रश्नांवर विचारच करून चालणार नाही तर त्याबाबत विधायक मार्ग शोधून प्रत्यक्ष अंमलबजावणी आवश्यक आहे. यातून शेतकरी समृद्ध होईल, भूमि आणि भूमिपुत्र यांच्याशिवाय कृषिप्रधान देशात सर्वांगीण विकास साधता येणार नाही अशी त्यांची धारणा होती. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या कर्जबाजारी व दरिद्री जीवनाचा साकल्याने, सातत्याने अभ्यास केला आणि शेतकऱ्याला न्याय मिळावा म्हणून ब्रिटीश सरकारकडे अनेक गोष्टींची मागणी केली. यात प्रामुख्याने कर्जमाफी, शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज (अर्थ सहाय्य) , शेती उत्पादनवाढीसाठी, सवलतीसाठी त्यांनी आग्रह धरला होता. जेव्हा दुष्काळी परिस्थिती असेल तेव्हा सर्व प्रकारची कर्जमाफी मिळावी म्हणून ते प्रयत्न करत होते. नवनवीन बी-बियाण्याचा वापर, पाणी पद्धतीचा वापरही नियोजनबद्ध असावा असा त्यांचा आग्रह होता.काही भागात जमिनीची मोठ्या प्रमाणात धूप होते. पावसाच्या पाण्याने ती वाहून जाऊ नये म्हणून, बांध-बंधारे, वृक्षारोपण करणे यासाठी वेळ पडल्यास लष्कर व पोलिसांचीही मदत घ्यावी, असे महात्मा फुले यांनी सुचविलेले आहे. सेंद्रिय शेतीला प्राधान्य, पाण्याचे योग्य नियोजन, शेतीविषयक पिकांचे प्रदर्शन व शेतीविषयक माहितीच्या परिसंवादरूपी चर्चा व्हाव्यात, शेतीसाठी उपयुक्त अवजारे सवलतीच्या दरात पुरवावीत.शेतकऱ्यांनी आपल्या कष्टातून कमविलेल्या उत्पादनास योग्य दाम मिळावा या बाबीही महात्मा फुले यांनी प्रकर्षाने सुचिवल्या आहेत. आजच्या शेतकऱ्यांच्या 'आत्महत्या' रोखावयाच्या असतील तर महात्मा फुले यांनी सुचविलेले हे कृषी विचार, उपाय अमलात आणण्याची नितांत गरज आहे. महात्मा फुले यांचे जलसंधारण विषयीचे आणि एकूण शेतीविषयक विचार आजच्या युवापिढीला मार्गदर्शक आहेत.

प्रस्तावना

भारतातील परंपरागत समाज संस्थेच्या विरुद्ध बंड करणारे पहिले बंडखोर, भारतीय स्त्री-शिक्षणाचे जनक, स्त्री-स्वातंत्र्याचे आणि हक्काचे उद्गाते, शेतकरी-कामकऱ्यांची चळवळ उभारणारे पहिले पुढारी म्हणून ज्योतिराव गोविंदराव फुले हे हे ख्यातीप्राप्त आहेत. महात्मा फुले हे चार्वाक, बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम आणि लोकराजा शिवाजी यांची परंपरा जोपासणारे विवेकवादी होते. समाजसुधारणा, स्त्रीदास्य

विमोचन, सर्वांना शिक्षणाचा हक्क याविषयी ते आग्रही होते. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे, हे त्यांनी हे त्यांनी 'तृतीय रत्न' या नाटकातून दाखवून दिले आहे. शिक्षणानेच मनुष्य विवेकशील व संवेदनशील बनतो. शिक्षणाअभावी माणूस मानवी हक्क, प्रतिष्ठा, दर्जा ह्यांना पारखा होतो. समाजसुधारणेचा परीघ व्यापक होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, याची त्यांना जाणीव होती. अशिक्षितपणामुळे शेतकरी, कामकरी यांचे जीवन शोचनीय झाले आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, कुप्रथा यांमुळेच मानवी समुदाय दुःखाच्या छायेत लोटला आहे. 'शेतकऱ्याचा असूड' मधून त्यांनी शेतकऱ्यांच्या अवनतीचे समर्पक चित्र रेखाटले आहे.शेतीला प्राधान्य मिळाले पाहिजे, शेती ही आधुनिक पद्धतीने केली पाहिजे आणि शेतकऱ्यांची उन्नती होऊन देश भरभराटीस गेला पाहिजे, असे त्यांचे विचार होते. परंतु आज आपण पाहतोय येथील शेतकरी हवालदिल झाला आहे. सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. शेतीवर गैरवाजवी कर आहेत. ही परिस्थिती बदलली पाहिजे, असे महात्मा फुले यांना सतत वाटत होते.परिणामी त्यांनी उत्तम शेती करण्यासाठी नवीन अवजारे, सुधारीत बियाणे, विहीर खोदण्यासाठी कर्ज, पाणी अडवून ओलिताची सोय, शेतकऱ्यांसाठी ठिकठिकाणी प्रदर्शने, अभ्यासदौरे, सेंद्रिय पदार्थ, पालापाचोळा आदींचा शेतात वापर, चांगल्या दुभत्या गायी, वैरणीची व्यवस्था, जमिनीची उत्पादनक्षमता कमी होऊ नये म्हणून जमिनीस विश्रांतीची गरज असते, असे त्या काळात त्यांनी सुचविले होते. शेती संदर्भातील पुस्तके शेतकऱ्यांना दिले पाहिजे, जेणेकरून तो शास्त्रोक्त पद्धतीने शेती करेल, असेही त्यांना वाटत होते.

उद्दिष्टे

- महात्मा फुले यांच्या शेती विषयक विचारावर चर्चा करणे.
- शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करणे.
- ब्रिटिशांच्या धोरणावर चर्चा करणे.
- महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी सांगितलेल्या उपायावर चर्चा करणे.
- महात्मा फुले यांनी मांडलेल्या शेतकी धोरणावर चर्चा करणे.

गृहीतके

- ब्रिटिश सरकारच्या शेतकी धोरणा विरोधात महात्मा फुले यांनी विचार मांडलेले दिसून येते.
- महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथसंपदा मधून शेतकऱ्यांच्या स्थितीसाठी त्यांचे अज्ञान कसे जबाबदार आहे हे दाखवून दिले.
- महात्मा फुले यांच्या शेतकी विचारातून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी केलेला प्रयत्न दिसून येतो.

शोधक शब्द

समाज सुधारक, पिळवणूक, शेतकऱ्याचा आसूड, शेती, उद्योगधंदे, अज्ञान.

संशोधन पद्धती

कोणत्याही प्रकारचे संशोधन करत असताना तथ्य संकलनाची आवश्यकता असते. प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम श्रोताच्या माध्यमातून तथ्य संकलन केले आहे. विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित वर्तमानपत्रे, इंटरनेट तसेच लिखित स्वरूपातील लेख व इतर माहितीच्या आधार घेण्यात आला आहे.

विषयाचे महत्त्व

भारतात ब्रिटीशांचं राज्य येऊन साधारण 60 वर्षं झाली असतील. शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर महात्मा फुले पोटतिडकीने लिहित होते. 1880च्या दशकाच्या शेवटी त्यांनी शेतीविषयी केलेलं लिखाण गावांमध्ये शेतकऱ्यांना वाचून दाखवायला सुरूवात केली होती. जे लिहिलंय ते सत्याला धरून आहे याची शेतकऱ्यांकडूनच पडताळणी करत होते. तत्कालीन सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यासमोर कोणते बिकट प्रश्न उभे आहेत याचं सविस्तर वर्णन करत होते.

"कधीकधी शेतकऱ्याने गाडीभर माळवे शहरात विकण्याकरिता आणल्यास त्या सर्व मालाची किंमत बाजारात जास्ती किंमती वजनाने घेणारे-देणारे दगेबाज दलालांचे व म्युनिसिपालिटीचे जकातीस भरीस घालून गाडीभाडे अंगावर भरून त्यास घरी जाऊन मुलाबाळांपुढे शिमगा करावा लागतो." शेतीच्या मालाला योग्य तो भाव मिळत नसल्याचं फुले सांगत होते. तर एकाच शेतजमिनीत घरातलेच वाटेकरी वाढल्याने शेतकऱ्याच्या जगण्यावर त्याचा कसा परिणाम होतोय याचं वर्णनही ते करत होते.

"शेतकऱ्यांमध्ये भाऊहिस्से इतके वाढले की कित्येकांत आठ-आठ, दहा-दहा पाभारींचे पेऱ्यावर गुजारा करावा लागतो. त्यांना एक-दोन बैल बाळगण्याची ऐपत नसल्यामुळे ते आपली शेते शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे खंडाने देऊन आपली मुलं-माणसे बरोबर घेऊन कोठेतरी परगावी मोलमजूरी करून पोट भरण्यास जातात." महात्मा फुले हे गावागावात 'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक वाचत असत.'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक असं जाहिरपणे चावडीवर, अक्षराची ओळख नसणाऱ्या स्त्री-पुरुषांसमोर वाचन होत तयार झालं होतं. त्यामुळे या पुस्तकाचा खरा वाचक केवळ लिहिता-वाचता येणारा वर्गच नव्हता तर निरक्षर असणारा कष्टकरी वर्ग त्याचा ऐकणारा श्रोता होता.

1883 साली महात्मा फुल्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक लिहून पूर्ण केलं, तेव्हा त्यांचं वय 55 वर्षं होतं. ते या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहितात- 'पुणे, मुंबई, ठाणे, जुन्नर, ओतुर, हाडपसर, वंगणी, माळ्याचे कुरुल वैगेरे येथील शूद्र गृहस्थांनी कित्येक वेळा हा ग्रंथ माझ्या तोंडून ऐकला व या ग्रंथात लिहिलेला मजकूर खरा आहे अशाविषयी त्यांनी आपल्या सह्या माझ्याकडे पाठविल्या आहेत." बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांनाही देखील 'शेतकऱ्याचा आसूड' लक्षपूर्वक ऐकला आणि आदर सत्कार केला असंही फुलेंनी लिहिलंय.

'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकाच्या सुरूवातीलाच शेतकऱ्याच्या परिस्थितीचं अगदी चपखल वर्णन फुल्यांनी या शब्दांमध्ये केलंय-

विद्येविना मति गेली,
मतीविना नीति गेली,
नीतीविना गती गेली,
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

- शेतकरी विद्वान का नाही?

त्या काळी शेतकऱ्याच्या घरात पूजा-कर्मकांड, जातीतल्या परंपरेमुळे त्याची तथाकथित उच्चवर्णीय जातींकडून कशी फसवणूक, शोषण होतेय याचे दाखला देत फुलेंनी शेतकऱ्याच्या दयनीय अवस्थेचं चित्र उभं केलं. तर दुसरीकडे ब्रिटीश सरकारच्या धोरणामुळे शेतकरी कसा नागवला गेलाय याचे दाखले दिले. शेतकऱ्याची दारूण अवस्था कशामुळे झाली हे सांगताना फुले मांडतात. गाई आणि बैलांच्या ब्रिटीशांनी कत्तली सुरू केल्याने शेतीत लागणाऱ्या चांगल्या बैलाचं बेण कमी झालं आहे. त्यामुळे शेतीत चांगले बैल मिळत नाहीत. तर अतिवृष्टीमुळे राज्यात ओला दुष्काळ पडल्याने जनावरांना चाराही मिळत नाही. शेतीतल्या जनावरांची संतती क्षीण होत चालल्याने त्यांना अनेक प्रकारचे आजार होत आहेत आणि मोठ्या प्रमाणात बैल मरत आहेत.

शेतकऱ्याला बागायतीत चांगलं खत नसल्याने पीकही चांगलं काढता येत नाही. जास्त किंमतीचा शेतसारा भरावा लागत असल्याने शेतकऱ्यांचे हाल होतायत, त्याचा परिणाम शेतकऱ्याच्या अन्नावर आणि तब्येतीवरही होत आहे. त्यात साधीच्या संकटाचं थैमान सुरू आहे. कोलमडलेल्या कृषी व्यवस्थेमुळे शेतकरी कर्जबाजारी होतोय. सावकारांकडून शेतकऱ्यांचं अतोनात शोषण होतंय. शेतमाल परदेशात जात असल्याने त्याची पर्वा ब्रिटीशांना नाही. तर दुसरीकडे कित्येक वस्तू सरकार आयात करत असल्याने स्थानिक अर्थव्यवस्था कोलमडून पडली आहे.

सरकारी कर्मचारी वर्ग ब्राम्हण असल्याने त्यांना शेतकऱ्यांच्या परिस्थितीशी काही देणं घेणं नाही, तसंच शेतकऱ्याच्या परिस्थितीशी तो असंवेदनशील आहे. शेतकऱ्याला विद्वान होऊ न देणं हे व्यवस्थेतल्या गोऱ्या आणि देशातल्या कर्मचाऱ्यांच्या फायद्याचं आहे. शेतकरी विद्वान झाले तर त्यांचं शोषण करता येणार नाही. थोडी जमीन असणारे शेतकरी आपली शेती कसून जंगलातल्या उत्पादनावर आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी तिथल्या गवतावर अवलंबून होता. ब्रिटीश वनखातं या शेतकऱ्याला जंगलापासून दूर करत.

महात्मा फुले यांनी शेतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी 'हे' उपाय सुचवले होते...

- शेतमालाच्या करातून सरकारी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा पगार आणि पेन्शन कमी करावेत.
- अज्ञान शेतकऱ्यांना शिक्षित आणि विद्वान करण्यासाठी प्रयत्न करावेत.
- शेतकऱ्यांच्या मुलांसाठी परीक्षा घेऊन त्यांना पाटिलक्या द्याव्यात.
- शिक्षण सर्वांपर्यंत समान पद्धतीने पोहचवण्यासाठी शेतकरी वर्गातले शिक्षक नेमावेत. म्हणजे ते समाजातल्या सर्व वर्गांमध्ये मिसळतील.
- शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात शेतकी आणि आरोग्य, व्यावहारिक विषयांचा समावेश करावा
- बैलांचं कत्तलीपासून संरक्षण करावं यासाठी कायदा करावा. तसंच शेतकऱ्यांना शेणखताचा मुबलक पुरवठा कसा होईल याकडे लक्ष द्यावे.
- शेतं सुपिक होण्यासाठी नियोजन करून बंधारे बांधावेत. जेणेकरून डोंगरदऱ्यांमधून पाण्याने वाहून येणारं खत शेतात मुरून मग पुढे नदी-नाल्यांना जाऊन मिळतील.
- डोंगरदऱ्यांमधील भागात तळी, तलाव सोयीसोयीने बांधावीत. तसंच लहानमोठी धरणं बांधल्याने बागायती क्षेत्राचा फायदा होईल.

- सिंचन बागायती क्षेत्र वाढवण्यासोबतच पाणलोटाच्या बाजूने शेताच्या बांधांनी वरचेवर दुरुस्त्या कराव्यात
- झऱ्यांसारखे पाण्याचे स्त्रोत दाखवणारे नकाशे तयार करावेत आणि असे स्रोत राखणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे द्यावीत.
- देशातून तसंच परदेशातून शेळ्या मेंढ्यांची उत्तम पैदास होईल अशी बेणी खरेदी करून आणावी, त्याचा शेत सुपिक होण्यासही फायदा होईल.
- दरवर्षी श्रावणात शेतकऱ्यांच्या चांगल्या कामांचं प्रदर्शन घेऊन बक्षिसं द्यावी.
- तीन वर्ष उत्तम कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना पद्व्या द्याव्यात.
- नव्या पिढीतल्या शेतकऱ्यांना परदेशी शेतकीच्या शाळा पाहण्यासाठी न्यावं.
- सरकारी तिजोरीत शेतीच्या करातून कोट्यावधी रुपयांचा भरणाऱ्या शेतकऱ्यांचं शोषण थांबवावं.

महात्मा जोतिराव फुले यांचं आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचं स्थान आहे. वंचित, शोषित कष्टकरी जातीसमुहांना आणि गरीब वर्गाला चांगलं आयुष्य जगता यावं यासाठी त्यांनी मांडलेले विचार दिडशे वर्षांनतरही तितकेच जिवंत वाटतात. आणि आजच्या काळाशी सुसंगतही वाटतात.

निष्कर्ष

सामाजिक सुधारणांच्या बाबतीत अनेक लोक बोलतात, परंतु जे बोललेले आहे ते कृतीत उतरविणारे फारच कमी आहेत. महात्मा जोतिबा फुले त्यापैकीच एक ! समाजकार्यात शेतकऱ्यांना फार महत्त्वाचे स्थान होते. शेतकऱ्यांचा आसूड' हा जोतिबांचा ग्रंथ अनेक दृष्टीने अद्वितीय आहे. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या स्थितीचे विदारक चित्र रेखाटले आहे. शेतकऱ्यांची पिळवणूक कशी होते ? याचे विवेचन त्यांनी या ग्रंथात अत्यंत पोटतिडकीने मांडले आहे. एवढ्यावरच जोतिबा फुले थांबले नाहीत तर शेतकऱ्यांचे प्रश्न ब्रिटिश शासन दरबारी मांडले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सभेसमोर देखील त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चेची मागणी केली. शेतकऱ्यांची चळवळ सुरू करणारे महात्मा फुले हे पहिले नेते होते. शेतकऱ्यांच्या दैन्य स्थितीचे वर्णन करताना ते लिहितात... 'उघडी नागडी रानोमाळ, पोरे फिरती सदा सर्वकाळ'. शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी अनेक उपाययोजना सुद्धा त्यांनी सरकारला सुचविल्या होत्या. यावरून शेतीसंबंधी त्यांच्या द्रष्टेपणा स्पष्ट होतो. शेती संबंधीची आधुनिक व क्रांतिकारी तत्त्वप्रणाली त्यांच्या विचारातून स्पष्ट होते.

जोतिबा फुले शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उकल करताना लिहितात, आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व शेतकऱ्यास युरोपियन शेतकऱ्यासारखे विद्यादान देऊन त्यास यंत्रांद्वारे शेती कामे करण्यापुरती समज येईतो पशुहत्या बंद करावी. म्हणजे येथील शेतकऱ्यांना बैलांचा पुरवठा होऊन त्यांना आपल्या शेतांची भरपूर मशागत करता येईल. पोलीस खात्यातील काळ्या गोऱ्या शिपायांकडून जागोजाग तालवजा बंधारे अशा रीतीने बांधावे की, वळवाचे पाणी शेतातून मुरून नंतर नदीनाल्यात मिळावे. असे केल्याने शेते सुपीक होतील. सर्व डोंगर टेकड्यांमधील दऱ्याखोऱ्यांत तलाव तळी जितकी होतील तितकी बांधून काढावीत. सर्व शेते धुऊन त्यामध्ये खोंगळया पडू नयेत म्हणून सरकारने शेतकऱ्यांकडून पाणलोटाच्या बाजूने शेताच्या बांधणीवरच्या ताली दुरुस्त ठेवाव्यात.

यावरून असे दिसून येते की, पाणी आडवा-पाणी जिरवा, पाणलोट क्षेत्र विकास, मृदा व जलसंधारण या कामांचे महत्त्व त्यांनी त्या काळात जाणले होते. इतर देशातील उत्तम गायी, शेळ्या मेंढरांची खरेदी करून

आपल्या देशात आणून त्यांची येथे उत्पत्ती केल्यास दुधाबरोबर सर्व शेतास त्यांच्या मलमूत्रांपासून शेणखत मिळाल्याने जमिनी सुपीक होतील. त्यांच्या लोकरीपासूनही फायदा होईल.

जोतिबांच्या विचारांना कृतीत उतरविण्यासाठी इंग्रज सरकारकडे दरवर्षी श्रावण महिन्यात कृषी प्रदर्शन भरविण्याचे तसेच आश्विन महिन्यात शेतपिकांचे व औत हाकणाऱ्यांच्या परीक्षा घेऊन उत्तम शेतकऱ्यास बक्षिसे देण्याची वहिवाट घातली. शेतकऱ्यांच्या मुलांच्या सरकारी खर्चाने परदेशात सहली आयोजित करण्याविषयी सुचविले.

या सूचनांमधील सखोल व गर्भित अर्थ ध्यानात घेतला तर महात्मा फुले यांच्या पारदर्शक दृष्टीचा पुरेपूर प्रत्यय येतो. जोतिबांनी पुरस्कार केलेल्या व अंगीकारलेल्या विविध शेती सुधारणा आज देशभरातील शेती संशोधनात कृषी शास्त्रज्ञांनी शंभर वर्षानंतर स्वीकारल्याचे आढळून येते. महात्मा फुले यांनी शेती विकासाबाबत काही उपाय सुचवले. पूर्वी शेती ही पारंपरिक पद्धतीने व निसर्गावर अवलंबून होती. त्यामुळे धान्य उत्पादन कमी होत असे. परिणामी दुष्काळ आल्यास धान्यसाठा संपलेला असे. अशावेळी आधुनिक पद्धतीने शेती व तिचे आधुनिकीकरण करावे, वृक्षतोड थांबवावी, केवळ पावसावर अवलंबून न राहता आधुनिक उपकरणांचा वापर करावा. तळी, तलाव, धरणे व कालवे बांधावेत. दुष्काळात शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज द्यावे. कालव्याचे पाणी नळावाटे द्यावे. त्यामुळे जास्त पाणी मिळणे सोपे होईल. पूर्वी वीज नसल्याने वन्य प्राणी व डुकरे यांचा मोठ्या प्रमाणात शेतमालाला उपद्रव होत असे. रात्रीची राखण करावी लागत असे. हे उपद्रव टाळण्यासाठी शेतकऱ्यांना गावठी बंदुका द्याव्यात व परवानगी द्यावी. शेतकऱ्यांच्या शेताच्या नुकसानीबाबत सरकारच्या तिजोरीतून अथवा पोलिस अंमलदाराच्या पगारातून नुकसान भरून देण्याबाबत कायदा करावा, अशी मागणी ब्रिटिश सरकारकडे केली होती. त्यामुळे शेतकरी सुखाची झोप घेईल असे त्यांचे मत होते.

संदर्भ ग्रंथ

1. महात्मा फुले: शैक्षणिक विचार व कार्य- दिलीप सुरवाडे
2. आधुनिक शेतीचे जनक - ॲग्रोवन २८ नोव्हेंबर २०२३
3. महात्मा फुले यांचे शेती धोरण - दैनिक प्रभात २८ नोव्हेंबर २०२१
4. महात्मा फुले यांचे कृषी विचार - ॲग्रोवन - ३० जानेवारी २०२२
5. महात्मा ज्योतिराव फुले - धनंजय कीर
6. महात्मा फुले ग्रंथ - पी. बी. साळुंखे
7. महामानव महात्मा फुले व्यक्ति व कार्य - राम कांडगे

संत साहित्याचा अमूल्य ठेवा: ज्ञानेश्वरी

नादरगे चंद्रदीप बालाजी

श्री पांडुरंग विद्यालय, कल्लूर ता.उदगीर जि.लातूर

परिचय

ज्ञानेश्वरी हा संत ज्ञानेश्वर महाराजांनी इ.स. १२९० मध्ये लिहिलेला एक अमूल्य ग्रंथ आहे. हा ग्रंथ भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाचे मराठी भाषेत विस्तृत विवेचन करतो. गीता संस्कृत भाषेत असल्याने ती सर्वसामान्य लोकांसाठी दुर्बोध होती. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांनी ती ओवीबद्ध मराठीत मांडली, जेणेकरून प्रत्येकाला गीतेचे ज्ञान प्राप्त होईल.

ज्ञानेश्वरी हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो जीवनाचे तत्वज्ञान सांगणारा आहे. या ग्रंथात भक्ती, ज्ञान आणि कर्मयोग यांचे सुयोग्य मिश्रण आहे. यात संत ज्ञानेश्वरांनी गीतेतील गूढ अर्थ सहज व सोप्या भाषेत समजावून सांगितला आहे. त्यामुळे हा ग्रंथ केवळ विद्वानांसाठी नव्हे, तर सर्वसामान्य लोकांसाठीही उपयुक्त ठरतो.

ज्ञानेश्वरी हा मराठी भाषेतील पहिला महान ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाने मराठी भाषेला एक स्वतंत्र ओळख दिली आणि ती केवळ जनसंपर्काची भाषा न राहता ज्ञानपरंपरेची भाषा झाली. त्यामुळे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ केवळ धर्मशास्त्रापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण साधन ठरला.

रचनाकाल आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी

ज्ञानेश्वरीची रचना इ.स. १२९० मध्ये पैठण येथे झाली. तो काळ सामाजिक आणि धार्मिकदृष्ट्या अत्यंत कठीण होता. समाजामध्ये जातीव्यवस्था, अस्पृश्यता आणि अज्ञान यांचा प्रभाव होता. धार्मिक ग्रंथ व विद्या केवळ ब्राह्मण समाजापुरती मर्यादित होती, त्यामुळे इतर लोकांना वेद-उपनिषदांचे ज्ञान घेण्याचा अधिकार नव्हता.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा जन्म इ.स. १२७५ मध्ये झाला. त्यांच्या कुटुंबाला समाजाने बहिष्कृत केले होते, कारण त्यांच्या वडिलांनी संन्यास घेतल्यानंतर पुनश्च गृहस्थाश्रम स्वीकारला होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानेश्वर महाराजांनी समाजाच्या भल्यासाठी विचार केला आणि भगवद्गीतेचे ज्ञान सर्वसामान्यांसाठी खुले करण्याचा निर्णय घेतला.

त्याकाळी मराठीत ग्रंथलेखन होत नव्हते. त्यामुळे ज्ञानेश्वरी हा पहिला महत्त्वाचा मराठी ग्रंथ ठरला. या ग्रंथाने समाजात समता, सहिष्णुता आणि बंधुभाव यांचे महत्व पटवून दिले. ज्ञानेश्वर महाराजांनी या ग्रंथाद्वारे समाजप्रबोधन करून सर्वांसाठी ज्ञानाचे द्वार खुले केले.

ग्रंथाची भाषा आणि शैली

ज्ञानेश्वरीची भाषा ओघवती, रसाळ आणि समजण्यास सोपी आहे. हा ग्रंथ ओवीबद्ध स्वरूपात लिहिला आहे, त्यामुळे तो गेय आणि सहज वाचनीय वाटतो. ज्ञानेश्वर महाराजांनी संस्कृत भाषेतील कठीण तत्त्वज्ञान मराठीत अत्यंत सोप्या शब्दांत उलगडले आहे.

ज्ञानेश्वरीमध्ये दृष्टांत आणि उपमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला आहे. उदाहरणार्थ, आत्म्याचे स्वरूप स्पष्ट करताना ते म्हणतात की "पाण्याचा थेंब समुद्रात विलीन झाला की तो वेगळा राहत नाही,

त्याचप्रमाणे जीव ईश्वराशी एकरूप होतो." अशा दृष्टांतांमुळे कठीण तत्त्वज्ञान सहज समजते. त्यातील शैली भावनाप्रधान आणि तत्वज्ञानपर आहे. ज्ञानेश्वरी वाचताना असे वाटते की ज्ञानेश्वर महाराज आपल्याशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. त्यांनी अत्यंत सोप्या आणि प्रभावी शब्दांचा वापर करून गीतेचा गूढ अर्थ सहज उलगडला आहे.

ज्ञानेश्वरीचे तत्वज्ञान आणि शिकवण

ज्ञानेश्वरीमध्ये मुख्यतः तीन तत्त्वज्ञान मांडले आहे. ज्ञानयोग, भक्तीयोग आणि कर्मयोग. गीतेप्रमाणेच ज्ञानेश्वरीमध्ये हे तीन मार्ग अत्यंत सुबोध भाषेत स्पष्ट केले आहेत.

१) ज्ञानयोग:

ज्ञानयोग म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करणे. ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले की खरा आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर मनुष्य सुख-दु:खाच्या पलीकडे जातो आणि मुक्त होतो.

२) भक्तीयोग:

भक्तीयोग हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण समर्पण आणि निस्वार्थ भक्तीचा महिमा वर्णन केला आहे. त्यांच्या मते, भक्तीच्या मार्गाने ईश्वरप्राप्ती शक्य आहे.

३) कर्मयोग:

कर्मयोग म्हणजे कर्तव्यभावनेने कार्य करणे. त्यांनी सांगितले की कर्म करताना फळाची अपेक्षा न करता, पूर्ण प्रामाणिकपणे कार्य करावे. हे तत्वज्ञान आधुनिक काळातही अत्यंत उपयुक्त आहे.

ग्रंथाचे वैशिष्ट्ये

ज्ञानेश्वरी ही मराठीत लिहिलेली पहिली तत्वज्ञानात्मक रचना आहे. हा ग्रंथ केवळ भगवद्गीतेचे भाषांतर नसून, तिचे विस्ताराने विवेचन करणारा ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये काव्य, तत्वज्ञान आणि भक्तिरस यांचे सुंदर मिश्रण आहे. यात वर्णनशैली अत्यंत प्रभावी असून, अनेक ठिकाणी रसाळ काव्यात्मक ओवींचा समावेश आहे. ज्ञानेश्वरीची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे तिचे लोकसंग्रहात्मक स्वरूप. ती केवळ पंडितांसाठी नाही, तर प्रत्येक सामान्य माणसासाठीही आहे.

ज्ञानेश्वरीचे महत्त्व आणि प्रभाव

ज्ञानेश्वरीचा प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित नाही, तर तो सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिकदृष्ट्याही मोठा आहे. या ग्रंथाने मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळवून दिली. यापूर्वी ज्ञानाचे साधन केवळ संस्कृत भाषा होती, पण ज्ञानेश्वरीमुळे मराठी ही ज्ञानपरंपरेची भाषा बनली. वारकरी संप्रदायाच्या विस्तारामध्ये या ग्रंथाचा मोठा वाटा आहे. संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आणि इतर संतांनी या ग्रंथातील विचार पुढे नेले. या ग्रंथाने लोकांमध्ये समतेची भावना निर्माण केली. ज्ञानेश्वर महाराजांनी जातिभेद, अस्पृश्यता आणि अंधश्रद्धांना विरोध केला.

पसायदान: ग्रंथाचा समारोप

ज्ञानेश्वरीच्या अखेरीस "पसायदान" नावाचा अंश आहे, जो या ग्रंथाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. पसायदान म्हणजे ईश्वराच्या कृपेची मागणी. पसायदानात ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. त्यांनी या प्रार्थनेत सर्वांना आनंद, समता आणि शांती मिळो, अशी मागणी केली आहे. त्यात संपूर्ण समाजासाठी कल्याणाची इच्छा आहे. ते म्हणतात की "सर्वां सुखी होवो, सर्वांचे भले

होवो." पसायदान हे केवळ धार्मिक प्रार्थना नसून, ते मानवी समाजाच्या सर्वांगीण विकासाची संकल्पना मांडणारे आहे.

निष्कर्ष

ज्ञानेश्वरी हा केवळ एक धार्मिक ग्रंथ नाही, तर तो संपूर्ण जीवनदर्शन करणारा ग्रंथ आहे. या ग्रंथाने मराठी भाषेला एक वेगळे स्थान दिले आणि संपूर्ण समाजासाठी ज्ञानप्रसाराचे कार्य केले. या ग्रंथातील तत्वज्ञान आजही तितकेच महत्त्वाचे आहे. जीवनात संतुलन, शांती आणि समाधान हवे असेल, तर ज्ञानेश्वरीच्या शिकवणीचा आधार घेणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या या ग्रंथाच्या माध्यमातून एक अजरामर वारसा निर्माण केला आहे. त्यामुळेच ज्ञानेश्वरीला मराठीतील सर्वात महान ग्रंथ म्हणून ओळखले जाते. संत साहित्यातील हा अमूल्य ठेवा: ज्ञानेश्वरी आजही प्रत्येकाच्या घरी आपणास पाहायला मिळतो.

संदर्भ ग्रंथ

1. "ज्ञानेश्वरी" – संत ज्ञानेश्वर महाराज (टिकासह आवृत्ती – भागवत प्रकाशन, पुणे)
2. "ज्ञानेश्वर आणि त्यांचे साहित्य" – रा. रं. बोराडे
3. "मराठी संत साहित्याचा अभ्यास" – वि. ल. भावे

सामाजिक संस्था आणि आर्थिक विकास - एक अध्ययन

विनोद मंसाराम बडवाईक

सहाय्यक प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख राष्ट्रपिता महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावली जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र

गोषवारा

